साप्ताहिक

माणूस

२ फेब्रुवारी ८५ / २ रुपये

भोपाळ

अधिकारी, मंत्री,
नेते, सगळे
जीव घेऊन
पळून गेले!

उद्योगातही 'पॉवर गेम'

साप्ताहिक

माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : छत्तिसावा

२ फेब्रुवारी १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर



☐ निवडणुकीनंतर ?

विदर्भाचे हृदयसम्राट वसंत साठे यांनी वसंतदादांवर तोफ डागली आहे शरद जोशींच्या शेतकरी संघटनेमुळे वर्धा मतदार संघात साठ्यांचा लीड दोन लाखावरून पंचवीस हजारावर येऊन ठेपला. साठ्यांना हे सारे दादांचे कारस्थान वाटते. दिल्लीच्या एका मासिकाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी तसा आरोप केला आहे.

वसंतरावांना केव्हा काय बोलावे आणि करावे याचे उत्तम ज्ञान आहे. उदाहरणार्थ, इंदिरा गांधींच्या अंत्ययात्रेच्या प्रसंगी टिव्हीचा कॅमेरा ऑन असताना त्यांनी दुःखाने गदगदून राहुल गांधींना मिठी मारली. मागेच फक्त इंदिरा गांधी हयात असताना 'कॉंग्रेस आय म्हणजे एकखांबी तंबू आहे.' असे त्यांनी पुण्यनगरीत जाहीर विधान केल्याने त्यांच्यावर तंबूबाहेर पडण्याचा प्रसंग ओढवला; पण केवळ खाते पालटावर निभावले. त्यानंतर पुन्हा त्यांनी अशी चूक केली नाही.

खरं पहाता शेतकरी संघटनेने वाशीम, अकोला, रामटेक येथेही कॉंग्रेस आयच्या उमेदवारांना विरोध केला होता. मग साठ्यांनाच फक्त यात दादांचा हात कसा काय दिसतो ? विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या असताना साठ्यांनी हा जो प्रचार सुरू केला आहे त्याच्या पाठची कारणे वेगळी आहेत.

ह्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदल केला जाईल अशी येथे चर्चा सुरू आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे दादाही आता पुढचे पाच वर्षे कारभार सांभाळण्यास उत्सुक नाहीत. त्यामुळे निवडणुकीनंतर हायकमांडने आपले मत जाहीर करण्याआधीच पक्षातल्या वेगवेगळ्या गटांनी मोर्चे बांधायला सुरुवात केली आहे. दादांची इच्छा शिक्षणमंत्री सुधाकरराव नाईक किंवा अर्थमंत्री सुशीलकुमार शिंदे ह्यांच्याकडे निवडणुकीनंतर नेतृत्व सोपवले जावे अशी दिसते; पण ह्या योजनेला वसंत साठे आणि नाशिकराव तिरपुडे यांचा विरोध आहे.

साठे आणि तिरपुडे ह्यांनी दिल्लीत बोलावलेल्या बैठकीला विठ्ठलराव गाडगीळ आणि शंकरराव चव्हाणही उपस्थित होते असे म्हटले जाते. ह्या बैठकीत जो कट शिजला त्याचा वास दादांना मुंबापुरीत लागला यावरून हा किती उग्र वास होता याची तुम्हाला कल्पना येईल.

अंतुले, भाऊराव पाटील, राम पंडागळे यांसारखी थोर नेते मंडळी दुर्दैवाने पक्षात नसल्याने त्यांच्याबद्दल सहानुभूती राखून असणारे बाबासाहेब भोसले (कोण बरे हे बाबासाहेब ? असा प्रश्न पडला असेल तर तुम्हाला आम्ही आठवण करून देऊ इच्छितो की एके काळी बॅरिस्टर बाबासाहेब भोसले (बीबीबी) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते.) व रामराव आदिक ह्या गटाला अजून कठ फुटला नाही. आता निवडणुकीत तिकीट मिळाले नाही तरच बाबासाहेब सारंगवर पत्रकारांना बोलावून घेतील आणि वसंतदादांच्या शासनावर तोफ डागतील; पण हे सगळे छापताना 'खात्रीलायक गोटाकडून मिळालेल्या बातमीनुसार असे म्हणायचे. बाबासाहेबांच्या नावाचा उल्लेख करायचा नाही बरे का ?

साठ्यांच्या आरोपांना आपण किंमत देत नाही हे सांगण्यासाठी दादांनी परवा मंत्रालयात घाईघाईने पत्रकार परिषद बोलावली. पक्षाच्या सगळ्या आमदारात घबराट उडवून देण्यासाठी ह्या खेपेस केवळ स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या उमेदवारांनाच तिकिटे दिली जातील असे जाहीर केले. साठे-दादा वाद आता राजीव गांधींपर्यंत जाऊन पोहोचला आहे. दादाही पंतप्रधानांना भेटण्यासाठी दिल्लीला जाऊन आले. राहुल गांधींची मैत्री

आता साठ्यांना कितपत कामी येते ते पहायचे !

□ अपेक्षित उत्तरे

माणूसच्या १० सप्टेंबर १९८३ च्या अंकात आम्ही नवमुंबईतील रामराव आदिक इंजिनिअरींग कॉलेजबद्दल लिहिले होते हे तुम्हाला आठवत असेलच. (निदान आम्हाला तरी आठवते आहे.) महाराष्ट्रात विना अनुदान तत्त्वावर चालू केलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांबद्दल या लेखात आम्ही शंका प्रदर्शित केली होती. आता त्याला एक वर्ष उलटून गेले.

त्याच विषयावर पुन्हा लिहिण्याचा उद्देश हा की, गेल्याच आठवड्यात मुंबई विद्यापिठाच्या सेनेटच्या बैठकीत रामाराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेज आणि कोकण सेवा मंडळाचे पेण इंजिनिअरिंग कॉलेज ह्या दोन संस्थांनी विद्यापीठाच्या ॲफिलिएशनसाठी केलेले अर्ज फेटाळून लावण्यात आले. विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने पुन्हा एकवार ह्या संस्थांची पहाणी करावी अशी सेनेटने शिफारस केली आहे.

गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात जी ४२ अभियांत्रिकी महाविद्यालये उगवली, त्यापैकी सात मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहेत. ह्यापैकी एकूण पाच महाविद्यालयावर सेनेटमध्ये सभासदांनी टीका केली. काही महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी भरमसाठ रकमा उकळत असल्याचे आरोपही झाले. अखेर फक्त दोनच महाविद्यालयांना सेनेटने मान्यता देण्याचे नाकारले. त्यात 'रामराव आदिक शिक्षण संस्थेचा' अग्रक्रम होता.

ज्यांचा अभियांत्रिकी शिक्षणाशी दूरान्वयेही संबंध नाही अशा लोकांनी सुरू केलेल्या ह्या संस्था मूळ धरू शकतील का? यातून मिळवला जाणारा पैसा शैक्षणिक कार्यासाठीच वापरला जाणार का? या संस्थांतून बाहेर पडणारे विद्यार्थी जबाबदार नागरिक तर सोडून द्या; पण इंजिनिअर म्हणून तरी बाहेर पडतील का? असे प्रश्न आम्ही तेव्हा उपस्थित केले होते. त्यांची अपेक्षित उत्तरे आता मिळायला सुरुवात झाली आहे.

□ पुलोद

विधानसभेबरोबर मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकाही जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे मुंबापुरीत आता विरोधी पक्षांनी मोर्चे बांधणीस सुरुवात केली आहे. गेल्या मार्चमध्ये महापालिका बरखास्त झाल्यानंतर आता पुढील तीन-चार वर्षे तरी महापालिकेच्या सभागृहातील धूळ झटकली जाणार नाही असे आम्हाला वाटले होते; पण ह्या लोकसभेच्या निवडणुकीत साऱ्याच विरोधी पक्षांना सहानुभूतीच्या लाटेने तडाखा दिल्याने दादांनी आता महापालिकेच्या निवडणुकाही घेण्याचे ठरविले आहे.

द. म. सुखथनकरांची महसूल खात्याचे सचिव म्हणून बदली झाल्यानंतर जमशेद कांगांची महापालिकेचे प्रशासक म्हणून नेमणूक झाली. कांगा, अफझलपूरकर आणि सोमण हे तिघेही महापालिकेच्या प्रशासनात नवे असल्याने शहराच्या प्रशासनावर आवश्यक तेवढी त्यांची पकड राहिली नाही. कांगांनी तर पूर्वीच्या नगर सेवकांच्या शहराच्या प्रश्नावर अनौपचारिक बैठका घेणेही बंद केले. प्रशासनाची ही विस्कळित झालेली घडी निवडणुकीनंतर तरी व्यवस्थित बसावी ही अपेक्षा. असो.

या लोकसभा निवडणुकांत मराठी माणसाने दगा दिल्याने बाळासाहेब ठाकऱ्यांनी 'युनायटेड वुई फॉल ॲंड डिव्हायडेड वुई स्टँड' ह्या तत्वावर स्वतःच्या बळावर निवडणुका लढवायचे ठरवले आहे. महापालिकेत गेली पाच वर्षे जनता पार्टी, कॉंग्रेस (स), भाजप, रिपब्लिकन आणि महाराष्ट्र मुस्लिम लिग यांनी स्थापन केलेल्या पुरोगामी लोकशाही दलाने राज्य केले. ह्या निवडणुकीतही पुलोद जिवंत ठेवण्याचा विरोधी पक्षांचा इरादा आहे. पुलोदच्या घटक पक्षांतील हे 'प्रेम' प्रत्यक्ष जागा वाटपापर्यंत कितपत टिकते हेच आता पहायचे.

□ अंदाज

हुश्श ! जरा म्हणून उसंत नाही. आता कुठे लोकसभा निवडणुका आटपून आम्ही आमची थंडगार जेली करून घेतली अन ह्या पुन्हा विधानसभा निवडणुका आल्या !

आता पुन्हा सगळे राजकीय अंदाज वर्तवत बसा. छयॅट ! या वेळी आपण मुळीच हे काम करणार नाही. तो विचारस्वातंत्र्य अन भाषास्वातंत्र्याचा दीपस्तंभ की काय असतो तो एकदा आम्ही कसाबसा पेटता ठेवू; पण निवडणुकीचे अंदाज वर्तवणं महाकठीण आहे.

मागच्या खेपेला आम्ही हे अंदाज कित्ती, कित्ती सिन्सियरली वर्तवले. पुन्हा निव्वळ हफिसात बसून हे अंदाज सांगायचं म्हंजे येरागबाळ्याचं काम नोहे ! आमचे काही पत्रकारमित्र चांद्यापासून बांद्यापर्यंत अवघ्या चार दिवसात संचार करून आले. त्यांचे अन् आमचे अंदाज अचूक जुळले; पण पब्लिकने सगळी गोची करून टाकली. केल्यावर अगदी पाणी-चुकलो, लाट-फिरवली.

आम्ही परवा आमच्या न्यूज एडिटरला सांगून टाकलं की, यंदा आम्ही हे अंदाज-बिंदाज काही सांगणार नाही. राहिला लाटेचा किंवा हवेचा प्रश्न. तर ऑफिसच्या गच्चीवर एक कॉम्प्युटराईज्ड होकायंत्र बसवून घेण्याची आम्ही मौलिक सूचना केली. ती अर्थातच त्यांना आवडली.

लाट किंवा हवेचा झोका कोणत्या दिशेने येतोय हे ह्या यंत्रावरून कळेल. उदाहरणार्थ, लाट जर 'सारंग' किंवा 'कथ्थक भवन' जवळ असेल तर यंत्र तसं व्यवस्थित सांगेल. आम्ही काय ? शेवटी माणसं ! चुका करणार. राजीव गांधी अन् प्रणय रॉय यांचा हा छबुला कॉम्प्युटर कधीच म्हणून चूक करत नाही.

आता दादा-वसंत साठे यांच्यात खटका उडतोय असं ऐकतोय. राजकीय तज्ज्ञांनी आता असं करावं, दादांचा अन् साठ्यांचा बायोडाटा कॉम्प्युटरला 'फीड' करावा. उगीच याला भेट अन् त्याला भेट करून आपलं डोकं शिणवून घेऊ नये.

कुणीतरी परवा मस्करीत आम्हाला टोमणा मारला की, पोलिटिकल रिपोर्टिंगला वाईट दिवस आलेत. यारो, वर्तमानपत्रांनाच सध्या दृष्ट लागलीये. नाहीतर पत्रकारांचे आवडते अंतुले आजारी पडते ना.

वर्तमानपत्रांची भेदक खिल्ली एका ऊर्दू शेरमध्ये अशी उडवली आहे.

सुर्खियाँ अखबारकी गलियोंमें
गुल करती रहीं
लोग अपने बंद कमरोंमे पडे सोते रहे.

सुर्खियाँ म्हणजे वर्तमानपत्रातले मथळे. मथळे गल्लोगल्ली किंचाळताहेत. लोक मात्र स्वस्थपणे झोपलेत. लोकहो, एव्हाना तुमच्याही डुलक्या सुरू झाल्या असतील. राईट ?

— विष्णू जयदेव

मुक्काम संगमनेर

हॉस्पिटलची गैरव्यवस्था, पतितपावनचे आंदोलन

आर्थिक दृष्ट्या गरीब असलेल्या सामान्य जनतेला औषधोपचाराची चांगली, सुलभ आणि स्वस्त सोय उपलब्ध व्हावी या हेतूने सुरू झालेली सिव्हिल, कॉटेज हॉस्पिटल्स लोकांच्या दृष्टीने 'मरण घर' बनली आहेत. कुठलंही कॉलेज, सिव्हिल हॉस्पिटल याला अपवाद नाही. कोणतीही सुविधा, व्यवस्था नाही हेच या सर्व हॉस्पिटलचे वैशिष्ट्य आहे.

रोगी बरा होण्यासाठी किमान जे वातावरण हवे, ज्या सोयी, साधने उपलब्ध हवीत ज्यापद्धतीने रोग्याची काळजी घ्यायला हवी त्यांचा इथे नेहमीच अभाव असतो.

बेडवरच्या फाटलेल्या गाद्या, विरलेल्या चादरी, मळलेली कळकट्ट बेडशीटस्, अस्वच्छ फरशी, रंग उडालेल्या भिंती, गंजलेलं, कुरकुरणारं फर्निचर, मुंग्या, डास, ढेकूण, पिसवा यांचा बिनधास्त वावर, वातावरणात भरून असलेली कुंद दुर्गंधी हे अशा हॉस्पिटल्सच नजरेत भरणारं दृश्य चित्र–

अपुरी औषधं, अपुरी साधनं, गरजेपेक्षा कमी असलेला कर्मचारी वर्ग, तक्रार असणारी ॲम्ब्युलन्स, कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा–उपचारासाठी अशा हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या प्रत्येक पेशंटला अनुभवाला येणारं हे विदारक वास्तव.

अशा हॉस्पिटल्सकडून नागरिकांनी आरोग्य रक्षणाची, औषधोपचाराची कोणती अपेक्षा करावी ? इथे सामान्य माणूस नाडलाच जातोय. एकटा दुकटा माणूस स्वतःवर वेळ आल्यावर चरफडत बसण्याशिवाय काहीच करू शकत नाही.

सिन्नर, मनमाड, राजगुरूनगर, येवला, राहूरी अशा कितीतरी ठिकाणच्या अशा अव्यवस्था वेशीवर टांगणाऱ्या बातम्या येऊन गेल्या. त्याचा पाठपुरावा कोणीच केला नाही. संगमनेरच्या हॉस्पिटलच्या अव्यवस्थेसंबंधी तक्रारींना जेव्हा वाचा फुटली, त्याविरुद्धच्या आंदोलनानं जोर धरला, असंतोष संघटित व्हायला लागला, तेव्हा या विषयाच्या खोलात गेलो.

या सुव्यवस्थेच्या आड येणाऱ्या 'शुक्राचार्यांचा' शोध घ्यावा म्हणून संगमनेरच्या कॉटेज हॉस्पिटलचा सर्व्हे केला.

संगमनेरच्या कॉटेज हॉस्पिटलचं हे चित्र पुरेसं प्रातिनिधिक ठरावं.

१९४३ ला सुरू झालेलं हे हॉस्पिटल.

२० पुरुष, ३३ स्त्रिया आणि ३ बाळंतपणाच्या बेड्सची सोय. ३ डॉक्टर्स, ६ नर्सेस, १ क्लार्क, १ एक्स–रे टेक्निशिअन, १ लॅबोरेटरी टेक्निशिअन, स्त्री-पुरुष वॉर्ड कर्मचारी ११, स्विपर ८ असा सगळा ३०–३५ लोकांचा स्टाफ.

संगमनेर आणि शेजारच्या आदिवासी अकोले तालुक्याच्या परिसरातील हॉस्पिटलच्या लाभक्षेत्रातील लोकसंख्या आहे, ६ लाख, १६ हजार, ७०५.

प्रत्यक्षात या लोकसंख्येपैकी लाभ घेणाऱ्यांची संख्याही कमी नाही. गेल्या तीन वर्षाच्या आकडेवारीकडे नजर टाकली तर सहज नजरेत भरेल अशी ही संख्या आहे.

उपचार केलेल्या रुग्णांची संख्या–

	ओ. पी. डी.	आय्. पी.डी
१९८१	१८८५३	३३३५
१९८२	१९७०३	३४१२
१९८३	१९१३४	३८९९

प्रत्येक वर्षी साधारणतः २५००० च्या घरात जाणारी ही संख्या पुरेशी बोलकी आहे. या शिवाय झालेली ऑपरेशन्स वेगळीच. त्यांची संख्या–

	major	minor
१९८१	७१८	३४८
१९८२	१३९७	७०७
१९८३	७२६	४०४

ही संख्याही १५०० पर्यंत जाऊन पोहोचलेली. याशिवाय पोस्टमार्टेम, कुटुंबकल्याणाचे राबविले जाणारे कार्यक्रम, होणाऱ्या शस्त्रक्रिया, निरनिराळी रोगनिदान शिबिरे इ. इ. कार्यक्रम वर्षभर चालूच असतात.

सेवाभावी संस्था मदतीला (?) असल्या तरी खरा सहभाग हा या हक्काच्या लोकांचाच.

हॉस्पिटलची ही कर्मचारी संख्या पंधरा–सोळा वर्षापासून एवढीच कायम आहे. त्यात वाढ नाही. कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ ही बेड्सच्या वाढणाऱ्या संख्येवर अवलंबून असते.

३५ बेड्सची क्षमता असलेल्या कॉटेज हॉस्पिटलमध्ये आधीच ५६ बेड्स मारून मुटकून बसवलेले. कर्मचारी संख्याही ३५ बेड्सच्या हॉस्पिटलची, तरीही ५६ बेड्ससाठी गृहीत धरलेली.

१९७१ ला नुसती संगमनेर शहराची लोकसंख्या ४५००० होती. ती १९८१ ला ७१००० म्हणजे २६००० ने वाढलेली. लोकसंख्येच्या प्रमाणात रोग्यांची संख्याही वाढलेली; पण कर्मचारी संख्या मात्र तेवढीच; १०।१५ वर्षांपूर्वीची साधनसामुग्रीही त्याच जुन्या प्रमाणातली, फर्निचरही दहावर्षांपूर्वीचे.

काही तरी सुविधा आलेल्या रोग्याला पुरवायला हवी म्हणून मग गंजलेल्या मोडक्या फर्निचरचाच वापर करायला लागतो. औषधांच्या कोट्यात वाढ नाही. गाद्या, चादरी, बेडशीट्स यांचा एक सेटसुद्धा धड नाही. तिथं जास्त डबल सेट आणि त्यांच्या स्वच्छतेची अपेक्षा कोठून करावी ?

हॉस्पिटलची अद्ययावत सेवा अहोरात्र उपलब्ध असावी अशी नागरिकांची अपेक्षा. ती स्वाभाविकही आहे.

खाजगी डॉक्टरांची महागडी 'सेवा' परवडत नाही म्हणून अशा स्वस्त सेवा उपलब्ध असलेल्या कॉटेज हॉस्पिटल्समध्ये येणाऱ्यांची संख्याही जास्त. कर्मचाऱ्यांनी सदैव हसतमुख सज्ज असावं अशीही येणाऱ्यांची अपेक्षा; पण त्यांच्या अडचणींचा विचार करायला कुणीच तयार नाही.

एक्सरे टेक्निशिअन, लॅब टेक्निशिअन एकेकच. नेमलेल्या वेळेव्यतिरिक्त काम असल्यास बोलवावे लागते. नर्सची अपुरी संख्या, आठवड्याची सुट्टी, नाईट ड्युटी आणि रोजच्या कामासाठीची व्यवस्था या सर्वांचा मेळ घालून सर्वांना समाधानी राखणं ही

इथल्या व्यवस्थापनाची तारेवरची कसरतच आहे.

गैरव्यवस्था म्हणून ओरड करायला आपण नेहमीच मोकळे असतो; पण व्यवस्थापनाची गैरसोय मात्र लक्षात घेत नाही.

खरं तर या कर्मचाऱ्यांसाठी हॉस्पिटलच्या आवारात क्वार्टर्स असायला हव्यात. म्हणजे ड्युटी व्यतिरिक्तही त्यांची सेवा तत्परतेने आणि सहज उपलब्ध होईल. संगमनेरच्या कॉटेज हॉस्पिटलच्या आवारात फक्त प्रमुख मेडिकल ऑफिसरना क्वार्टर आहे. इतरांना नाहीत. इतर ठिकाणच्या कॉटेज हॉस्पिटल्सच्या बाबतीत वेगळी परिस्थिती नाही.

कॉटेज हॉस्पिटलचे व्यवस्थापनही सदोष आहे.

सर्व स्टाफ नगरपरिषदेचा, डॉक्टरांची नेमणूक सरकारकडून. डॉक्टरांच्या नियमानुसार बदल्या; पण बाकी स्टाफ कायमचा आपल्या जागेवर घट्ट. त्यामुळे मेडिकल ऑफिसरने जरा शिस्त आणण्याचा प्रयत्न केली तरी हे रुळलेले कर्मचारी फारसे दाद देत नाहीत. त्यांना माहीत असतं डॉक्टर कायमसाठी नाही.

त्यामुळे अशा शिस्तीला, सुधारणांना प्रतिसाद दिला तरी तो तात्पुरता असतो. जमाना झालेल्या किती तरी कर्मचाऱ्यांनी आपले प्रशस्त बस्तान बसवले आहे. हॉस्पिटलमध्ये कर्मचारी असलेल्यांचे बाहेर 'डॉक्टर' म्हणून उद्योग भरभराटीला आलेले आहेत.

हॉस्पिटलमधील मोफत असलेल्या सेवेसाठीही प्रत्येक कर्मचाऱ्याचा स्वतःचा फीचा दर ठरलेला. नडलेला माणूस नाकारू शकत नाही. नाकारलं तर अडवणूक होते. कर्मचाऱ्यांच्या अशा वेळच्या थंड प्रतिसादानं माथं भडकलं तरी चडफडत बसण्याशिवाय अडलेला माणूस काहीच करू शकत नाही.

मेडिकल ऑफिसरना हॉस्पिटलसाठी कोणताही खर्च परस्पर करण्याची परवानगी नाही. नगरपरिषदेच्या हॉस्पिटलसमध्ये प्रत्येक 'चार आणे' खर्चालाही नगरपरिषदेची पूर्वपरवानगी आवश्यक असते. नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद असोत किंवा सरकारनियुक्त प्रशासक असोत रूळलेल्या नियमांच्या आणि लालफितीच्या फाईलमधून प्रत्येक कागद पुढे सरकत असल्याने, साध्या लॉन्ड्रीवाल्याचे बिल द्यायलाही दोन-तीन महिने जातात. पन्नास-शंभर रुपयांसाठी इतके दिवस गेल्याने पुन्हा कोणी या हॉस्पिटलच्या कामाला हात लावायलाही तयार होत नाही.

सामान्य खर्चासाठी ही स्थिती तर फर्निचर, औषधं, रंगसफेदी, असल्या भांडवली खर्चासंबंधी बोलायलाच नको.

तीन-चार लाख रु. आवश्यकता असलेल्या या हॉस्पिटलचं वर्षाचं बजेट आहे फक्त एक लाखाचं.

बजेटमधील तरतुदी आणि आवश्यक असणाऱ्या तरतुदीमधील ही तफावत दूर कशी करणार?

'अव्यवस्थे' शिवाय ही तफावत भरून कोण काढणार?

नगरपरिषद आवश्यक तेवढा खर्च करू शकत नाही तर शासनानं दखल घ्यायला हवी. पुरेसे अनुदान द्यायला हवे.

१९७२/७३ पासून हॉस्पिटलसाठी संगमनेर नगरपरिषदेला शासनाकडून अनुदान आलेलं नाही. अनुदान नाही, खर्च केलेली रक्कम वसुल होण्याची शक्यता नाही म्हणून खर्च कमी, म्हणून बजेटमध्ये आवश्यकतेपेक्षा तरतूद कमी, म्हणून अव्यवस्था.

लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत. सरकार नियुक्त प्रशासक अजें-विनंत्याशिवाय काही करू शकत नाहीत. शासनाकडे आपल्या मागण्यांची दाद लावून घेण्यासाठी लोकनियुक्त प्रशासन हवे.

कित्येक वर्षांपासून या कॉटेज हॉस्पिटलची अशीच रडकथा आहे. नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या या व्यवस्थेच्या दुरुस्तीचा कोणत्याच राजकीय पक्षाने कधीच गांभीर्याने विचार केला नाही. सगळेच पक्ष फक्त निवडणुकांपुरते आहेत.

साखर कारखाना, तंबाखू, विडी कारखाने यामुळे प्रामुख्याने कामगार वर्ग असलेल्या या परिसरात अद्ययावत सर्वसुखसोयींनी सुसज्ज सिव्हिल हॉस्पिटल असणे ही जीवनावश्यक गरज आहे

गेल्या वर्षभरात पुणे-अमळनेर, भगुर-पुणे, नासिक-पुणे या एस. टी. गाड्यांना संगमनेरच्या परिसरात झालेल्या अपघाताच्यावेळी मदतीसाठी तत्परतेने धावून गेलेल्या पतितपावन संघटनेच्या कार्यकर्त्यांना ही परिस्थिती प्रत्यक्ष अनुभवास आली.

या अवस्थेमुळे रोग्याला पुरेसे उपचार मिळत नाहीत, मेडिकल ऑफिसर हतबल आहेत, नगरपरिषद शासनाकडे बोट दाखवून गप्प आहे-- ही परिस्थिती बदलायला हवी.

संघटनेने त्यासाठी आंदोलन सुरू केले आहे. लोकजागृती केली आहे. जनमताचे दडपण वाढल्याशिवाय यात सुधारणा होणार नाहीत.

संबंधितांना हलवायला, जाब विचारायला संघटित प्रयत्नच हवेत. तरच सुधारणा शक्य आहे.

त्यामुळेच व्यवस्थेचा हेतू साध्य होणार आहे.

—विनय गुणे

परसूच्या पशुकथा

वसंत सबनीस

किंमत १२ रुपये

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्त्र श्वापदांचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांच्या या कथा...

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

ह्या ना त्या निमित्ताने

श्यामची तारांबळ व राधाचा आनंद

फिरोझ रानडे

कधी नव्हे ती आजकाल श्यामची सकाळी–सकाळी फार तारांबळ होऊ लागली होती. आजकाल म्हणजे नक्की म्हणायचं म्हणजे नवीन वर्ष सुरू झाल्यापासून व त्याहूनही जास्त नक्की सांगायचे म्हणजे राजीवजी पंतप्रधान झाल्यापासून, असे म्हणता येईल.

श्याम तारांबळीत होता व त्याचा आनंद राधा कॉटवर पडल्या पडल्या मोठ्या आनंदाने लुटत होती. तिचा मुलांना कॉलेजला व श्यामचा कचेरीत पाठवायचा डबा भरून झाला होता. कामाची बाई झाडलोट करण्याकरता यायला अजूनी अर्धा–पाऊण तास अवकाश होता. त्यामुळे तिच्या मनावर कामाचे कोणत्याही तऱ्हेचे दडपण नव्हते. श्याम कचेरीला जाण्याचे आपले कपडे, पट्टा, रुमाल, बुट व त्याला लागणारे मोजे शोधण्याच्या गडबडीत होता व राधा त्याची मजा चाखत होती. आता नवरा तारांबळीत वा गडबडीत असला तर बायकोने असे आनंदून जायचे काय कारण होते; पण सगळ्याच गोष्टींची–त्यातून बायकांना आनंद होणाऱ्या गोष्टींची इतकी प्राध्यापकी कारण–मीमांसा करून कसे चालेल?

पूर्वी असे होत नसे. पूर्वी म्हणजे नक्की सांगायचे म्हणजे नवीन वर्ष सुरू होण्यापूर्वी वा त्यातूनही जास्त पक्के सांगायचे म्हणजे राजीवजी पंतप्रधान होण्यापूर्वी असे होत नसे.

पूर्वी असे होत नव्हते. राधाचे डबे वगैरे भरून झाले व ती कपाळावरचा घाम पुसत पुसत खोलीत आली तरी श्याम आपला म. टा. ला घेऊन शांतपणे पहुडला असे.

'आज तुम्हाला ऑफीसला जायचे आहे की नाही?' राधाचा कमीत कमी कर्कश आवाजातला प्रश्न. श्यामचे त्याला पडल्या–पडल्याच शांततल्या शांत आवाजात उत्तर 'ऑफीसला जायचे आहे ना म्हणून काय विचारते आहेस? जायचे आहे तर!'

'मग चांगले सव्वा–नऊ वाजले आहेत तरी आपले झोपूनच आहात.'

'झोपतोय कुठला?' श्याम उठून बसत म्हणत असे,' हा म. टा. तला वाचकांचा पत्रव्यवहार वाचतो आहे. खरच, ह्या म. टा. च्या लोकांनी वाचकांच्या पत्रव्यवहाराला एक संपूर्ण पानच द्यायला पाहिजे.

आता हेच पत्र बघ. मराठीत इंग्रजी शब्दांचा फार वापर होतो अशा अर्थाची तक्रार करणाऱ्या ह्या निष्ठावान माणसाच्या पत्रातच मुळी सात-आठ फारसी शब्द आहेत. 'रस्ता क्रॉस करतो' ह्या वाक्यातला क्रॉसला ह्यांचा विरोध आहे; पण रस्ता हा पण परकीय भाषेतला शब्द आहे हे त्यांना माहीतच नाही.'

पण राधाला इंग्रजी शब्दात वा फारसी शब्दात काडीचाही रस नव्हता.

'त्याशी मला काही कर्तव्य नाही. तुम्ही उठा. मला पडू दे पाच मिनिटं. हल्ली इतके थकायला होत.'

इतकी थकली आहेस तर फक्त पांच मिनिटं पडून कसे चालेल? असा श्यामला प्रश्न पडला; पण प्रश्न पडला तरी त्याला कॉटवरून उठणे भागच पडत असे.

मग त्याची दाढी, कपडे, चहा, खाणे वगैरे होईपर्यंत १०–१०॥ वाजून जात व ते तसे वाजले म्हणजे मग श्याम डुलत–डुलत कचेरीला जायला निघत असे.

पण आता हे चित्र पार पलटले होते. आता म्हणजे नक्की केव्हा वा त्याहूनही जास्त पक्के नक्की म्हणजे केव्हा हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आले असेलच.

नवीन राज्य आले, नवे पंतप्रधान आले. नव्या पंतप्रधानांचा चेहरा–मोहराच वेगळा होता असे नाही तर त्यांची कामाची पद्धतही वेगळी होती.

आता दर दिवसाला तीन-तीन, चार-चार फर्माने निघू लागली होती. सगळ्या राज्य-संस्थेचा कायापालट करून टाकण्याचा त्यांचा विचार होता. राज्यव्यवस्थेत कोणताही गलथानपणा खपवून घेतला जाणार नव्हता. सगळी सरकारी कामे आता पटापट होणार होती.

त्या कायापालटाच्या कार्यक्रमातले पहिले फर्मान म्हणजे सगळ्या सरकारी नोकरांनी अगदी साहेब-नोकरांनीसुद्धा कचेरीत अगदी वेळेवर आले पाहिजे हे होते.

झाले, फर्मान निघाल्यावर सरकारी चक्रे फिरू लागली. राजीवजींनी जे सांगितले तेच प्रधानजींनी म्हणजेच मिनिस्टरजींनी सांगितले मग तेच चिटणीसजींनी म्हणजे सेक्रेटरीजींनी सांगितले. मग श्यामच्या मोठ्या साहेबांनी खात्यातल्या सगळ्या लहान-मोठ्या साहेबांची सभा घेतली व त्यात राजीवजींनी, प्रधानजींनी व चिटणीसजींनी जे सांगितले तेच म्हणजे, ह्यापुढे गलथानपणा खपवून घेतला जाणार नाही, सगळी कामे पटापटा झाली पाहिजेत म्हणून सांगितले.

'ह्याचा अर्थ आतापर्यंत गलथानपणा खपवून घेतला जात होता तर?' श्याम मनाशी म्हणाला. आतापर्यंत साहेबांनी सांगितलेले एका कानाने ऐकायचे व दुसऱ्या कानाने सोडून द्यावयाचे अशी श्यामची इतर सहकाऱ्यांप्रमाणेच भावना होती. किंबहुना देवाने दोन कान त्याच्या करताच दिले आहेत असा त्याचा विश्वास होता.

पण ह्या वेळी एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देणे भयावह होते. कारण गलथानपणा खपवून घेतला जाणार नाही वगैरे बरोबरच सगळ्या सरकारी कर्मचाऱ्यांनी अगदी वेळेवर आलेच पाहिजे असेही फर्मान निघाले होते. वेळेवर आलं नाही तर कडक शिक्षा होणार होती.

आणि बरोबर तेव्हापासून श्याम व तत्सम सरकारी नोकर व अधिकारी वर्गाच्या तारांबळीला सुरुवात झाली होती.

प्रथम प्रश्न होता तो म्हणजे 'वेळेवर' यायचे म्हटले तर कचेरीची 'खरी' वेळ

पृष्ठ २९ वर

ज्येष्ठ पत्रकार श्री. अनंतराव भालेराव यांच्या (१) पेटलेले दिवस (२) आलो याच कारणासी, या दोन पुस्तकांचे प्रकाशन फेब्रुवारी दिनांक तीनला औरंगाबाद येथे होत आहे.

मराठवाड्यातील तरुणांचे दीपस्तंभ....अनंतराव

सुधाकर डोईफोडे, नांदेड

ते मंतरलेले दिवस होते.

हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्याने विलक्षण वेग घेतला होता. एकीकडे रझाकारांचे अत्याचार वाढत होते तर त्याला प्रत्युत्तर म्हणून प्रतिकाराला विलक्षण धार आली होती. हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्य लढा प्रामुख्याने स्टेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चालला होता. प. पू. स्वामीजी व त्यांचे सहकारी म. गांधींचे नेतृत्व मानत असले तरी संस्थानातील लढा केवळ सत्याग्रहाच्याच अंगाने चालला होता असे नव्हे. किसान-दलाच्या नावाने सशस्त्र स्वयंसेवकदल उभारून प्रदेशाची मुक्ती, निजामी सैनिक व पोलीस यांच्याशी मुकाबला, रझाकारांचे निर्दालन या प्रकारे तेजस्वी तरुण रणांगणावर झुंजत होते. बँका लुटणे, गाड्या उलथून पाडणे, हे प्रकार तर त्यात अंतर्भूत होतेच. 'ऑपरेशन उमरी बँक' हे तर निजामी स्वातंत्र्य लढ्यातील सोन्याचे पान व त्या मोहिमेचे अध्वर्यू. अनंतराव भालेराव हे जनतेच्या गळ्यातील ताईत झाले नसतील तर नवलच.

अनंतरावांचे नाव पहिल्यांदाच ऐकले तेव्हा मी सात-आठ वर्षांचा असेन. माझे वडील स्टेट काँग्रेसचे जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते होते. प्रख्यात स्वातंत्र्यसैनिक श्यामराव बोधनकर यांच्या आमच्या घराची सामायिक भिंत. आणखी एक नेते वैद्य गोपाळशास्त्री देव यांचे घर हाकेच्या अंतरावर. मी, सुरेश बोधनकर, नंदकुमार देव बालमित्र. हेच कशाला, आमच्या इतर मित्रांचे वडील किंवा बंधू स्वातंत्र्य आंदोलनाशी संबंधित होते. घरात राजकारणाची चर्चा व तदनुषंगिक कार्य उघड, गुप्तहालचाली. बाहेर चळवळीची धग वाढत चाललेली. त्याचा परिणाम आम्हा लहान मुलांवरही झाल्याशिवाय कसा राहील? आमचे खेळही चळवळीतील प्रसंगांवर आधारलेले असत. निजामाच्या पोलिसांवर काल्पनिक बॉंबफेक करणे, निजाम व कासीम रझवी यांची चित्रे काढून ती जमिनीत पुरणे, कधी प्रत्यक्ष मिरवणुकी काढून घोषणा देणे यात आम्हाला फार पुरुषार्थ वाटत असे. माझ्या वडिलांना पोलिसांनी पकडल्यावर व श्यामरावबाबा निसटून बॉर्डर पार गेल्यावर आमची घरे पोलिसांच्या पाळतीची ठिकाणे बनली होती. या सुमारास धाडसाची कृत्ये करणारे अनंत भालेराव, रांजणीकर, साहेबराव बारडकर हे आमचे हिरो बनले होते. त्यावेळेपर्यंत यांच्यापैकी कुणालाही आम्ही पाहिलेले नव्हते; पण त्यांचे पराक्रम कानावर येत. त्यांना पाहण्याची विलक्षण उत्सुकता होती. एके दिवशी सुरेशच्या घरी खेळत असताना आत्याबाई वर आल्या. घाईघाईने घराबाहेर जाणाऱ्या एका मुंडासेवाल्याकडे त्यांनी बोट दाखविले. फाटका शर्ट, जाडेभरडे मराठाऊ धोतर, विटलेले मुंडासे अशा वेषातील पावणेसहाफूट उंचीचा, रापलेल्या चेहऱ्याचा तो इसम आमच्याकडे ओझरती दृष्टी टाकून निघून गेला. आत्याबाई म्हणाल्या, 'तो अनंत भालेराव होता.'



मतदारांची निष्ठा

आम्ही ज्यांना पाहिले, ते खरोखर अनंतरावच होते की नाही कुणास ठाऊक; पण अनंतराव म्हणजे मुंडासेवाला माणूस ही समजूत मनात इतकी पक्की रुतून बसली आहे की, आतापर्यंत अण्णांशी एवढा निकटचा संपर्क येऊनही अनंतरावांची आठवण जागी झाली की, फेटेवाला चेहराच प्रथम डोळ्यापुढे येतो.

स्वातंत्र्य आंदोलनात अण्णांचे कार्यक्षेत्र नांदेड जिल्हा होते. स्वातंत्र्यानंतर स्टेट काँग्रेसमधील पुरोगामी लोकांनी 'लीग ऑफ सोशॅलिस्ट वर्कस्' ही संघटना काढली होती. पहिल्या निवडणुकीत अण्णा बिलोली मतदारसंघातून हैद्राबाद विधानसभेसाठी उभे राहिले. त्यांच्याबरोबर काम केलेले शेकडो कार्यकर्ते बिलोलीत विखुरलेले होते. प्रत्येक गावी अण्णांचे देवदुर्लभ स्वागत झाले. त्यांना मते देण्याच्या शपथा लोकांनी घेतल्या. प्रत्यक्ष निकालात चमत्कार घडला. अण्णांचा पराभव झाला. काँग्रेसचे उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आले. (मला वाटते अण्णांचे डिपॉजिटही गेले असावे!) हे कसे घडले? त्याचे उत्तर अण्णा हसून देतात; ते म्हणाले पराभवानंतर मी काही खेड्यांना भेटी दिल्या. तेव्हा माझ्या पराभवाने शेतकरी व्यथित झालेले दिसत होते. लोक म्हणत, 'अण्णा तुमच्याबिगर आम्ही दुसऱ्याला मत कसं देणार? आम्ही तुमच्या काँग्रेसलाच मतं दिल की, मंग इथे कसं झालं!' आंदोलनात अण्णांनी काँग्रेसचे नाव खेडोपाडी नेले. अण्णा काँग्रेसबाहेर पडले; पण लोकांनी काँग्रेसला मत म्हणजेच अण्णांना मत असे गृहित धरून अण्णांचा निष्ठेने पराभव केला होता!

पुढे चालून अण्णांचे हैद्राबादला स्थलांतर झाले. मराठवाडा साप्ताहिकाची धुरा त्यांनी उचलली. हैद्राबादला गेलो की मी नारायण-

गुडघातील मराठवाडा कार्यालयात जात असे. अर्थात असे प्रसंग चार पाच वेळा आले त्यापैकी एकदोन वेळाच अण्णांची कार्यालयात भेट झाली असेल. मला वृत्तपत्र व्यवसायाची लहानपणापासून गोडी होती. पत्रकार व्हायचे हे मी लहानपणीच ठरवून टाकले होते. अण्णा माझे त्यावेळी दैवत होते. पूर्वी रायफल रोखणारे अण्णा आज त्यांच्या लेखणीतून त्याहीपेक्षा भेदक मारा करीत होते. मला हैद्राबादला राहून मराठवाड्यात काम करण्याची परवानगी घरून मिळणे शक्य नव्हते पण नांदेडला राहून मी अनंतरावांच्या लिखाणाचा अभ्यास करू लागलो. विविक्षित शब्दच अण्णांनी का वापरला असेल? त्याऐवजी दुसरा शब्द वापरला असता तर वाक्याचा प्रभाव वाढला असता की घटला असता. यावर मी विचार करी. त्यांच्या पद्धतीने निरनिराळ्या वाक्यरचना करून पाही. अण्णांच्या अनुपस्थितीत त्यांना गुरू करून एकलव्याच्या निष्ठेने मी त्यांच्याकडून धडे घेत होतो. त्यांच्या लिखाणाचे अनुकरण करण्याचा माझा हव्यास होता. पुढे पत्रकार म्हणून स्थिर झाल्यावर अण्णांशी बोलताना मी हा अनुकरणाचा इतिहास त्यांच्या कानी घातला तेव्हा ते थोडे उसळलेच. 'कुणाचं अनुकरण करून कुणी मोठा होत नसतो. प्रत्येकाच्या मनाची जशी घडण असते तशी त्याची शैली ठरते. तू अनुकरण सोडून दे. स्वतःची शैली तयार होऊ दे.' यानंतर मी अण्णांच्या लेखनशैलीचे अनुकरण करणे सोडून दिले; परंतु त्यांचा अभ्यासूपणा, निर्भयपणा, आक्रमक आवेश हे आजही माझ्या दृष्टीने अनुकरणीय गुण आहेत.

प्रत्येकाच्या आयुष्यात अत्यंत आनंदाचे तसेच अतीव दुःखाचे प्रसंग येत असतात. अण्णांशी झालेला माझा जाहीर वाद हा माझ्या दृष्टीने अतीव दुःखाचा क्षण. त्याचे असे झाले. कलंबर येथील सहकारी साखर कारखान्याला मंजूरी मिळाली तेव्हा अनंतरावांनी 'मराठवाड्यात' एक अग्रलेख लिहिला. कलंबरला मंजूरी राजकीय दबावाने मिळाली. वास्तविक नांदेडपेक्षा मागासलेल्या परभणी जिल्ह्यातील डोंगरकडा साखर कारखान्याला मंजुरी मिळणे आवश्यक होते असा त्यांच्या लिखाणाचा आशय होता. या प्रतिवादाने मी विलक्षण संतापलो. त्या तिरीमिरीत अत्यंत रागाने एक पत्र मी अण्णांना पाठवून दिले. तुम्हाला नांदेडविषयी आकस आहे, नांदेडच्या कित्येक योजना इतरत्र व खुद्द औरंगाबादला ओढून नेल्या त्यावेळी तुम्ही गप्प बसलात व नांदेडच्या एका प्रकल्पाला मान्यता मिळताच, तुम्ही मागास जिल्ह्याचा सिद्धांत काढून, परभणीला नांदेडविरूद्ध चिथावीत आहात; असे आरोप त्यात केले होते. अण्णांनी हा लेख मराठवाड्यात प्रसिद्ध केला व त्याने संपूर्ण महाराष्ट्रात गदारोळ उडाला. लेख, मुलाखती, अग्रलेख, मोर्चे, अंक जाळणे हे सारे प्रकार त्यावेळी घडून आले. मराठवाड्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील 'लोकसत्ता, नवशक्ती, तरूण भारत' या वृत्तपत्रांनीही अग्रलेख लिहिले. बहुतेकांनी माझी बाजू घेतली होती. पत्रकार म्हणून साऱ्या महाराष्ट्राच्या नजरेस मी तेव्हा आलो. मराठवाड्यातील वृत्तपत्रांनी तर 'गुरूशिष्यवाद' 'कृष्णार्जुन युद्ध' अशीच विशेषणे या वादाला दिली होती. याच विषयावर मी माझ्या प्रजावाणीतून अकरा अग्रलेख लिहिले प्रत्येक अग्रलेखात हल्ल्याचा विषय वेगवेगळा होता. शेवटचा म्हणजे बारावा अग्रलेख अनंतरावांवर लिहिला होता. मी अगदी बेभान झालो होतो.

पत्रकार अनंतराव !

पण त्याच वेळी तल्यारखान खटल्याचा निकाल लागून त्यात अनंतरावांना शिक्षा ठोठावण्यात आली. मी कंपोझिंगला दिलेला अग्रलेख परत घेतला. मला फार वाईट वाटू लागले. रागाच्या भरात आपण फार वाहवत गेलो. आपली भावना कदाचित बरोबर असेल पण आपली भाषा योग्य होती काय? एवढी कडक, क्वचित अर्वाच्य भाषा वापरणे आवश्यक होते काय? तल्यारखान खटल्यात वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या एका मूलभूत मुद्द्यासाठी ते लढत असताना आपण जिल्हावाद उपस्थित करून त्यांना मनस्ताप देणे कितपत शहाणपणाचे होते? मला सारखे रडू येऊ लागले. आपण फार मोठा अपराध केला असे वाटू लागले. अण्णा मोठे होते, जेल भोगून ते अधिक मोठे झाले. आपण मात्र क्षुद्र ठरलो अशी भावना मनात घर करून बसली. तुरुंगातून अण्णा सुटल्यावर मी त्यांना भेटावयास गेलो तेव्हा त्यांच्या मनात कटुतेचा लवलेशही नव्हता. त्यांनी माझे क्षेम विचारले, मी अधिक लहान होऊन परतलो.

अण्णांनी हैद्राबाद लढ्यात जी महत्त्वाची कामगिरी बजावली त्याची विशेषअशी माहिती मराठवाड्याबाहेर फारशी नसेल; पण पत्रकार म्हणून त्यांनी साऱ्या महाराष्ट्रावर आपला ठसा उमटविला आहे. मराठवाड्याच्या मनात अविकसितपणाची भावना घर करून बसलेली आहे. त्यातून न्यूनगंडाची भावना वाढीस लागते. पश्चिम महाराष्ट्रापुढे नमून वाकणे श्रेयस्कर वाटू लागते. विशाल मुंबई राज्यात मराठवाडा विनाअट सामील झाला. पण उपेक्षेची भावना दूर करण्यात पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वाला अपयश आले. 'मराठा' व 'लोकसत्ता' ही मुंबईची मातब्बर वृत्तपत्रे. कशावरून तरी त्यांचा अनंतरावांशी वाद झाला. ह. रा. महाजनी व आचार्य अत्रे यांनी आपल्या घणाघाती लेखणीने अनंतरावांवर आक्रमण केले आम्ही सारे दिग्मूढ झालो; पण अनंतरावांनी या दोन दिग्गजांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले. आत्मविश्वासाने परिपूर्ण, अहंकाराचा लवलेश नसलेले, तरीही स्वहीनपणाचा देखील अंश नसलेले अत्यंत आक्रमक असे ते प्रत्युत्तर होते. साऱ्या मराठवाड्याचीच मान उंचावणारे असे ते लिखाण होते. मराठवाडाही ताठ मानेने उभा राहू शकतो हे त्यांनी दाखवून दिले. मला तिसऱ्यांदा डहाणूकर पारितोषिक मिळाले व लगेच अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली. तेव्हा जालन्याला एक व नांदेडला एक असे माझे दोन सत्कारसमारंभ अण्णांच्या अध्यक्षतेखाली झाले. दोन्ही प्रसंगी त्यांनी जे उद्गार काढले ते मराठवाड्यातील पत्रकारांसाठी तरी माननीय आहेत. ते म्हणाले, 'मला (अण्णांना) वृत्तपत्र सृष्टीत आजवर मिळालेल्या बहुमानांचा इथे उल्लेख झाला. मी आता जुना झालो. आज सुधाकरला दोन बहुमान मिळाले आहेत. मराठवाड्यात पात्र व्यक्तींची उणीव मुळीच नाही; पण आपण हीनत्वाची भावना विनाकारणच बाळगून जागेवर कुठत बसतो व दुसऱ्यांना दोष देतो. मराठवाड्यातील तरुण आत्मविश्वासाने वागतील तर महाराष्ट्रातच काय पण संपूर्ण देशातही चमकू शकतील. या क्षेत्रात यश मिळविणारा मी पहिला नाही की सुधाकर शेवटचा नाही. सर्वच क्षेत्रात मराठवाड्यातील तरुणांची रांग लागावी अशी माझी इच्छा आहे.'

अण्णा, तुम्ही काही म्हटलेत तरी या क्षेत्रात तुम्ही सर्वप्रथम हेच सत्य आहे. मराठवाड्यातील तरुणांचे तुम्ही दीपस्तंभ आहात आणि दीपस्तंभ कधीच जुना होत नसतो. □

भोपाळचा भीषण अपघात आणि आपले औद्योगिक धोरण

गीता साने

शेकडो माणसांचा बळी घेणारा आणि अनेकांना जायबंदी करणारा, भोपाळचा आसुरी अपघात झाल्याला, सहा-सात आठवडे होऊन गेले आहेत. मध्यंतरी निवडणुकांच्या गडबडीत ह्या अपघाताचा विषय थोडा मागे पडला होता; पण आता त्याची चर्चा पुन्हा सुरू झालेली आहे. तथापि अजून तरी ती चर्चा मुख्यत्वे अपघाताची कारणे आणि जबाबदारी किंवा नुकसानभरपाई ह्यांच्यावर केंद्रित झालेली आहे. भोपाळच्या अपघाताने आपल्यापुढे टाकलेला मुख्य प्रश्न, आपल्या औद्योगिक धोरणाचा आहे. एवढेच नव्हे तर त्या धोरणाचा पुनर्विचार करताना मागास भारतीय समाजाला कोणते उद्योग लाभदायी होतील आणि कोणते उद्योग पेलतील ह्याचाही विचार होणे आवश्यक आहे.

मागास समाज दैववादी-परंपरावादी असतात. जे आजवर होत आले, ते डोळे मिटून करावे, त्याच्या पलीकडचा प्रसंग उभा राहिला, तर दैवाला दोष देत दुःख सोशीत रहावे हा मागास समाजांचा स्थायीभाव असतो. भारतीय समाज ह्या दृष्टीने अजूनही मागास ह्याच सदरात घालावा लागतो. यंत्राधिष्ठित उद्योगांचे ह्या समाजात विलक्षण आकर्षण असले तरी यंत्र हे त्यांच्या स्वभावाशी विसंगत आहे. कारण यंत्र हे माणसाने सृष्ट नियमांच्या अभ्यासाने निर्माण केले आहे. यंत्राचा जनक माणूस आहे. देव किंवा दैव नाही. त्याच्या निर्माणात काही गूढ गुपित लपलेले नसते, तसेच त्याचा वापरही कार्यकारणावरच अवलंबून असतो. यंत्राचे वरदान स्वीकारताना त्याची काही पथ्ये काटेकोरपणे पाळावी लागतात. दैववादी-परंपरावादी समाजाला ही पथ्ये सांभाळणे कठीण जाते, त्यामुळे पथ्येच दृष्टीआड होतात. मागास समाजाच्या सर्वच थरांना दैववादाचा शाप असल्याने औद्योगिकरणाच्या प्रत्येक पातळीवर त्याचा परिणाम दिसून येतो.

कोणताही नवा उद्योग उघडताना, त्यासाठी भारतात, केंद्र सरकारचा परवाना घ्यावा लागतो. परवाने देताना, त्या उद्योगाची संपूर्ण माहिती करून घेण्याची गरज किंवा कुवत, परवाने देणाऱ्या अधिकारी असणाऱ्यांना सहसा नसते. त्यांचे उद्दिष्ट एकच असते 'आमच्या देशातही कारखाने आहेत' हे दाखवणे. मग तो कारखाना सिमेंटचा असो, पोलादाचा असो वा आपल्या उत्पादनांत प्राणघातक प्रक्रिया वापरणारा असो देश औद्योगिक उत्पादनात स्वयंपूर्ण करणे आणि विदेशी चलन वाचवणे, हे दुय्यम हेतूही असतात. अलीकडे मागास भागात कारखाने उघडण्यास उत्तेजन देण्याचेही धोरण आहे. त्यामुळे त्या प्रदेशात उद्योग उघडण्यास परवाना फार जिकीर न करता मिळतो. त्यानंतर जागा, पाणी, वीज, वाहतुकीची व्यवथा इत्यादींचो सोय करावयास तयार असणाऱ्या राज्यात, उद्योजकाला जमीन मिळवून दिली जाते. मंत्रीगण सुखावतात- 'आमच्या राज्यातही औद्योगिकरण होते आहे, 'भेल' (Bharat Heavy Engineering) आहे, 'कार्बाइड आहे' इत्यादी.

परवाना देताना फारशी चिकित्सा केली जात नाही. जमीन निवडतानाही जागेच्या योग्य-योग्यतेचा विचार होताना दिसत नाही. बरौनी आणि मथुरा येथील तेलशुद्धीचे कारखाने, तेथे कच्चा माल उपलब्ध नसूनही उभारण्यात आले. बरौनीच्या कारखान्याने गंगाकाठाची शेकडो एकर, अत्यंत सुपीक जमीन, शेताखालून काढून घेतली, तर मथुरेच्या कारखान्याच्या प्रदूषणाचा, ताजमहालाला उपसर्ग पोचू नये म्हणून उपाय-योजना विचारात घेतल्या जात आहेत. भोपाळचा कारखाना 'वस्तीत नव्हता वस्ती मागून वाढली. तो मोकळ्या जागेतच होता' हे म्हणणे मान्य केले तरी, कारखान्याची जागा काही विचार करून निवडली असती तर स्टेशनपासून एक मैलाचा आत कारखाना उभा केला नसता. गॅस जेव्हा मोठ्या प्रमाणावर वाहिला आणि भोपाळ स्टेशनावर त्याचा प्रभाव पडला, तेव्हा स्टेशनमध्ये उभी असलेली गाडी, पुढे पाठवून दोन्ही बाजूच्या स्टेशनांना आता गाड्या भोपाळला रवाना करू नका, असे सांगता सांगताच स्टेशनमास्तर श्री. धुर्वे धारातीर्थी पडले. ह्या माणसाने जीव गमावूनही आपले कर्तव्य केले नसते, तर भोपाळच्या प्रवासी गाड्यांमधून आणखी शेकडो लोक मृत्युमुखी पडले असते. तेव्हा कारखान्याची जागा निवडताना ती नवाबाच्या काळात अजूनही जगणाऱ्या जुन्या भोपाळपासून दूर होती, हा निव्वळ योगायोग म्हणावा लागेल. इकके प्राण वाचवण्यासाठी धुर्वेंना आपण त्यांच्या मृत्यूनंतर परमवीर चक्र देणार आहोत का?

कायदे निरुपयोगी

वस्तुतः एवढा भीषण अपघात त्या कारखान्यामुळे घडू शकेल ही कल्पना परवाना व जागा देणारे, त्यांच्यापैकी कोणीच केली नव्हती; पण त्यामुळे अपघात झाल्यास त्याचे स्वरूप भयानक असणे अपरिहार्य झाले होते.

भोपाळला आयसोसायनेट नावाच्या अत्यंत विषारी वायूपासून, कीटकनाशके तयार केली जात होती. असे कारखाने इतर देशातही आहेत तेव्हा भोपाळसारखा अपघातचा धोका त्या देशांमध्ये नाही का? ह्याचे उत्तर धोका आहे, पण त्याचे प्रमाण पुष्कळ कमी आहे. आपल्याला धोका जास्त असण्याचे पहिले कारण कारखान्याचा कामगार व कर्मचारी वर्ग, सरकारी शासन आणि आपले सत्ताधारी गट आणि दुसरे कारण कारखान्यांच्या भोवती वाढत जाणारी घनदाट लोकवस्ती आणि झोपडपट्ट्या ही मुख्यत्वे आहेत.

कारखान्यात वापरलेल्या यंत्र-सामग्रीची सतत निगा राखावी लागते, तिची कार्य-

क्षमता टिकवावी लागते. ही निगा राखण्याचे महत्त्व मागास कर्मचाऱ्यांना नीटसे समजत नाही. यंत्राचे झिजणारे भाग वेळोवेळी बदलावे लागतात, त्याबाबतही हयगय होते, ह्याचा अनुभव सगळीकडे येतो. उत्तर भारतामधले पॉवर हौसेसमध्ये झिजलेले भाग बदलण्यासाठी नवे मागवलेलेही नसल्याने, ती वारंवार बंद पडत असतात. तीच बेपर्वा वृत्ती सर्व प्रकल्पात आढळून येते व अपघाताच्या तयारीला आपलाही हातभार लावते.

आधुनिक कारखान्याची यंत्रे बहुतेक स्वयंचलित असतात, त्यामुळे कारखान्याला मनुष्य–बळ फारसे लागत नाही. तथापि यंत्रावर देखरेख करणारी माणसे, थोडी असली तरी ती पूर्ण शिक्षित, बुद्धिमान, कर्तबगार आणि वेळी प्राण पणाला लावून काम करणारी असावी लागतात. कारखाना नीट चालू लागेपर्यंत असे कर्मचारी आणलेही जातात; पण एकदा उत्पादनाची गाडी मार्गी लागली म्हणजे ही 'महागडी' माणसे बदलून इतरत्र पाठवली जातात आणि त्यांचे काम, आतापर्यंत त्यांच्या हाताखाली काम शिकलेले कर्मचारी करू लागतात यंत्र सुरळित चालेल तोवर, हे अर्धशिक्षित कर्मचारी यंत्राची देखरेख नीट करतातही; पण यंत्रात बिघाड होऊ लागला तर, त्या प्रसंगातून, मार्ग काढायला, ते कर्मचारी बहुशः अपुरे पडतात. अपघात होण्याचे तसेच त्याची तीव्रता वाढण्याचे हेही एक कारण असते.

कारखान्याला दिलेला परवाना, योग्य प्रकारे वापरला जात आहे, तसेच अपघात टाळण्यासाठी केलेले सुरक्षितता कायदे व्यवस्थित पाळले जात आहेत, हे पहाण्याचा अधिकार आणि जबाबदारी सुरक्षितता खात्याच्या तंत्रज्ञ अधिकाऱ्यांची असते. हे अधिकारी इंजिनियर्स असले तरी त्यांच्या देखरेखीखालील प्रत्येक कारखान्याच्या यंत्रसामग्रीची त्यांना यथातथ्य माहिती नसते. हे अधिकारीही अनेकदा दैववादी असतात. यंत्रांबद्दल त्यांना जिज्ञासाही असतेच असे नाही. आपल्या मागास समाजात, शीख, मुसलमान, महार आणि असे काही गट वगळता, यंत्र पहाताच ते उघडून पहाणारा तंत्रज्ञदेखील विरळा. यंत्राबद्दलच अज्ञान असल्यास, कारखान्याची तपासणी वरवरची असते. ती तपासणी वरवरची व्हावी म्हणून अधिकाऱ्यांची भरपूर सराबराई केली जाते, 'बंद पाकिटे' ही सर्रास वापरली जातात. त्यातूनही एखादा अधिकारी कार्यक्षम आणि नैतिक मूल्ये जपणारा असला तर, कारखान्याचा पाहुणचार घेऊन संतुष्ट असलेले राजकीय नेतृत्व, कारखान्याला पाठीशी घातते. ह्या परिस्थितीत सुरक्षितता कायदे निरुपयोगी ठरतात.

भोपाळ–अपरिहार्य ?

हा सारा सामाजिक संच अपघाताला उपकारक असाच असतो. यंत्रे जोवर आपल्या लयीने चालतात, तोवर सगळे ठीक असते; पण यंत्रामध्ये, केव्हा तरी बिघाड होण्याचा संभव असतो, तसा बिघाड झाला म्हणजे लहान–लहान अपघात होतात. ही पुढच्या संभाव्य संकटाची सुचना असते.

भोपाळलाही असे लहान–लहान अपघात होत होते. आपत्प्रसंगी भोवतालची वस्ती गॅसला बळी पडू नये म्हणून कुठलीच योजना सरकारजवळ किंवा कारखान्याजवळ नव्हती. अमेरिकेत झालेल्या एक आयसो–सायनटेच्या अपघातात, एक मैल अंतरावर असलेल्या शाळेची मुले, पंचवीस मिनिटात तेथून हलवण्यात आली होती. अशी कुठलीही तातडीची कार्यक्षम व्यवस्था आपल्याकडे नव्हती. कारण, मागास देशात अशी व्यवस्था सहज होऊ शकत नाही. एखादी व्यवस्था करून ठेवली तरी, 'ती वेळेवर उपयोगी पडेल का?' हा प्रश्न असतोच. कोणताही कठीण प्रसंग उभा राहिला म्हणजे अधिकारी मंडळी जीव घेऊन पळून जातात, हा पानशेतचा अनुभव सर्वत्र येतो, भोपाळच्या अपघातामध्येही तो आला. कारखान्याचे इंजिनियर्स कारखान्यात आलेच नाहीत. एक छोटा कर्मचारी शकील कुरेशी. गॅस जाळून निरुपद्रवी करण्याची धडपड, तो स्वतः बेशुद्ध होऊन पडेपर्यंत, करीत राहिला. परमवीरचक्राचा हाही एक मानकरी झाला पाहिजे.

कारखान्याच्या अधिकाऱ्यांप्रमाणेच, सरकारी यंत्रणाही वागली. अधिकारी, मंत्री, नेते सगळे जीव घेऊन पळून गेले. गॅसला तोंड देण्यासाठी, शिरस्त्राणे (masks) त्यांच्याजवळ नव्हतीच; पण माणसांबद्दल आस्थाही त्यांना नव्हती. त्यामुळे ह्या गटातून एकही धुर्वे किंवा शकील कुरेशी पुढे आला नाही.

मोकाट सुटलेला गॅस वस्तीत पोचून घराघरात शिरला, गल्ली-गल्ली व्यापीत, हवेबरोबर तो पुढे-पुढे सरकत गेला. बाटलीतून बाहेर पडलेल्या ह्या गॅसला परत बाटलीत बंद करणारा कोणी कोळी इथे नसल्याने हा राक्षस दोन ते तीन हजार माणसांचे प्राण घेऊन आणि जवळजवळ एक लाख लोकांवर आपली मोहर छापून, शांत झाला. मेले ते सुटले. जे बचावले त्यांचे भविष्य आजतरी कोणाला सांगता येत नाही. ह्या अपघातात माणसेच मेली असे नव्हे तर गुरे-ढोरे पशुपाखरे, कीटक आणि बॅक्टिरिया, फंगस सर्वच जळून नष्ट झाले. प्रदेश इतका बेचिराख झाला की, मेलेली प्रेते सडूही शकली नाहीत त्यामुळे भोपाळला दुर्गंध नव्हता! ह्या घटनेत दोष वायूचा नव्हता. तो आपल्या स्वभावाने वागला. तो मोकाट सुटावा अशीच व्यवस्था प्रत्येक पातळीवर अजाणता केली गेली होती. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

'भोपाळसारखे प्राणघातक कारखाने वस्तीजवळ काढू नयेत आणि नंतर नवी वस्ती वसू देवू नये, असे केले असते तर भोपाळच्या अपघाताने इतके रौद्र रूप धारण केले नसते.' असेही म्हटले जात आहे. असे रासायनिक कारखाने सोयीसाठी इतर मोठ्या शहरामध्येही उघडलेले आहेत. भोपाळचा कारखाना उघडला तेव्हा अठराव्या शतकात जगणाऱ्या नवाबी भोपाळपासून तो दूर अंतरावर होता. तथापि कारखाना आणि जुने शहर ह्याच्यामधली जागा नव्या वस्तीने आणि झोपडपट्ट्यांनी भराभर भरली असावी कारण मागास प्रदेशात, कामाची भूक विलक्षण तीव्र असते. कारखान्यात काम न मिळाले तरी कारखान्याच्या बांधकामासाठी लावलेले मजूर, मोठ्या प्रमाणात भोवताली वस्ती करून असतात. बांधकाम संपले तरी ते तेथून फार करून हलत नाहीत. खेड्यातल्यापेक्षा कारखान्याच्या जवळपास काम आणि पोटाला दोन घास मिळण्याचा संभव जास्त असतो. व्यापार वाहतुकीच्या वर्दळीमुळे चहापाण्याची आणि इतर लहान-सहान दुकाने, हमाली इत्यादी कामे निर्माण होतात आणि त्यामुळे कारखान्याच्या परिसराकडे

काम शोधणारांची रीघ लागते. त्यातूनच झोपडपट्ट्या उभ्या राहतात. त्या थांबवता येत नाहीत आणि हलवताही येत नाहीत. तेव्हा कारखान्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून भोवतालची वस्ती स्वीकारावी लागते.

तर 'लांडगा आला रे...'

ह्या वस्तीला संरक्षण देणे कठीण असते, कारण विज्ञानाने निर्मिलेल्या सुखसोयी वापरताना त्यांची पथ्ये पाळावी लागतात ह्याची जाणीव मागास समाजात अभावानेच आढळते, हा सर्वसामान्य अनुभव आहे. नायलॉनच्या साड्या टिकाऊ, झुळझुळीत आणि धुवायला सोप्या म्हणून त्याचा वापर आता समाजाच्या सर्व थरात होऊ लागला आहे. हा कपडा लौकर पेट घेतो आणि पेटल्यावर कातडीला चिकटून पडतो. त्यामुळे माणूस वाचवणे कठीण होते. तेव्हा चुलीशी, नायलॉन घालून जाऊ नका असे कितीही सांगितले तरी स्त्रियांना पटत नाही. 'सांभाळून राहीन' किंवा 'अपघात रोज होतात का?' असे मनाचे समाधान करीत, स्त्रिया स्वैंपाकाची कामे करीत असतात. स्वैंपाकाचा गॅस आता सर्वच थरातील स्त्रिया, परवडेल तर वापरतात. सिलिंडर नीट न लागले तर गॅस पाझरतो आणि तो पेट घेऊन एखादा मोठा अपघात होण्याचा संभव असतो. म्हणून तो पाझरू नये ह्याची खबरदारी घ्यावी लागते; पण स्त्रियांना ह्या गॅसचा वास बहुशः ओळखत नाही. नवीन वस्तूची ओळख करून घेण्याइतकी जिज्ञासा सहसा कुठे आढळत नाही. कारखान्यातील उत्पादित वस्तूंच्या स्पर्शाने कामगारांना उपसर्ग देण्याचा संभव असल्यास, त्यांना कारखान्यात घालण्यासाठी वेगळे कपडे दिले जातात. ते कपडे धुवून वेगळे ठेवण्याऐवजी, कामगार ते सतत वापरतात आणि एक 'घडुते' कमी खरीदतात. अपघात झाल्यास उपयोगी पडावे म्हणून मुखवटे (Masks) दिले तर त्याच्या उपयोग मुले खेळासाठी करतील किंवा 'बाजूला टाकलेली ही अडगळ' वेळेवर सापडेल का? हाही प्रश्न उभा राहील.

कारखान्याच्या सायरनची तीच अवस्था. भोपाळच्या कारखान्याने सायरन उशीराच दिला आणि तो दिल्यावरही सावध झालेल्या लोकांना काय करावे, कोणत्या दिशेने जावे हे समजेना. अनेकजण तर येणाऱ्या गॅसमध्येच धावले. सायरन नेहमी वाजवून लोकांना त्याचा अर्थ समजाऊन देण्याची कल्पनाही फारशी व्यवहार्य नाही. प्रथम चार-दोन वेळा लोक धावपळ करतात; पण नंतर 'रोजच वाजतो वेळी-अवेळी. 'लांडगा आला रे आला' म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. हा विमान हल्ल्यांच्या सायरनचा अनुभव येथेही येईल आणि सायरनची ड्रिल हास्यास्पद मात्र होईल.

उद्योग येतील आणि त्यातून समाजपरिवर्तनाचा मार्ग मोकळा होईल ही आपली कल्पना अंशतःच खरी ठरली आहे. समाजाची आर्थिक घडी, औद्योगीकरणाने थोडीबहुत बदलू लागते; पण माणसाची मनोवृत्ती पूर्वीप्रमाणेच दैववादी-परंपरावादी, अंधविश्वासाची रहाते. तिच्यात होणारे परिवर्तन अत्यंत सावकाश घडत असते. विज्ञानाचे बोट धरून येणारे कारखाने त्यात चपखलपणे बसत नाहीत. ही वस्तुस्थिती ध्यानी घेऊन आता आपल्या औद्योगिक धोरणाचा आमूलाग्र विचार व्हावयास पाहिजे आहे. नवीन कारखान्यांपैकी रासायनिक कारखाने अधिक धोक्याचे आहेत. ह्यापैकी किती कारखाने काढणे आवश्यक आहे आणि जे कारखाने आवश्यक ठरतील त्यांचे कामकाज-उत्पादन, परवान्याच्या बाहेर जाणार नाही, तसेच त्या कारखान्यामध्ये अपघात होऊ नयेत आणि झाल्यास, त्याचे स्वरूप रौद्र-भीषण होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी व करावयाचे कडक कायदे आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी ह्याचाही विचार, नवे धोरण आखताना करणे जरूर आहे. भविष्यात भोपाळ अपघाताची पुनरावृत्ती टाळण्याचा हा महत्त्वाचा उपाय आहे. □

अब्राहम लिंकन

फाळणी टाळणारा महापुरुष

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.

सविस्तर योजनापत्रक मागवा.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

उद्योगातही सत्तास्पर्धा

डनलॉप – डीसीएम् : दोन नमुने

शिरीष सहस्रबुद्धे

सत्तास्पर्धा किंवा पॉवर गेम, घराणेशाही, साम्राज्यवाद असे शब्द ऐकले म्हणज पटकन् आठवण होते ती राजकारणाची; पण या सगळ्या गोष्टी ही काही केवळ राजकारणाची मक्तेदारी नाही. अर्थव्यवहारात आणि उद्योगधंद्याच्या क्षेत्रातसुद्धा सत्तास्पर्धा चाललेली दिसते. विशिष्ट घराण्यांची औद्योगिक साम्राज्यं विस्तारताना दिसून येतात. डनलॉप इंडिया लि. आणि डीसीएम् लि. या दोन मोठ्या उद्योगांच्या अलिकडच्या हकिगती अंतर्गत सत्तास्पर्धेवर लख्ख प्रकाश टाकणाऱ्या आहेत. या दोन्ही उद्योगांची मुख्य ठाणी आणि नि कारखाने उत्तर भारतात असल्यामुळे त्यांच्या एकंदर प्रभावाची नि हालचालींची फारशी जवळून माहिती आपल्याला होत नाही; पण त्यामुळे त्यांचा प्रभाव कमी मानायचं कारण नाही.

डनलॉप इंडियाची मुख्य कचेरी कलकत्त्यात आहे. ही मूळची ब्रिटिश मालकीची कंपनी. अजूनही त्यांच्या भागभांडवलाचा ३०% हिस्सा मूळ ब्रिटिश कंपनीकडे आहे. टायर्स आणि इतर काही औद्योगिक उत्पादनं कंपनी बनवते. अर्थात ती ओळखली जाते ती बडी टायर उत्पादक म्हणूनच. डनलॉप हा काही उद्योगसमूह म्हणता येणार नाही. मात्र एक कंपनी म्हणून विचार करता तिचा आकार चांगलाच मोठा आहे. आकडेवारीतच बोलायचं तर ३१ डिसेंबर ८३ रोजी संपलेल्या एका वर्षात डनलॉपची एकूण विक्री तीनशेवीस कोटी रुपयांपेक्षा थोडी जास्तच होती, आणि करपश्चात नफा ५.७० कोटी रुपये होता. कंपनीची उत्पादनयंत्रणा दोनशे चौतीस कोटी रुपयांएवढी आहे. भारतभर पंचवीस ठिकाणी डनलॉपच्या शाखा कचेऱ्या आहेत. एकूण पसारा लक्षात घेता नफ्याचं प्रमाण थोडं कमी असलं तरी काळजी करण्यासारखी परिस्थिती नक्कीच नाही. चार्टर्ड अकाऊंटन्ट असलेले मि. जि. ई. एस्. हॅमन्ड हे ब्रिटिश गृहस्थ मे १९८४ पासून डनलॉपचे कार्यकारी संचालक आहेत.

डनलॉप ही बहुराष्ट्रीय कंपनी तर डीसीएम् लि हा मात्र देशी उद्योगसमूह आहे. प्रसिद्ध उद्योगपती (कै.) लाला श्रीराम यांनी कापडगिरणीपासून व्यवसाय सुरू केला. उत्तर भारतातल्या औद्योगिकरणाच्या प्रक्रियेवर लाला श्रीराम यांचा मोठा प्रभाव होता– जसा दक्षिण भारतातल्या औद्योगिक प्रगतीवर श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचा आहे. डीसीएम्चा आजचा शाखाविस्तार तीन मोठ्या कापडगिरण्यांखेरीज कॉम्प्यूटर,हलक्या वजनाच्या मालमोटारी, घरगुती यंत्रं–उपकरणं, रेफ्रिजरेटर्स, फाऊन्ड्री, इंजिनियरिंग उत्पादनं, बेअरिंग्ज अशा अनेक क्षेत्रात झाला आहे. डीसीएम् डेटा प्रॉडक्टस् लि., डीसीएम् टोयोटा लि. अशा उपकंपन्या निघाल्या आहेत. जपानमधल्या टोयोटा या सुप्रसिद्ध मोटार वाहन उत्पादक कंपनीशी केलेला सहकार्याचा करार आणि स्वराज पॉल या लंडनस्थित उद्योगपतींनी डीसीएम्चे भरमसाठ शेअर्स खरेदी करायचा केलेला प्रयत्न या दोन ठळक घटनांमुळे १९८४ मध्ये डीसीएम्ला एकदम विलक्षण प्रसिद्धी मिळाली. डॉ. भरत राम हे डीसीएम् गटाचे मुख्य सूत्रधार.

डनलॉपमधले सत्तांतर

नोव्हेंबर–डिसेंबर १९८४ च्या सुमाराला कलकत्त्याच्या मध्यभागातल्या 'डनलॉप हाऊस' मधलं वातावरण उत्कंठेनं भारलेलं होतं. डनलॉप इंडिया लि. च्या भवितव्याला नवं वळण मिळायची वेळ आल्याचं जाणवत होतं. 'गोएंका फॅक्टर' चा प्रभाव त्यावर किती पडणार हा खरा प्रश्न होता. प्रसिद्ध उद्योगपती आणि कंपन्या ताब्यात घेण्याच्या तंत्रातले तज्ज्ञ रामप्रसादजी गोएंका याची डनलॉपमधलं ब्रिटिश भागभांडवल खरेदी करायची धडपड बराच काळ चालू होती. १९८४ च्या मध्याला एकदा ती असफल झाल्याचीही बातमी आली होती, तर वर्षअखेर मात्र पुन्हा एकदा डनलॉप गोएंकाच्या उद्योगसाम्राज्यात समाविष्ट होण्याची चिन्हं दिसायला लागली होती. अखेरीस १४ डिसेंबरच्या आसपास त्यावर शिक्कामोर्तब झालं. शेअर्सच्या हस्तांतरणाचे अधिकृत व्यवहार अजून पार पडायचे आहेत. त्याला कायदेशीर परवानग्या लागतील नि साहजिकच वेळही लागेल. अर्थात परदेशी भांडवलाचं भारतीय कंपनीतलं प्रमाण कमी करणारा असा हा व्यवहार असल्यामुळे त्याला केंद्र सरकार अथवा रिझर्व बँकेची आडकाठी होणार नाही असं वाटतं.

फेरा (फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन ॲक्ट) कायद्यानुसार भारतीय कंपनीतलं परदेशी भागभांडवलाचं प्रमाण चाळीस टक्क्यांपेक्षा जास्त असून चालत नाही. त्यानुसार डनलॉप इंडियाचे चाळीस टक्के शेअर्स हे डनलॉप होल्डिंगज् या मूळ ब्रिटिश 'पालकाच्या

मालकीचे होते, तर उरलेलं साठ टक्के भाग-भांडवल भारतातले भाग धारक नि अर्थ-संस्था यांच्या मालकीचं होतं. गोएंका यांची पहिली ऑफर होती ती संपूर्ण परकीय भागभांडवल खरेदी करण्याची हा एवढा मोठा व्यवहार त्यांनी एकट्याच्याच बळावर केला असता असं नव्हे. कदाचित त्यासाठीच मुळात त्यांना आपल्या अनिवासी भारतीय दोस्ताची मदत लागली असावी. श्री. मनोहर छाब्रिया हे ते सन्मित्र. फक्त अडतीस वर्षांचा हा गृहस्थ आज डनलॉपसारख्या करोडोच्या कंपनीचा अध्यक्ष झाला आहे. छाब्रिया कुटुंबाच्या मालकीचं एक दुकान मुंबईत होतं, त्याचा लोभ सोडून मनोहर छाब्रिया दहा वर्षापूर्वी दुबईला गेले. इलेक्ट्रॉनिक वस्तूच्या व्यापारात जम बसल्यानंतर त्यांनी सोनी या जपानच्या जगप्रसिद्ध कंपनीच्या उत्पादनांची एजन्सी पश्चिम आशियासाठी मिळवली. जम्बो इलेक्ट्रॉनिक्स या नावाच्या त्यांच्या कंपनीनं पश्चिम आशियातली जवळजवळ निम्मी बाजारपेठ काबीज केली. दोनच वर्षांपूर्वी सोनीच्या सहकार्यानं त्यांनी सांताक्रूझच्या खास इलेक्ट्रॉनिक झोनमध्ये हिंदी चित्रपटांच्या व्हिडिओटेप्स बनवणारं छोटं युनिट सुरू केलं. १९८४ मध्ये ऑर्सन इलेक्ट्रॉनिक्स ही कंपनी स्थापन केली. ती सोनीच्या तंत्रज्ञानाचा वापर करून टीव्ही सेटस् बनवील. सोनी सारख्या कंपनीनं एखाद्यावर इतकी मेहेरनजर करणं ही सामान्य बाब नाही. डनलॉप इंडियाच्या अध्यक्षपदावर हॅमन्ड यांच्या जागी निवड हा छाब्रियांचा उमेदीच्या वयातला मोठाच बहुमान आहे. तो त्यांनी डनलॉपच्या पॉश ऑफिसात वाराणसीहून पंडित बोलावून सत्यनारायणाची पूजा घालून नुकताच साजराही केला.

शेअरबाजारातल्या बातमीनुसार छाब्रिया यांनी डनलॉप होल्डिंगच्या चाळीस टक्क्यांपैकी सुमारे पाच टक्के शेअर्स विकत घेतले आहेत तर तेवढेच म्हणजे पाच टक्के भाग श्री. संजीव गोएंका यांनी खरेदी केले आहेत. संजीव गोएंका हे रामप्रसाद गोएंका यांचे धाकटे चिरंजीव. वाणिज्यविषयाचा पदवीधर असलेला हा पंचविशीतला तरुण आता डनलॉप इंडियाचा उपकार्यकारी संचालक म्हणून नियुक्त झाला आहे. कंपनीच्या दैनंदिन कारभारावर हॅमंडसाहेबापेक्षा संजीव गोएंकाचाच प्रभाव जास्त राहील असं दिसतं. विशेषत: कंपनीच्या 'परचेस डिपार्टमेंटवर गोएंकांचं जास्त नियंत्रण राहील. जरूर तर त्यासाठी विश्वासातली माणसं बाहेरून आणली जातील. गुजराती–मारवाडी व्यवस्थापनांचं हे एक नेहमीचं वैशिष्ट्य आहे. आपल्या कंपनीच्या 'परचेस 'वर किंवा आधुनिक भाषेत बोलायचं तर 'मटोरियल्स मॅनेजमेंट 'वर नेहमी आपल्या समाजातल्या विश्वासू माणसाद्वारे शक्यतो नातेवाईकाकडून–घट्ट पकड ठेवली जाते.

'पालक डनलॉप' संकटात

छाब्रिया व गोएंका यांना प्रत्येकी पाच टक्के शेअर्स विकल्यानंतर डनलॉप होल्डिंगकडे डनलॉप इंडियाच्या एकूण भागभांडवला पैकी तीस टक्के शेअर्स राहतील. शक्यता अशी आहे की भविष्यात कदाचित हे उरलेले शेअर्ससुद्धा विक्रीला काढले जातील. भारत सरकारची परवानगी मिळाली तर गोएंकाशेठसुद्धा हे उरलेले शेअर्स खरेदी करतील. परवानगीची बाब मध्ये यायचं कारण असं की अशा शेअरखरेदीमुळे जरी एखाद्या कंपनीचं भारतीयीकरण होत असलं तरी मूल्यवान परकीय चलन बाहेर जात असतं. पण ही गोष्ट झाली खूप पुढची. आज डनलॉप होल्डिंग या पालक कंपनीला आर्थिक तंगी चांगलीच जाणवते आहे आणि त्यातून थोडं मोकळं होण्याचा एक मार्ग म्हणूनच हे दहा टक्के शेअर्स विकण्यात आले. एरवी एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीनं भारतासारख्या विकासशील देशातल्या आपल्या फायदेशीर मांडलिकावरची पकड सहजी सैल सोडली असती थोडीच ?

आर्थिक तंगीनं १९८४ मध्ये डनलॉप होल्डिंगला खूपच सतावलं. निरनिराळ्या बँकांची एकूण देणी चाळीस कोटी ब्रिटिश

पौंड इतक्या रकमेची आहेत. त्यामुळे धनकोंनी व्यवस्थापनावर चांगलंच दडपण आणलं. अध्यक्ष सर मॉरिस हॉग्सन यांना राजीनामा द्यावा लागला. सर मायकेल एडवर्डस् नवे अध्यक्ष झाले. त्यांच्या इच्छेनुसार सगळ्या संचालकांनी पदत्याग केला नि संचालक मंडळाची पुनर्रचना सुरू झाली. कंपनीच्या निरनिराळ्या डिव्हिजन्सपैकी काहींचं रूपांतर स्वतंत्र कपन्यांमध्ये करण्याची योजना आखण्यात आली. या सगळ्या उलाढालीतच डनलॉप इंडियाचे दहा टक्के शेअर्स विकून पैसा उभा करायचा मार्ग चोखाळला गेला. मूळ कंपनीच्या धनकोंनीही त्या पारड्यात आपलं वजन टाकलं आणि रामप्रसाद गोएंकांनी झेपावून डनलॉपचा कॅच पकडला.

गोएंका–छाब्रिया–हॅमण्ड

असा सत्तात्रिकोण आता डनलॉप इंडियामध्ये निर्माण होणार असा जाणकारांचा होरा आहे. हॅमण्ड यांच्यामागे उरलेल्या तीस टक्के शेअर्सचं पाठबळ आहे. पण एकदा खोटं बोलल्यामुळे युधिष्ठिराच्या रथाची चाकं जमिनीला टेकली, तशीच दहा टक्के शेअर्सची विक्री होताच हॅमण्डची चेअरमनशिप गेली आणि कार्यकारी संचालकपद टिकून राहिलं आहे. अध्यक्ष झालेले छाब्रिया दुबईवासी आहेत. सर्वसाधारणपणे मोठ्या कंपन्यांचे चेअरमन हे शोभेचं पद असतं. प्रत्यक्ष कारभार कार्यकारी संचालकच चालवतात. मात्र छाब्रिया यांनी आपण शोभेपुरते अध्यक्ष राहणार नाही, असं जाहीर करून तर्कवितर्कांना खतपाणी घातलं आहे. आता टायर धंद्याचा पूर्वानुभव नसताना ते दुबईतून कलकत्त्यातल्या कंपनीचा कारभार कसा काय चालवणार आहेत हे एक गूढच ! एवढंच, की गोएंकांच्या वतीनं शेअर खरेदी करून पैसे गुंतवून ते स्वस्थ बसतील असा जो अंदाज होता, तो छाब्रियाजी सहजासहजी खरा होऊ देतीलसं वाटत नाही.

गोएंका यांचा तर दुहेरी–तिहेरी फायदा आहे. एकीकडे डनलॉपसारख्या प्रस्थापित नि प्रतिष्ठित कंपनीची भर त्यांच्या उद्योगसमूहामध्ये पडते आहे. दुसरीकडे त्यांच्या तरुण मुलाला एका आंतरराष्ट्रीय कंपनीतल्या उच्चपदावर कारकीर्द सुरू करायची संधी मिळते आहे. तिसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे टायर इन्डस्ट्रीसारख्या मोठ्या धंद्यावर त्यांची पकड हळूहळू मजबूत होत चालली आहे. कारण डनलॉपची एक महत्त्वाची प्रतिस्पर्धी कंपनी सिएट टायर्स (इंडिया) लि. ही सुद्धा गोएंका यांच्याच नियंत्रणाखाली आहे आणि त्यांचा मोठा मुलगा हर्षवर्धन गोएंका हा सिअॅटचा कार्यकारी संचालक आहे. तीन चार वर्षांपूर्वीच सिअॅटच्या इटॅलियन पालक कंपनीकडचे ५१ % शेअर्स विकत घेऊन त्यांनी सिअॅट इंडिया काबीज केली. अशा तऱ्हेनं देशातले दोन मोठे टायर-उत्पादक गोएंकांच्या खिशात पडले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे आणि अशा वेळी बाजारपेठेवर त्यांना किती प्रभाव पाडता येईल याचाही विचार करायला पाहिजे– मग मक्तेदारी नियंत्रण कायद्यातनं सुटका व्हावी यासाठी वरकरणी डनलॉप नि सिअॅटचा काही संबंध नसेना का !

डीसीएममधला सत्तासंघर्ष

डीसीएम लि. मधल्या सत्तासंघर्षाचा मोठा नाट्यपूर्ण स्फोट झाला तो २६ डिसेंबर १९८४ रोजी झालेल्या कंपनीच्या शहाण्णवाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेतच ! एरवी अशा सभा अगदी रूटीन आणि दिखाऊ होतात; पण ही सभा अपवाद ठरली ती दोन कारणांनी. एक : डॉ. भरतराम यांच्या निवृत्तीची घोषणा आणि दोन : त्यांचे बंधू चरत राम यांनी त्यांच्यावर सोडलेलं टीकास्त्र.

झालं असं, की लाला श्रीराम यांच्यानंतर डॉ. भरतराम व चरतराम या त्यांच्या दोघा मुलांनी चाळीस वर्षे तरी डीसीएम्चं नेतृत्व केले. आता दोघेही वयस्कर झाले आहेत नि तिसरी पिढीही धुरा घेण्याला पुरेशी प्रौढ झालेली आहे. भरतराम व चरतराम हे दोघेही कंपनीचे कार्यकारी संचालक आहेत, तर भरत राम हेच अध्यक्षही आहेत. दोन कार्यकारी संचालक असणं ही बाब तशी अपवादात्मकच. अर्थात कंपनीच्या धोरणांवर नि दैनंदिन कारभारावर खरा प्रभाव होता डॉ. भरतराम यांचाच. या आणि इतर कारणांमुळे दोघा भावात सतत मतभेद होत आले आहेत. त्या दोघांखालोखाल प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे ते दोघांचाही पुतण्या बन्सीधर (सध्याचा सहकार्यकारी संचालक) याचं. डॉ. भरतराम यांचे थोरले चिरंजीव डॉ. विनय भरत सध्या उपकार्यकारी संचालक आहेत. (जाता जाता : विनय भरतराम हे सैनी–रामपूर घराण्याचे प्रसिद्ध गायकही आहेत ! आणि अर्थातच त्यांना बन्सीधर यांच्या बरोबरीचं स्थान देण्याची महत्त्वाकांक्षा डॉ. भरतराम यांची आहे. कंपनीच्या संचालक मंडळावर त्यांचं वजन असल्यामुळे त्यांनी आपल्या निवृत्तीनंतरच्या काळासाठी सुचविलेली योजना संचालकांनी मान्य केली. त्यानुसार बन्सीधर अध्यक्ष व वरिष्ठ कार्यकारी संचालक होणार तर विनय भरतराम हे कार्यकारी संचालक होणार आहेत. म्हणजेच पूर्वीची दुहेरी राज्य-

पद्धती कायम राहणार आहे. बन्सीधर यांचा त्याला विरोध आहे आणि चरतराम यांचा बन्सीधर यांना पाठिंबा आहे. मात्र संचालक मंडळाला ते पटवू शकले नाहीत.

'अनपेक्षित स्फोट'

संघर्षनाट्याची ही झाली पूर्वतयारी. २६ डिसेंबरच्या वार्षिक सभेत भागधारक मोठ्या संख्येनं जमले होते. डॉ. भरत राम यांनी मार्च १९८५ अखेर स्वतः व चरतराम निवृत्त होत असल्याची घोषणा केली आणि एप्रिलपासून अंमलात येणारी नवी व्यवस्थाही जाहीर केली. त्यांनंतर त्यांनी चरतराम यांना निरोपाचं भाषण करण्यासाठी बोलावलं. इथपर्यंत सारं कसं ठरल्याप्रमाणे पार पडलं. यानंतर जे घडलं ते मात्र अनपेक्षित होतं

भरतराम यांचं नाव न घेता त्यांच्या कारकीर्दीतल्या कारभारावर चरतराम यांनी तिखट हल्ला चढवला 'अलिकडच्या काही वर्षात कंपनीची गतिशीलता हरवली आहे आणि विश्वासार्हता घटली आहे. नवी गुंतवणूक गोठवावी लागली आहे आणि एकूण भांडवली गुंतवणूक १९७० सालच्या तिप्पट होऊनही नफ्यात प्रमाणशीर वाढ झालेली नाही. साहजिकच भागधारकांना मिळायला हवा होता तेवढा फायदा पदरी पडला नाही. असं चरतराम यांनी उघडपणे सांगितलं. या काळात ते स्वतः सुद्धा कार्यकारी संचालक असले तरी खरी सूत्रं डॉ. भरतराम यांच्याच हातात असल्याचं सगळ्यांना ठाऊकच होतं. त्यामुळे हल्ल्याचा रोख सरळच भरतराम यांच्यावर होता. त्यांचे मतभेद असे चव्हाट्यावर यायची ही पहिलीच वेळ !

चरतराम यांनी अशी बत्ती शिलगावून दिल्यानंतर धमालच उडाली. त्यांच्या समर्थक भागधारकांनी वित्तंबातम्या मिळाल्यासारखे आरोप करायला सुरुवात केली. एकानं सांगितलं की कंपनीची आर्थिक परिस्थिती बिकट असतानाही वार्षिक हिशेबपत्रकावर पुष्कळ शस्त्रक्रिया करून थोडा नफा दाखवण्यात आलेला आहे. दुसरीकडे ऑडिटर्सनी मान्य करून टाकलं की काही देण्यासाठी रकमांची तरतूद केलेली नाही आणि ५०२.६ कोटी रुपये इतक्या उलाढालीवर फक्त २.९६ कोटी रुपये एवढाच जो नफा दिसतो, तोसुद्धा हिशेबाच्या पद्धतीत काही बदल केल्यामुळेच एरवी तो निम्म्यावर आला असता. कंपनीची एक कापडगिरणी बंद पडली आहे आणि दुसरी आजारी आहे, हेही या वेळी उघड झालं.

एकीकडे हा गोंधळ चालू असताना दुसरीकडे भरतराम यांचे समर्थक असलेल्या भागधारकांनी त्यांच्या बाजूच्या घोषणा दिल्या. काहींनी भरतराम यांना सन्मान्य अध्यक्ष (चेअरमन एमेरिटस) हे पद खास निर्माण करून देण्यात यावं असा ठराव मांडला आणि तो मंजूरही झाला. भरतराम यांच्या मुळेच डीसीएमच्या विविध शाखांची भरघोस प्रगती होऊ शकेली असं काही ऐनवेळच्या वक्यांनी जाहीर केलं.

पुढे काय ?

सध्या तरी डॉ. भरतराम यांनी, कष्टानं का होईना; पण बाजी जिंकलीय् असं दिसतं. मात्र एक-दोन 'पण' अजूनही शिल्लक आहेत. एक तर वित्तीय संस्थांचं बऱ्यापैकी दडपण डीसीएम्वर येतं आहे. त्यांच्याकडे ४०% शेअर्स आहेत. संचालक मंडळावर त्यांचे तीन प्रतिनिधी आहेत ते पाच असावेत अशी त्यांनी सूचना केली आहे आणि एस्कॉर्ट्स्चा अनुभव लक्षात घेता डीसीएम्ला ती आज ना उद्या मानावी लागेल असं वाटतं. वारसाहक्काच्या वादात मात्र वित्तीय संस्थांनी तटस्थ भूमिका स्वीकारली आहे. ही भरतराम यांच्या दृष्टीनं एक जमेची बाजू दुसरा 'पण' म्हणजे एक सन्मान्य अध्यक्ष, एक अध्यक्ष व कार्यकारी संचालक अशा तिघात कामाची नि अधिकारांची वाटणी कशी राहील हे अजून संचालक मंडळानं स्पष्ट केलेलं नाही. ते ठरवून देणं तसं सोपंही नाही. बन्सीधर आणि विनय भरतराम यांना जोडीनं नि गोडीनं कारभार हाकता यावा असे त्यांचे संबंध नाहीत आणि वारसाहक्कांचे तंटे सोडवायची दिल्लीची ऐतिहासिक परंपरा काही निराळीच आहे. दिल्लीच्याच डीसीएम्ला अंतर्गत सत्तासंघर्षाची सोडवणूक कशा तऱ्हेने करता येईल हा एक कुतूहलाचाच विषय आहे. राजकारणाच्या सर्वंकष पकडीतनं शिक्षण काय किंवा उद्योग काय, कुठलंच क्षेत्र सुटू शकत नाही हे मात्र खरं. □

राजहंसचे नवे प्रकाशन

कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईच सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

शर्यत



मूळ लेखक : जेफ्री आर्चर

रूपांतर : विष्णू जयदेव

(६)

चार्ल्स–आमांदाच्या ओळखीचा शेवट त्यांच्या लग्नात झाला. इकडे फिओनानेही अलेक्झांडर डग्लसशी विवाह केला. आमांदाच्या विचित्र सवयींमुळे चार्ल्सची मनस्थिती नाजुक झाली होती. आता हॅरी हाच त्याचा आधार होता.

कॅलहॅननंतर मायकेल फूट लेबरपार्टीचे अध्यक्ष झाले. तर लेबर पार्टीतला मवाळ गट फुटून त्यांनी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी नावाचा नवा पक्ष स्थापन केला. अँड्रूने विचारपूर्वक पार्टीच्या नावानं निवडणूक लढवण्याचं ठरवलं.

प्रत्यक्ष निकाल जाहीर झाल्यावर अँड्रूला धक्काच बसला. तो आणि त्याचा प्रतिस्पर्धी बॉईल–दोघांनाही सारखीच मतं मिळाली. तरी अंतिम नाणेफेकीत नशिबाने अँड्रू विजयी झाला.

रेमंड–केट प्रकरणाचा सोक्षमोक्ष शेवटी जॉईसला लावावाच लागला. रेमंडला आपण किती मोठी चूक करत होतो हे उशीरा का होईना, उमगलं आणि त्यानं ती चूक सुधारून घेतली.

निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी प्रचंड बहुमतानं विजयी झाली. मार्गारेट थॅचरनी नवं मंत्रिमंडळ जाहीर केलं. त्यात चार्ल्स फॉरेन सेक्रेटरी होता तर सायमन डिफेन्स सेक्रेटरी. लिबियन दहशतवाद्यांनी ताब्यात घेतलेल्या रॉयल नेव्हीच्या ब्रॉडस्वोर्ड विनाशिकेसुळे फॉरेन सेक्रेटरी आणि डिफेन्स सेक्रेटरी दोघांवर महत्त्वाची जबाबदारी येऊन पडली होती.

□

सायमन टेन डाउनिंग स्ट्रीटच्या प्रवेशद्वाराशी येईपर्यंत टेलिव्हिजनचे कॅमेरामन आर्कलँप पेटवून सज्ज झाले. सायमन दरवाजाशी पोहोचला तेव्हा एका पत्रकाराने त्याच्यापुढे मायक्रोफोन धरला; पण सायमनने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास नकार दिला.

सायमन दरवाजा उघडून आत गेला आणि कॅरिडॉरमधून सरळ कॅबिनेटरूमकडे आला. कॅबिनेटचे बावीस सदस्य आधीच येऊन बसले होते. सायमन आणि चार्ल्सच्या पाठोपाठ पंतप्रधानही येऊन हजर झाल्या.

पंतप्रधान स्थानापन्न झाल्यावर सभेला सुरुवात झाली. पंतप्रधानांनी सदस्यांना सांगितले की, ह्या क्षणापर्यंत त्यांचे गडाफीशी कोणत्याही प्रकारचे संभाषण झाले नव्हते. त्यामुळे आता कोणतेही निर्णय घेण्याची मंत्रिमंडळाला मुभा होती. त्यांनी प्रथम फॉरेन सेक्रेटरींना कॅबिनेट पुढे माहिती ठेवण्यास सांगितले.

चार्ल्सने लिबियाचा राजदूत कादर बरोबर त्याचे झालेले संभाषण सांगितले. त्याने युनायटेड नेशनस्च्या समेत मांडलेला ठराव कॅबिनेटपुढे वाचून सांगितले की, अमेरिका आणि रशिया ह्या दोन्ही महासत्तांनी ठरावाला पाठिंबा द्यायचे कबूल केले होते.

'हा ठराव जर बहुमताने पास झाला तर तो ब्रिटनचा नैतिक विजय ठरेल. संपूर्ण जगाची सहानुभूती आपल्याला लाभली तर प्रत्यक्ष वाटाघाटी करताना आपल्याला त्याचा फायदा होईल.' चार्ल्स म्हणाला.

ब्रॉडस्वोर्डची सुटका करण्यासाठी चार्ल्सने दोन्ही महासत्तांचा पाठिंबा मिळवला याचा प्रभाव कॅबिनेटच्या सदस्यांवर पड़ला; पण पंतप्रधानांच्या चेहऱ्यावरून कसलाच अंदाज येत नव्हता. त्यांनी सायमनला त्याचे मत व्यक्त करायला सांगितले.

सायमन म्हणाला की, गेल्या आठ तासात दहशतवाद्यांनी ब्रॉडस्वोर्ड सर्टच्या सामुद्रधुनीत आणून उभी केली होती. त्यामुळे बोटीवर केवळ समुद्रमार्गेच प्रवेश मिळवणे शक्य होते. सायमन म्हणाला की, त्याला मिळालेल्या माहितीनुसार ब्रॉडस्वोर्डवरील खलाशांचे हात-पाय बांधून त्यांना इंजिनरूममध्ये कोंडून ठेवले होते.

'आपण जर वाटाघाटींत वेळ घालवून सुटकेला उशीर केला तर सैनिकांच्या जीविताला धोका पोहोचेल शिवाय आपल्या लष्करालाही ते मानहानीचे ठरेल. मी सैन्याच्या प्रमुखांशी सुटकेच्या योजनेविषयी चर्चा केली. 'ऑपरेशन शॉपलिफ्टर' या कोड नावाने सुटकेची योजना अंतिम स्वरूपात तयार होत आली आहे. कॅबिनेटने जर योजनेला मान्यता दिली तर पुढच्या ४८ तासात योजना कार्यान्वित करता येईल. योजना प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत वाटाघाटीचे प्रयत्न चालू ठेवता येतील त्यामुळे दहशतवादी गाफील राहतील' सायमन म्हणाला.

'आणि अपयश आले तर? खलाशांचे प्राण जातीलच वर इतर देशांची सहानुभूती आपण गमावून बसू' चार्ल्स म्हणाला.

'गडाफींशी वाटाघाटी करण्यात आपण वेळ दवडला तर संपूर्ण ब्रिटनची सहानुभूती आपण गमावून बसू. ब्रॉडस्वोर्डची बातमी जितके दिवस वृत्तपत्रांत पहिल्या पानावर राहील तितके गडाफीचे महत्त्व वाढेल आणि आपल्या सैनिकांच्या मनोधैर्यावर त्याचा परिणाम होईल. अमेरिकन वकिलातीत अडकलेल्या लोकांची सुटका करण्यात आलेल्या अपयशामुळे प्रेसिडेंट कार्टरना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला हे विसरून चालणार नाही.' सायमन म्हणाला.

'किर्कपॅट्रिक आणि ग्रोमिको या दोघांनीही आपल्याला पाठिंबा देताना ब्रिटन कोणत्याही प्रकारे बळाचा वापर करणार नाही असे आश्वासन मागितले होते. युनायटेड नेशनस्मधील ठरावाला इतक्या मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असेल तर आपण वाटाघाटींचा मार्ग टाळून सैन्याचा वापर करणे शहाणपणाचे ठरणार नाही. अजून तीन दिवस तरी आपण वाटाघाटीचा मार्ग सोडू नये असे मला वाटते' चार्ल्स म्हणाला.

सामोपचाराने ब्रॉडस्वोर्डची सुटका झाली तर त्याचे श्रेय फॉरेन मिनिस्ट्री आणि पर्यायाने फॉरेन सेक्रेटरी म्हणून चार्ल्सकडे गेले असते. 'ऑपरेशन शॉपलिफ्टर'ला जर यश लाभले तर त्याचे श्रेय डिफेन्स सेक्रेटरी म्हणून सायमनकडे गेले असते.

'आपण तीन दिवस थांबलो आणि त्या काळात जर ब्रॉडस्वोर्डवरच्या खलाशांची गडाफीने लष्करी तुरुंगात रवानगी केली तर आपण गडाफीच्या पूर्णपणे ताब्यात जाऊ. दुसऱ्या कोणत्याही मार्गाने आपल्याला ब्रॉडस्वोर्ड किंवा आपल्या सैनिकांची सुटका करता येणार नाही.' सायमन म्हणाला.

पंतप्रधानांनी सायमन आणि चार्ल्स या दोघांचेही मुद्दे लक्षपूर्वक ऐकून घेतले. पुढच्या अर्ध्या तासात त्यांनी कॅबिनेटच्या इतर सदस्यांचेही मत अजमावले आणि सर्वांचे विचार लक्षात घेऊन त्यांनी निर्णय घेतला...कमीत कमी वेळांत 'ऑपरेशन शॉपलिफ्टर' पार पाडणे आवश्यक आहे.

योजना अंमलात आणण्यासाठी पंतप्रधान ,डिफेन्स सेक्रेटरी, फॉरेन सेक्रेटरी, ॲटर्नी जनरल आणि प्रशासनातील तीन युद्ध विषयक तज्ज्ञ यांची एक कॅबिनेट उपसमिती नेमण्यात आली. फॉरेन सेक्रेटरी आणि डिफेन्स सेक्रेटरी यांच्या शिवाय इतर कॅबिनेट सदस्यांना पंतप्रधानांनी त्यांच्या कार्यालयाकडे परतायला सांगितले.

मंत्रिमंडळाचे सदस्य कॅबिनेटरूममधून बाहेर पडल्यावर चार्ल्सकडे वळून मार्गारेट थॅचर म्हणाल्या, 'कॅबिनेटने लष्कराचा वापर करायचे ठरवले तरी बाहेर मात्र सर्वांना आपण वाटाघाटींवर भर देत आहोत असे वाटले पाहिजे. फॉरेन मिनिस्ट्रीवरच सरकारची भिस्त आहे असे आपल्याला दाखवावे लागेल.'

'येस प्राईम मिनिस्टर' चेहऱ्यावरची एक रेषही हलू न देता चार्ल्स म्हणाला.

'सायमन, ऑपरेशन शॉपलिफ्टरचा संपूर्ण आराखडा किती वाजेपर्यंत तयार होईल?'

'मी आज रात्रभर कार्यालयातच आहे. उद्या सकाळी दहा वाजता कॅबिनेट मीटिंगसाठी प्लॅन तयार असेल' सायमन म्हणाला.

'उत्तम, कोणत्याही परिस्थितीत दहा वाजेपर्यंत योजना तयार हवी. अँड्रयू फ्रासरनी सभागृहात उद्या इमर्जन्सी डिबेटची मागणी केली आहे. सभागृहात कोणत्याही प्रकारचे पॉलिसी स्टेटमेंट आपण करू नये असे माझे मत आहे. आपला सर्व भर वाटाघाटींवरच आहे असे सभासदांना वाटले पाहिजे.' थॅचर म्हणाल्या.

चार्ल्स आणि सायमन या दोघांनाही आता सभागृहाच्या चर्चेत एक क्षणही वाया दवडायची इच्छा नव्हती.

'चार्ल्स, सरकारच्या वतीने चर्चेची सुरुवात तुला करावी लागेल आणि समारोपाचे भाषण सायमनला करावे लागेल. विरोधी पक्षाचे सर्व लक्ष आपण युनायटेड नेशनस्मधल्या ठरावावर केंद्रित करण्याचा प्रयत्न करणार आहोत. तुमच्या कोणत्याही उत्तरातून लष्कराचा वापर करण्याकडे आपला कल आहे असे सदस्यांच्या लक्षात येता कामा नये.'

पंतप्रधानांनी चार्ल्स आणि सायमन दोघांनाही सांगितले की, त्या रात्रभर जाग्या राहतील. त्यामुळे कोणत्याही नव्या घटनेची बातमी त्यांनी ताबडतोब टेन डाउनिंग स्ट्रीटला द्यायला हवी.

चार्ल्स आणि सायमन त्यांच्या कार्यालयाकडे परतले. चार्ल्सलाही आज रात्री घरी परतणे शक्य नव्हते. हॅरीला दाईबरोबर एकटे राहावे लागणार होते. आमांदा एका जाहिरात कंपनीचे काम करण्यासाठी साऊथ अमेरिकेला गेल्याचे त्याला कळले होते.

सायमन त्याच्या कार्यालयात परतला तेव्हा सैन्याचे तीनही प्रमुख लिबिया भोवतालच्या सागराचा नकाशा भिंतीवर अडकवून पाहणी करीत होते. सायमनने त्यांना कॅबिनेटचा निर्णय सांगितला. कॅबिनेटने लष्कराचा वापर करण्यास अनुमती दिली हे ऐकून त्यांना समाधान वाटले.

'सर जॉन, मला पुन्हा एकदा योजना समजावून सांगा. उद्या सकाळी दहा वाजता मला ती कॅबिनेट पुढे मांडावी लागेल.' सायमन म्हणाला. पुढच्या तासाभरात सर जॉनने नकाशाच्या सहाय्याने संपूर्ण योजनेचे स्वरूप सायमनला समजावून दिले.

'ऑपरेशन शॉपलिफ्टर' साठी नेव्हीच्या खास पथकातल्या ३७ कमांडोज्ची निवड करण्यात आली होती. योजनेच्या सरावासाठी ह्या ३७ पाणबुड्यांना एका अत्याधुनिक सबमरीनने रॉयथ बंदरापासून एक मैल अंतरावर समुद्रात सोडण्यात येणार होते. तेथून मैलभराचे अंतर पाण्यातून पोहत हे पाणबुडे एच्. एम्. एस्. ब्रिलियंट नावाच्या विनाशिकेवर चढून जाणार होते. एच्. एम्. एस्. ब्रिलियंटची रचना ही ब्रॉडस्वोर्डच्या रचनेप्रमाणेच होती. एच् एम् एस्. ब्रिलियंट डमी लिबियन आर्मीकडून ताब्यात घेतल्यावर हे ३७ कमांडोज् ती ताबडतोब स्कॉटलंडच्या किनाऱ्यावरून मैलभर दूर नेणार होते. ह्या संपूर्ण योजनेला ६५ मिनिटांचा अवधी लागणार होता. एच्. एम्. एस्. ब्रिलियंट तीनदा ताब्यात घेण्याचा सराव केल्यानंतर ही योजना फक्त ६० मिनिटांत पार पाडता यावी अशी अपेक्षा होती.

सर जॉनने आधीच लिबियाच्या दिशेने दोन सबमरीनस्ची रवानगी केली होती. बाकी सर्व नौदलाची हालचाल नेहमीप्रमाणेच चालू ठेवली होती. त्यामुळे शत्रूला कोणत्याही प्रकारे संशय येण्यास जागा राहिली नव्हती.

सायमनने सर जॉनना सांगितले की, एच्. एम्. एस्. ब्रिलियंट ताब्यात घेण्याचा सराव प्रत्यक्ष पाहाण्याची त्याची इच्छा आहे. सर जॉनने डिफेन्स सेक्रेटरींची विनंती तत्काळ मान्य केली. सायमनने एलिझाबेथला फोन करून तो रात्री घरी येणार नसल्याचे सांगितले. तासाभरातच लष्कराचे खास हॅलिकॉप्टर सायमन आणि सर जॉनना घेऊन रॉयथ बंदराकडे निघाले.

कादरला परत पाठवले !

सकाळी पावणेतीनला हॅलिकॉप्टर स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर उतरले. सकाळी पाचपर्यंत सायमनने कमांडो पथकाच्या सरावाची पाहणी केली. सर जॉनना त्यांच्या हातातल्या नकाशावरून प्रत्येक मिनिटाला कमांडो युनिट कोणत्या ठिकाणी असेल हे सांगता येत होते. साडेसहा सात फूट उंचीचे ते पाणबुडे जितक्या चपळाईने, वेगाने आणि कौशल्याने काम करीत होते ते पाहून सायमनला समाधान वाटले. सकाळी सहाला हॅलिकॉप्टर त्याला परत घेऊन निघाले. डिफेन्स सेक्रेटरी एच् एम् एस् ब्रिलियंटवर येऊन गेले याची खुद्द सैनिकांनाही कल्पना देण्यात आली नव्हती.

चार्ल्स त्याच्या कार्यालयात परत आला तेव्हा त्याच्या परमनंट अंडरसेक्रेटरीने त्याला सांगितले की, युनायटेड नेशनस्मध्ये अजून ठरावावर मतदान झाले नसले तरी बहुसंख्य देशांच्या प्रतिनिधींनी भाषणात ब्रिटनला पाठिंबा दिला होता. चार्ल्सला त्याच्या परमनंट अंडरसेक्रेटरींनाही कॅबिनेटचा निर्णय सांगता येणे शक्य नव्हते. फॉरेन ऑफिसचे वाटाघाटींसाठी प्रयत्न चालू ठेवणे भाग होते. परमनंट अंडरसेक्रेटरींशी चर्चा करून त्याने पूर्वी लिबियात काम केलेल्या निवृत्त ब्रिटिश राजदूताला मदतीसाठी फॉरेन ऑफिसमध्ये बोलावून घेतले. अंडरसेक्रेटरींना त्याने सतत युनायटेड नेशनस्शी संपर्क ठेवून राहायला सांगितले.

उपग्रहाच्या मदतीने चार्ल्सने युनायटेड नेशनस्मधील चर्चा पडद्यावर पाहिली. एकशे सत्तेचाळीस विरुद्ध दोन मतांनी ठराव पास झाला. बावीस सदस्यांनी मतदानात भाग घेतला नाही. रशिया, अमेरिका आणि वॉर्सा करारातील सर्व देशांनी ब्रिटनच्या बाजूने मतदान केले. फक्त लिबिया आणि साऊथ येमेन ह्या दोन देशांनी ठरावाच्या विरुद्ध मतदान केले होते.

ब्रिटनच्या ठरावाला इतका अभूतपूर्व पाठिंबा मिळाल्याने आता तरी पंतप्रधान 'ऑपरेशन शॉपलिफ्टर' चा आग्रह धरणार नाहीत अशी चार्ल्सला आशा वाटत होती. त्याने ताबडतोब हॉटलाईनवरून पंतप्रधानांना बातमी कळवली. त्यांना बातमी ऐकून आनंद झाला; पण त्या म्हणाल्या की, गडाफींशी प्रत्यक्ष बोलणे होईपर्यंत 'ऑपरेशन शॉपलिफ्टर' थांबवण्याची त्यांची इच्छा नव्हती.

सकाळचे दोन वाजत आले होते. चार्ल्सने परमनंट अंडरसेक्रेटरीला लिबियाचे ब्रिटनमधील राजदूत कादर ह्यांना आपल्या कार्यालयात घेऊन यायला सांगितले.

अर्ध्या तासात कादर फॉरेन ऑफिसमध्ये हजर झाल्यावर चार्ल्सने त्यांना युनायटेड नेशनस्मध्ये प्रचंड बहुमताने ठराव पास झाल्याची बातमी दिली; पण कादरच्या मरूख चेहऱ्यावरची रेषही हलली नाही.

'जगातील बहुसंख्य देशांनी तुमच्या देशाचा निषेध केला आहे; पण अजूनही गडाफींनी कोणत्याही प्रकारे आमच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही.' --चार्ल्स म्हणाला.

'येस फॉरेन सेक्रेटरी.'

'तुमचे वकिलातीमधून गडाफींशी बोलणे झाले असेलच ?'

'नो, फॉरेन सेक्रेटरी'

'पण तुम्हाला डायरेक्ट लाईनची सोय आहे.'

'अजूनपर्यंत आम्हालाही कर्नल गडाफींशी बोलणे शक्य झाले नाही.' कादरने सांगितले.

चार्ल्सला आश्चर्य वाटले. कादरकडे रोखून पहात तो म्हणाला, 'ब्रिटनच्या चांगुलपणाचा तुम्हाला फार काळ फायदा घेता येणार नाही.'

'येस फॉरेन सेक्रेटरी.'

चार्ल्सने ताबडतोब कादरला परत पाठवून दिले. त्याच्या अंडरसेक्रेटरीने त्याला सांगितले की, गडाफीने राजकीय शिष्टाचारांचे कधीच पालन केले नसल्याचे त्याने त्यांच्या वकिलातीशी संपर्क साधला असण्याची शक्यता नव्हती.

सकाळी दहाच्या कॅबिनेट उपसमितीच्या बैठकीत सायमनने त्याने केलेल्या पाहणीचा अहवाल सादर केला. चार्ल्सचा आग्रह होता की, आता युनायटेड नेशनस्मध्ये इतका प्रचंड पाठिंबा मिळाल्याने ऑपरेशन शॉपलिफ्टर थोडा अधिक काळ लांबणीवर टाकणे हिताचे ठरले असते.

'कमांडो युनिट जर उद्या गेले नाही तर आणखी महिनाभर तरी आपल्याला दुसरी संधी मिळणार नाही.' सायमन म्हणाला.

पंतप्रधानांना सायमनचे म्हणणे लक्षात आले नाही.

'उद्या रमझानचा शेवटचा दिवस आहे. या काळात मुसलमान लोक फक्त रात्री आहार घेतात. सर्व चावे खाऊन पिऊन सुस्त झाले असतानाच हल्ला करणे आपल्याला सोयीचे पडेल. योजनेनुसार एव्हाना कमांडो युनिट शेवटचा सराव आटोपून लिबियाच्या दिशेने निघालेही असेल. आपल्या अधिकाऱ्यांनी सर्व योजना इतकी विचारपूर्वक आखली आहे की ऐन वेळी त्यात बदल करणे धोक्याचे ठरेल.' सायमन म्हणाला.

मार्गारेट थॅचरना सायमनचे म्हणणे पटले. त्या म्हणाल्या की, कॅबिनेटचा निर्णय कायम राहील. सभागृहात इमर्जन्सी डिबेटच्या वेळेस सायमन आणि चार्ल्स ऑपरेशन शॉपलिफ्टरबद्दल एक अक्षरही न काढता केवळ वाटावाटींवर जोर देतील.

'आय एक्सपेक्ट व्हेरी कन्व्हिन्सिंग परफॉरमन्स फ्रॉम यू चार्ल्स' त्या म्हणाल्या.

विरोधी पक्षांच्या वतीने अँड्रयूने मागणी केल्यामुळे शुक्रवारी संध्याकाळी सात वाजता ब्रॉडस्वोर्डवरील चर्चेला वेळ देण्याचे सभापतींनी मान्य केले. दुपारी अडीचपासून संध्याकाळी सातपर्यंत सभागृहात चाललेल्या इतर कुठल्याच विषयात सभासदांना रस नव्हता.

संध्याकाळी सातला सायमन आणि चार्ल्स सभागृहात आले त्याच वेळी ३७ कमांडोज् कॉंकरर नावाच्या पाणबुडीवर जाऊन पोहोचले होते. कॉंकरर लिबियाच्या किनाऱ्यापासून ७० मैलावर उभी करण्यात आली होती. तिच्या पाठी दहा मैलावर करेजिअस म्हणून दुसरी पाणबुडी तयार ठेवण्यात आली होती. गेले कित्येक तास दोन्ही सबमरीनस्मधून कोणत्याही प्रकारचे रेडिओ संदेश पाठवण्यात आले नव्हते. त्यामुळे देशाच्या किनाऱ्याजवळ रॉयल नेव्हीच्या सबमरीनस्चा प्रवेश झाल्याचा लिबियन नौदलाला पत्ता लागण्याचा संभव नव्हता.

'ऑपरेशन शॉपलिफ्टर' सुरू व्हायला फक्त आठ तासांचा अवधी बाकी होता. अजूनही गडाफींशी बोलण्यात पंतप्रधानांना यश आले नव्हते. सायमन आणि चार्ल्स सभागृहात आले तेव्हा सभागृहात अंदाजपत्रक सादर करण्याच्या दिवशी असते तशी शांतता पसरली होती. स्ट्रेंजर्स गॅलरी पूर्णपणे भरली होती. त्यात कादरही बसला होता.

सभापतींनी विरोधी पक्षाचा प्रवक्ता म्हणून अँड्रयू फ्रासरचे नाव घेतले. अँड्रयूने ब्रॉडस्वोर्डच्या प्रश्नाबाबत इमर्जन्सी डिबेटची गरज का आहे हे सांगून सरकारला प्रश्न केला की गडाफी कोणत्याही राजनैतिक शिष्टाचाराचे पालन करीत नसेल तर सरकार वाटाघाटीत वेळ न घालवता सैन्यबळाचा वापर का करीत नाही?

'गडाफी इज नथिंग मोअर दॅन अ पायरेट. व्हाय टॉक् ऑफ् डिप्लोमॅटिक सोलूशन?' अँड्रयूने विचारले. अँड्रयू भाषण संपवून खाली बसल्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला. सगळ्यांच्या नजरा सायमनकडे वळल्या; पण सायमनच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते.

सभापतींनी फॉरेन सेक्रेटरी चार्ल्स सेमूरना बोलण्यास सांगितले.

सायमन...रिझाईन...रिझाईन

पुन्हा एकदा सभागृहात शांतता पसरली.

चार्ल्सने युनायटेड नेशनस्मधील चर्चेचा सविस्तर वृत्तांत सभासदांपुढे ठेवला. तो म्हणाला की आता ठराव बहुमताने पास झाल्याने युनायटेड नेशनस्चे सेक्रेटरी जनरल गडाफींना प्रत्यक्ष भेटून जागतिक नेत्यांच्या भावना त्यांच्या कानावर घालतील.

'अशा प्रसंगी आपण ब्रॉडस्वोर्डची सुटका करण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग स्वीकारला तर सर्व मित्र देशांची सहानुभूती आपल्याला गमवावी लागेल.'

चार्ल्स खाली बसला तेव्हा फक्त निवडक लोकांनी टाळ्या वाजवल्या.

यानंतर झालेल्या भाषणात इतर अनेक सदस्यांनी लष्कराचा वापर केला जावा अशी मागणी केली. मार्गारेट थॅचर आणि सायमन यांच्या चेहऱ्यावरून कुणालाही कल्पना आली नसती की सरकारचे त्याच दिशेने प्रयत्न चालले होते.

सरकारतर्फे समारोपाचे भाषण करण्यास सायमन उभा राहिला. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. सायमनने अतिशय तर्कशुद्ध भाषण करून वाटाघाटींचा मार्गच कसा योग्य आहे हे सभासदांना पटवून दिले. त्याने भाषणात फॉरेन सेक्रेटरींच्या प्रयत्नांची स्तुती केली. दहा वाजत आले तसे सभासद अस्वस्थ होऊ लागले.

भाषण संपवून सायमन खाली बसला तसे 'रिझाईन्' 'रिझाईन' अशा घोषणा बऱ्याच सदस्यांनी दिल्या.

अँड्रयूने स्वत: लेबर गव्हर्नमेन्टमध्ये मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिफेन्स म्हणून काम केले होते. त्याने सायमन आणि चार्ल्सची भाषणे लक्षपूर्वक ऐकली. सायमनच्या मनात काही वेगळी योजना आहे अशी त्याला शंका आली पण डिफेन्स डिपार्टमेंटमध्ये नेमके काय चालले आहे हे कळायला मार्ग नव्हता.

सभागृहातले काम आटोपल्यावर सायमन आणि चार्ल्स ताबडतोब



सायमन–चार्ल्स–महत्त्वाचा निर्णय

¤

आपल्या कार्यालयाकडे परतले. सायमनने इलिझाबेथला फोन करून कळवले की आजही त्याला घरी परतणे शक्य नव्हते.

'ऑपरेशन शॉपलिफ्टर' तडीस जाईपर्यंत कोणत्याही प्रकारचा संदेश सबमरीनवरून पाठवला जाणार नव्हता. त्यामुळे रात्री बारापासून सकाळी चारपर्यंत काहीही करणे शक्य नव्हते. तरीही सैन्याचे तीनही प्रमुख ऑपरेशनरुममध्ये बसून राहिले. रॉयल नेव्ही, आर्मी आणि एअरफोर्सचे प्रमुख एकाच वेळी हाताशी असल्याने उरलेल्या वेळात सायमनने त्यांच्याशी चर्चा करून खात्याच्या बऱ्याच प्रश्नांवर निर्णय घेतले. एरवी हेच काम पत्रव्यवहार करून पुरे करायला सायमनला महिना लागला असता.

रात्री साडेबाराला वृत्तपत्रांच्या पहिल्या एडिशनस् सायमनच्या कार्यालयात आणल्या गेल्या. टेलिग्राफची हेडलाईन होती 'कसलेकस् इन हीज् हॅमॉक टिल् द ग्रेट आर्माडा कमज्' टेलिग्राफच्या एडिटोरिअलमध्ये सायमनवर टीका होती. आय् आर् ए ने केलेल्या बॉंबस्फोटात जखमी झाल्यानंतर कोणताही धोका पत्करण्याची सायमनची कुवत कमी झाली आहे असे त्यांचे म्हणणे होते. डेली एक्सप्रेसचा बॅनर फक्त एक शब्दाचा होता –'रिझाईन'

वृत्तपत्रांचे मथळे पाहून सैन्याच्या तीनही प्रमुखांना हसू आले. सर जॉनने सायमनला सांगितले की टेहळणी करणाऱ्या बोटीवरून त्यांना संदेश मिळाला होता. कॉंकरर आणि करेजिअस ह्या दोन्ही सबमरीन्स ठरल्या जागी जाऊन पोहोचल्या होत्या.

रात्रीचा एक वाजत आला होता. सायमनने त्याची चालण्याची काठी घेतली आणि तो पंतप्रधानांना भेटायला निघाला. डिफेन्स सेक्रेटरींसाठी असलेल्या खाजगी लिफ्टमधून तो खाली उतरला आणि त्याच इमारतीतून सुरू झालेल्या भुयारी मार्गाने टेन डाऊनिंग स्ट्रीटवर बाहेर पडला.

कॅबिनेट रुममध्ये पंतप्रधान एकटयाच बसून होत्या. ब्रिटिश इकॉनॉमीवर कॅबिनेटपुढे सादर केलेला स्पेशल रिपोर्ट त्या वाचत होत्या. सायमनने पुन्हा एकवार त्यांना 'ऑपरेशन शॉपलिफ्टर' समजावून दिले. 'सकाळी सहा वाजायच्या आत योजना पार पाडली असेल' तो म्हणाला.

'गुड. पहिला संदेश येताक्षणी मला कळव.' पंतप्रधान म्हणाल्या.

दीडच्या सुमारास सायमन त्याच्या प्रायव्हेट लिफ्टने कार्यालयात आला. लष्करी अधिकारी अजूनही ऑपरेशनरुममध्ये बसून होते. कुणाच्याच चेहऱ्यावर थकवा जाणवत नव्हता. ऑपरेशनरुममध्ये बसल्या बसल्या त्यांच्या इतर बऱ्याच गप्पा झाल्या. घड्याळात दोनचा ठोका पडला तेव्हा सर जॉन म्हणाले 'लिबियात आता सकाळचे चार वाजले असतील. कमांडोज्नी आता ब्रॉडस्वोर्डच्या दिशेने पोहायला सुरुवात केली असेल.'

तीन वाजून वीस मिनिटांनी अचानक फोन वाजला तसा सायमन दचकला. चार्ल्स फोनवर होता. 'सायमन मला गडाफींशी बोलण्यात यश आले. लिबिया वाटाघाटी करायला तयार आहे.'

सायमनने घड्याळ पाहिले टाईमटेबलनुसार कमांडोज् ब्रॉडस्वोर्डपासून चारशे साडेचारशे यार्ड दूर असतील.

'आता खूप उशीर झाला आहे. त्यांना थांबवणे मला शक्य नाही.' सायमन म्हणाला.

'डोंट बी सच अ ब्लडी फूल– ऑर्डर देम टू टर्न बॅक. डोंट यू अंडरस्टॅंड बुई हॅव बन् अ डिप्लोमॅटिक कू?'

'गडाफी आणखी चार महिने आपल्याला वाटाघाटीत झुलवत ठेवेल. त्यामुळे आपली मानहानी व्हायची टळणार नाही, ऑपरेशन शॉपलिफ्टर आता थांबणार नाही.' सायमनने शांतपणाने उत्तर दिले.

'तुझ्या उद्धटपणाबद्दल पंतप्रधानांकडे मला तक्रार करावी लागेल. असे म्हणून चार्ल्सने रिसिव्हर खाली आदळला.

सायमन जागेवरच बसून होता. त्याला अजून थोडा अवधी हवाच होता. पुन्हा एकदा फोन वाजला. मार्गारेट थॅचर फोनवर होत्या.

'कॅन यू स्टॉप देम इफ् आय् ऑर्डर यू, सायमन?'

'येस प्राईम् मिनिस्टर' सायमनपुढे दुसरा मार्गच नव्हता.

'ऑपरेशन शॉपलिफ्टर पुढे चालू ठेवावे असे तुला वाटते?'

सायमन काहीच बोलला नाही. त्याला घाम फुटायला लागला होता.

'चार्ल्सला गडाफीशी बोलण्यात यश आले आहे असे त्याचे म्हणणे आहे. ऑपरेशन शॉपलिफ्टर अयशस्वी झाले तर काय परिणाम होतील याची तुला कल्पना आहे का?'

'तसे झाले तर सकाळी आठपर्यंत माझा राजिनामा तुमच्या हातात असेल.' सायमन म्हणाला.

'तुझ्याबरोबर मलाही राजिनामा द्यायला लागेल. उद्या ह्यावेळेपर्यंत चार्ल्स पंतप्रधान झालेला असेल.'

मग थोडा वेळ थांबून पंतप्रधान म्हणाल्या 'गडाफी दुसऱ्या फोनवर आहेत पण पुढची पंधरा मिनिटे मी त्यांच्याशी बोलणार नाही. तेवढ्या वेळात ऑपरेशन यशस्वी होईल अशी माझी अपेक्षा आहे.'

डोक्यावरून प्रचंड ओझे उतरल्याचा सायमनला भास झाला.

'गुड लक, सायमन. चार्ल्सला फोन करून मी माझा निर्णय कळवते.' पंतप्रधान म्हणाल्या.

रिसिव्हर खाली ठेवल्यावर सायमनने घड्याळाकडे पाहिले. सकाळचे साडेतीन वाजले होते. ऑपरेशन रुममध्ये बसलेले सगळेच अधिकारी अस्वस्थ झाले होते. युगांडातील एंटेबी विमानतळ ताब्यात घेताना तेल अविव्हमधील इझराईली अधिकाऱ्यांचीही अशीच स्थिती झाली असेल, सायमनला वाटले.

पुन्हा एकदा फोन वाजला. पंतप्रधान पुन्हा फोन करणार नाहीत याची सायमनला खात्री होती. अख्या ब्रिटनमध्ये ती एकच व्यक्ती अशी होती की एकदा निर्णय घेतला की त्यांनी तो परत फिरवला नसता. चार्ल्स सेमूरचा फोन होता.

'सायमन मी तुला स्पष्टपणे बजावतो. गडाफीशी बोलणे झाल्याची बातमी मी तुला तीन वाजून वीस मिनिटांनी दिली. ऑपरेशन शॉपलिफ्टरला अपयश आले तर त्याला फॉरेन मिनिस्ट्री जबाबदारी नाही. तुला एकट्याला राजिनामा द्यावा लागेल.'

'मला माझ्या जबाबदारीची जाणीव आहे' असे म्हणून सायमनने फोन हूक वरून खाली काढून ठेवला.

घड्याळात चारचा ठोका पडला. अचानक ऑपरेशनरुममधले सगळे लष्करी अधिकारी उठून उभे राहिले. निर्णायक क्षण जवळ आला होता.

चार वाजून सात मिनिटांनी पहिल्यांदा रिसिव्हींग सेटमधला दिवा लागला. ब्रॉडस्वोर्ड वरून फक्त पाच शब्दांचा मेसेज आला होता.

'शॉपलिफ्टर ॲप्रिहेंडेड, रिपीट शॉपलिफ्टर ॲप्रिहेंडेड.'

एका क्षणात सगळ्यांचे चेहेरे फुलले. कमांडोज्नी ब्रॉडस्वोर्ड ताब्यात घेऊन समुद्रात मैलभर दूर आणले होते. सायमनने ताबडतोब नंबर टेनला फोन लावला. पंतप्रधान अजून जाग्या होत्या.

'शॉपलिफ्टर ॲप्रिहेंडेड' सायमन म्हणाला.

'कॉंग्रेटचूलेशन्स, कंटीन्यू ॲज ॲग्रिड'

योजनेप्रमाणे पकडलेल्या पिपल्स लिबरेशन आर्मीच्या दहशतवाद्यांना माल्टा बंदरात उतरवून दण्यात येणार होते. ह्या पुढचा मेसेज ब्रॉडस्वोर्ड वरून सकाळी पाच वाजता पाठवावा असे ठरले होते.

ब्रॉडस्वोर्डचे स्वागत

पाच वाजता ब्रॉडस्वोर्डचे कॅप्टन लॉरेन्स पॅकार्ड यांचा आवाज रिसिव्हिंग सेटवर आला. त्यांनी सायमनला ऑपरेशन शॉपलिफ्टरचा संपूर्ण तपशील दिला. एक लिबियन दहशतवादी मारला गेला होता आणि अकराजण जखमी झाले होते. ब्रिटिश नेव्हीचा एकही सैनिक ठार झाला नव्हता फक्त चार कमांडोजना किरकोळ जखमा झाल्या होत्या. पाणबुडे कॉकरर आणि करेजिअस ह्या सबमरीनस्वर परतले होते. एच् एम् एस् ब्रॉडस्वोर्डची दोन इंजिन्स् निकामी झाली होती. ती जवळच्या बंदरात दुरुस्त करण्यात येणार होती. संभाषण थांबवण्यापूर्वी सायमनने पुन्हा एकदा कॅप्टन पॅकार्डचे अभिनंदन केले.

सव्वापाच वाजता सायमन त्याच्या कार्यालयातून बाहेर पडला. टेन डाउनिंग स्ट्रीटवर त्याला आता भुयारी मार्गाने जायची गरज नव्हती. सायमन डाव्या पायाने अजूनही लंगडत असे. डिफेन्स सेक्रेटरींच्या काठीचा आवाज ऐकल्याबरोबर दरवाजाशी उभे असलेले शरीररक्षक ताबडतोब उठून त्याच्याबरोबर निघाले.

भर पहाटे देखील पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर दोन वार्ताहर आणि एक फोटोग्राफर उभे होते. सायमन इतक्या पहाटे पंतप्रधानांकडे आला त्याअर्थी काही महत्त्वाची बातमी आहे हे त्यांच्या लक्षात आले; पण त्यांच्या एकाही प्रश्नाचे उत्तर न देता सायमन सरळ कॅबिनेट रूममध्ये गेला. चार्ल्स आधीच येऊन पोहोचला होता. सायमनने त्यांना कॅप्टन पॅकार्डबरोबर झालेले संभाषण सांगितले.

'वेल डन, सायमन' पंतप्रधान म्हणाल्या.

चार्ल्स काहीच बोलला नाही.

ऑपरेशन शॉपलिफ्टरबद्दल साडेतीनला पंतप्रधानांनी सभागृहात निवेदन करावे असे ठरले.

शनिवारी संध्याकाळीही सायमनला झोप घेणे शक्य झाले नाही. त्याचा मोठा मुलगा पीटर ऑक्सफर्डच्या फुटबॉल टीममध्ये होता. त्याची फुटबॉलची फायनल मॅच होती. जाताना वाटेत एलिझाबेथनी सायमनला सांगितले की तिने दुपारी चार्ल्सचा बीबीसीने घेतलेला इंटरव्यू पाहिला. त्यात चार्ल्स म्हणाला होता की, सायमनच्या ऑपरेशन शॉपलिफ्टरला फॉरेन डिपार्टमेंटने सुरुवातीपासूनच पाठिंबा दिला होता. 'फक्त बाहेर कुणाला सुगावा लागू नये यासाठी वाटाघाटींचे प्रयत्न चालू ठेवणे मला भाग होते.'

'आयुष्यात पहिल्यांदाच खोटे बोलल्याचा मला अभिमान वाटला.' चार्ल्सने बीबीसीच्या वार्ताहाराला सांगितले.

सायमनला हसू आले. त्याने एलिझाबेथला सगळी हकीगत सांगितली. तिला धक्काच बसला.

'मग तू बीबीसीवर तसं सांगत का नाहीस ?'

'तसं सांगितले तर फॉरेन सेक्रेटरी आणि डिफेन्स सेक्रेटरी यांचे पटत नाही हे जाहीर होईल. पक्षाच्या दृष्टीने ते हिताचे होणार नाही.' सायमन म्हणाला.

'मला तुझे राजकारण काही कळत नाही.' एलिझाबेथ म्हणाली.

ह्यानंतर बरोबर एक आठवड्याने शनिवारी सकाळी सायमन त्याच्या कार्यालयात बसला असताना त्याच्या अंडर सेक्रेटरीने बातमी दिली. एच् एम् एस् ब्रॉडस्वोर्ड दुपारी तीनपर्यंत पोर्टस् माऊथ बंदरात पोहोचणार होती. सेक्रेटरीने त्याला सांगितले की, ब्रॉडस्वोर्डचे स्वागत करण्यासाठी त्याला पोर्टस्माऊथला जावे लागणार होते. सायमनसाठी रॉयल एअर फोर्सचे खास हॅलिकॉप्टर तयार होते. पंधरा मिनिटात काम आटोपते घेऊन सायमन कार्यालयाबाहेर पडणार तोच फोन वाजला. सायमनने दारातूनच सेक्रेटरीला सांगितले की, जो कुणी असेल त्याला सांगा की डिफेन्स सेक्रेटरी घाईत आहेत.

'आय डोंट थिंक् आय कॅन, सर' सेक्रेटरी म्हणाला.

सायमन क्षणभर गोंधळून थांबला.

'हू इज इट ?'

'हर मॅजेस्टी द क्वीन.'

सायमन ताबडतोब परत फिरला. कॅप्टन लॉरेन्स पॅकार्डसाठी राणीने दिलेला निरोप ऐकून सायमनला आनंद झाला. त्याने ताबडतोब राणीचे आभार मानून सांगितले की पोर्टस्माऊथला पोहोचल्याबरोबर तो कॅप्टन पॅकार्डला राणीचा निरोप सांगेल.

सायमनने हॅलिकॉप्टर पोर्टस् माऊथला पोहोचले तेव्हा हॅलिकॉप्टरमधून त्याने खाली जमलेला प्रचंड जनसमुदाय पाहिला. हॅलिकॉप्टर उतरेपर्यंत एक तास गेला. त्याला उतरवून घ्यायला रॉयल नेव्हीचे



सायमन...विजयाचा आनंद

□

प्रमुख सर जॉन आले होते. एच् एम् एस् ब्रॉडस्वोर्ड बंदरात शिरायला अजून तासभर अवकाश होता. सायमन दुर्बिणीतून ब्रॉडस्वोर्डला येताना पहात होता.

सर जॉन सायमनला म्हणाले की कॅप्टन पॅकार्डनी त्यांना वायरलेसवर विचारले होते की डिफेन्स सेक्रेटरींना ब्रॉडस्वोर्ड बंदरात शिरण्यापूर्वी विनाशिकेवर यायचे असेल तर तशी व्यवस्था करता येईल. सायमनने नकार दिला 'इटस् हीज डे, नॉट माइन.' तो म्हणाला.

'ह्यासाठीच अधिकाऱ्यांना तुमच्याबद्दल आदर वाटतो.' सर जॉन म्हणाले आणि मग आवाज खाली करून बोलले, 'फॉरेन सेक्रेटरी तुमच्याबरोबर आले नाहीत ही चांगली गोष्ट झाली.'

सायमनचे उत्तर सर जॉनना लोकांच्या घोषणात ऐकू गेले नाही. एच् एम् एस् ब्रॉडस्वोर्ड आता बंदरात प्रवेश करीत होती. ब्रॉडस्वोर्डवरच्या खलाशांचे स्वागत करण्याकरता जवळजवळ पाच लाख लोकांचा समुदाय बंदरावर लोटला होता.

गर्दीतून डिफेन्स सेक्रेटरीपर्यंत पोहोचेस्तोवर कॅप्टन पॅकार्डना अर्धा तास लागला. सायमनपुढे उभे राहून त्यांनी सॅल्यूट केला. लोकांच्या घोषणांमुळे राणीचा निरोप सायमनला त्यांच्या कानात ओरडून सांगावा लागला.

'वेलकम होम, रिअर–ॲडमिरल, सर लॉरेन्स पॅकार्ड.'

फॉकलंडच्या युद्धाचा मिळाला तितका ब्रॉडस्वोर्डच्या सुटकेचा फायदा कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारला मिळाला नाही. एकोणिसशे शहाऐंशीच्या अखेरीस जिनिव्हामध्ये रीगन, चेर्नेन्को आणि थॅचर ह्यांच्यामध्ये निःशस्त्रीकरणाबाबत झालेली बोलणी फिसकटली आणि त्याचबरोबर थॅचरच्या लोकप्रियतेची ओहोटीही सुरू झाली.

बोलणी फिसकटल्याबद्दल रशियाने ब्रिटनवर दोष टाकला. ब्रॉडस्वोर्डच्या घटनेपासून मार्गारेट थॅचरनी नेहमीच लढाऊ पवित्रा घेतला, असा चेर्नेन्कोंचा आरोप होता. ते म्हणाले की युनोमध्ये रशियाने ब्रिटनला पाठिंबा दिला असतानाही थॅचरनी लष्करीबळाचा वापर केला.

मार्गारेट थॅचर सतत आठ वर्षे ब्रिटनच्या पंतप्रधान राहिल्या होत्या. लागोपाठ दोन टर्म्स पंतप्रधान राहण्याचा विक्रम अठराशे बारामध्ये लॉर्ड लिव्हरपूलनी केला होता. त्यानंतर हा मान आता मार्गारेट थॅचरना मिळणार होता.

आपली लोकप्रियता कसाला लावण्यासाठी थॅचर लवकरच निवडणुका जाहीर करतील असे रेमंडला वाटत होते. एकोणिसशे शहाऐंशीचा ख्रिस्मस लीडस्मध्ये आईवडिलांच्या घरी साजरा करून जॉईसबरोबर लंडनला परतताना रेमंडने जॉईसला सांगितले की येत्या जूनमध्ये थॅचर बहुधा निवडणुका घेण्याचे ठरवतील.

सार्वत्रिक निवडणुकांत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला जून महिन्याने नेहमीच हात दिला होता. मागच्या वेळेप्रमाणे या खेपेसही मार्गारेट थॅचरनी जूनअखेरीस जनमताचा कौल घेण्याचे ठरवले.

निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यावर रेमंड लीडस्ला परतला. ह्या वेळी लीडस् मधल्या प्रचाराला त्याला फक्त तीन दिवस मिळाले. पक्षाचा प्रमुख नेता म्हणून प्रचारासाठी देशभर मार्जिनल कॉन्स्टीटयुअन्सीजमधून त्याला फिरावे लागले.

राष्ट्रीय पातळीवरून पक्षाचा प्रचार करण्याचा रेमंडचा हा नवा अनुभव होता. गेल्या पंचवीस वर्षात राजकारण त्याच्या रक्तात इतके भिनले होते की दिवसाला १०–१५ प्रचार सभांतून भाषण करण्याचे त्याला कधी ओझे वाटले नाही. लीडस्मध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने त्याच्याविरूद्ध उभा केलेला उमेदवार १९६४ मध्ये जन्माला आला होता. त्याच वर्षी रेमंडने पहिल्यांदा हाऊस ऑफ कॉमन्समध्ये पाऊल टाकले होते.

रेमंडप्रमाणे चार्ल्स आणि सायमनही आता राष्ट्रीय पातळीवर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा प्रचार करीत होते. चार्ल्सचा ससेक्स डाऊन आणि सायमनचा पकल्ब्रिज हे मतदार संघ कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे बालेकिल्ले होते. आय्. आर्. ए. ने केलेल्या बॉंबस्फोटात जखमी झाल्याने आणि ब्रॉडस्वोर्डच्या सुटकेतील कामगिरीमुळे सायमनची लोकप्रियता खूपच वाढली होती. सर्वत्र त्याच्या भाषणांना गर्दी लोटत असे.

फ्रँक ब्रॉईलमुळे ॲंड्रयू मात्र एडिंबरो कार्लटनमध्ये अडकून पडला होता. मतदारसंघ सोडून इतरत्र सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रचारास त्याला फिरता येत नव्हते. फ्रँक ब्रॉईलविरूद्ध मागची निवडणूक त्याने नाणेफेकीवर जिंकली होती. दर खेपेस नशीब आपल्याला साथ देईल अशी अपेक्षा त्याला ठेवता आली नसती. ॲंड्रयूच्या राजकीय जिवनातली ही आठवी निवडणूक. ह्या मधल्या पाच वर्षांत त्याने एडिंबरो कार्लटनमध्ये सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचा चांगलाच जम बसवला होता.

दोन आठवडे निवडणुकीच्या प्रचाराने देश ढवळून निघाला. बुधवारपर्यंत प्रचार थांबला तेव्हा ओपिनिअन पोलमध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह आणि लेबर पार्टी एकमेकांच्या अगदी जवळ होत्या.

गुरुवारी संध्याकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. ॲंड्रयूची दत्तक मुलगी क्लेअर आता १३ वर्षाची झाली होती. वडिलांबरोबर हट्टाने ती टाऊन हॉलवर मतमोजणी पाहायला आली.

ॲंड्रयू सुरुवातीपासूनच आघाडीवर होता. रात्री साडेनऊपर्यंत त्याचा विजय होणार हे स्पष्ट झाले. साडे बाराला मतमोजणी

संपली. दोन हजार मतांची आघाडी घेऊन अँड्रयू निवडणूक जिंकला होता.

देशातील इतर मतदार संघातले निकालही जाहीर होत होते; परंतु हाऊस ऑफ कॉमन्सचे चित्र मात्र अजून स्पष्ट झाले नव्हते. शुक्रवारी दुपारी चारपर्यंत कोणत्या पक्षाला निर्णायक बहुमत मिळेल हे स्पष्ट झाले नव्हते. चार वाजून दहा मिनिटांनी बीबीसीच्या इलेक्शन स्पेशल प्रोग्रॅमवर पोल ॲनालिस्ट डेव्हिड डिम्बलेबींनी जाहीर केले 'इट विल बी अ हंग पार्लमेंट' कोणत्याही पक्षाला निर्णायक बहुमत मिळाले नव्हते. जाहीर झालेल्या जागांचा तपशील खालीलप्रमाणे होता.

कॉन्झर्व्हेटिव्ह–३१७

लेबर– २८८

लिबरल / सोशल डेमोक्रॅटिक पार्टी अलायन्स– ३४

अल्स्टर युनिअनिस्ट–१७

इतर– ४

सर्वात अधिक सदस्य कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे असल्याने मार्गारेट थॅचरना सरकार बनवण्याची संधी मिळेल हे उघड होते; परंतु निर्णायक बहुमत नसल्याने हे सरकार फार काळ टिकणार नाही आणि वर्षभरातच थॅचरना पुन्हा लोकमत अजमावावे लागेल हेही निश्चित होते.

थॅचरनी आपल्या नव्या मंत्रिमंडळात फारसा बदल केला नाही. फक्त चार्ल्सची बदली फॉरेन ऑफिसवरून होम डिपार्टमेंटला करण्यात आली आणि सायमन नव्या सरकारात फॉरेन सेक्रेटरी बनला.

जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून पार्लमेंटची उन्हाळी सुट्टी सुरू झाली आणि सभासद त्यांच्या मतदार संघात परतले.

ऑगस्टच्या मध्याशी लेबर पार्टीतील अतिडाव्या गटाचा नेता टोनी बेन ह्याने किनॉकच्या नेतृत्वाला आव्हान दिले. ऑक्टोबर महिना हा इंग्लंडमधील राजकीय पक्षांच्या वार्षिक परिषदांचा काळ असतो. ह्या काळात पक्षाच्या नेतेपदासाठी निवडणूक घेतली जाते. ऑक्टोबर कॉन्फरन्समध्ये आपण नेतेपदासाठी निवडणूक लढविणार असल्याचे बेनने जाहीर केले. सार्वत्रिक निवडणुकीत लेबर पार्टीच्या पराभवासाठी अतिडाव्या गटाने किनॉकला जबाबदार धरले होते. टोनी बेनने आपली उमेदवारी जाहीर केल्याबरोबर रॉय हॅटर्सले, जॉनस्मिथ हे दोन उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरले. पक्षातील बऱ्याच सदस्यांनी रेमंडला निवडणूक लढवण्याचा आग्रह धरला.

'तू जर ह्या वेळेस निवडणुकीला उभा राहिला नाहीस तर तुला पक्षात भवितव्य उरणार नाही.' जॉईसने रेमंडला बजावले. जॉईसशी बराच काळ विचारविनिमय केल्यावर रेमंडने उपनेतेपदाच्या निवडणुकीसाठी आपली उमेदवारी जाहीर केली. उपनेतेपदासाठी मायकेल मिचर आणि जॉन कनिंगहॅम हे आणखी दोन उमेदवार रिंगणात होते.

सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन रेमंडने लेबरपार्टीच्या उपनेतेपदासाठी आपली उमेदवारी जाहीर केली.

मतदानाच्या पहिल्या फेरीत एकूण चार उमेदवारात टोनी बेनला अधिक मते पडली आणि नील किनॉक तिसऱ्या क्रमांकावर गेले. रॉय हॅटर्सले दुसऱ्या क्रमांकावर होते. किनॉकनी आपली उमेदवारी माग घेऊन रॉय हॅटर्सलेंना आपला पाठिंबा जाहीर केला.

मतदानाच्या दुसऱ्या फेरीत टोनी बेन आणि त्याच्या अतिडाव्या गटाचा पराभव झाला आणि रॉय हॅटर्सले यांची लेबर पार्टीचे नेते म्हणून निवड झाली. उपनेतेपदासाठी झालेल्या निवडणुकीत तीन टक्के मते अधिक मिळवून रेमंड विजयी झाला.

हॅटर्सलेंना रेमंडने मागच्या निवडणुकीतही पाठिंबा दिला असल्याने त्यांनी ताबडतोब शॅडो कॅबिनेटमध्ये रेमंडची शॅडो फायनान्स मिनिस्टर म्हणून नेमणूक केली.

नेमणूक झाल्यावर रेमंडला बऱ्याच अभिनंदनाच्या तारा आल्या. त्यापैकी एक केटची होती. 'पक्षाच्या घटनेतील ऑर्डर ५ (४) तू वाचली आहेस का?' असा प्रश्न रेमंडचे अभिनंदन केल्यानंतर केटने केला होता. रेमंडला घटनेतली तरतुद नीटशी आठवत नव्हती. त्याने पुन्हा पक्षाची घटना चाळून पाहिली. ऑर्डर ५ (४) वाचल्यावर त्याला हसू आले.

रॉय हॅटर्सलेंची नवी टीम ताज्या दमाची होती. सभागृहात पूर्ण बहुमत नसल्याने कोणतेही बिल पास करून घेणे थॅचरना दिवसेंदिवस जड जात होते.

लेबर पार्टी प्रथमच सत्तेवर

नोव्हेंबर १९८८ मध्ये अमेरिकेत झालेल्या निवडणुकीत सेनेटर गॅरी हार्ट प्रेसिडेंट म्हणून निवडून आले. हार्टच्या आर्थिक धोरणामुळे ब्रिटनच्या निर्यात व्यवस्थेवर परिणाम व्हायला लागला होता. ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला खरा फटका बसला तो ब्राझील आणि अर्जेंटिनामुळे. ह्या दोन्ही देशात नव्याने स्थापन झालेली सरकारे आधीच्या लष्करी शासनाने ब्रिटनकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करायला तयार नव्हती. ह्यामुळे बँक ऑफ इंग्लंड संकटात पडली होती आणि थॅचरचे कॉन्झर्व्हेटिव्ह सरकार अडचणीत आले होते.

एकोणिसशे अठ्ठ्याऐंशीचे हिवाळी अधिवेशन थॅचरना फारच त्रासाचे गेले. थॅचर आता फक्त फेरनिवडणूक घेण्यासाठी योग्य संधीची वाट पाहात होत्या.

ख्रिसमसनंतर जानेवारीत सभासद पुन्हा कॉमन्समध्ये परतले. आणि जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यातच तीन दिवसांच्या अंतराने दोन वयस्कर कॉन्झर्व्हेटिव्ह सभासद मृत्यू पावले. वर्तमानपत्रांतून थॅचरच्या सरकारचे वर्णन आता 'लेमडक् ॲडमिनिस्ट्रेशन' असे केले जात होते.

दोन खासदारांच्या मृत्यूनंतर रिकाम्या झालेल्या जागांसाठी थॅचरनी मे महिन्यात बायइलेक्शन घेण्याचे ठरवले. दोन्ही जागा पूर्वीपेक्षा कमी मतांनी का होईना पण टिकवून ठेवण्यात थॅचरना यश लाभले. पुन्हा एकदा जूनच्या तिसऱ्या आठवड्यात सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे त्यांनी ठरवले. आधीच्या निवडणुकीनंतर जेमतेम एक वर्ष कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी सत्तेवर राहिली होती.

ह्या खेपेस मात्र जून महिन्याने थॅचरना हात दिला नाही; पण लेबर पार्टीलाही प्रचंड बहुमत लाभले नाही. इतर सर्व पक्षांना जमेस धरून लेबर पार्टीचे चार सभासदांचे बहुमत होते. दोन तृतियांश बहुमत मिळविण्यात अपयश आले तरी वर्किंग मेजॉरिटी मिळाल्याने १९७९ नंतर नऊ वर्षांनी प्रथमच लेबर पार्टी सत्तेवर येणार होती.

निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे होता.

लेबर – ३२६

कॉन्झर्व्हेटिव्ह – २८९

लिबरल / सोशल डेमोक्रॅटिक पार्टी अलायन्स – ३३

अल्स्टर युनिअनिस्ट – १०

इतर – २

निवडणुकीचे निकाल रेमंडने लीड्समध्ये आईवडिलांच्या घरी टीव्हीवर पाहिले. सकाळी जॉईसबरोबर मतदार संघाची फेरी मारून त्याने मतदारांचे आभार मानले. दुपारी ती दोघं लंडनला निघाली तेव्हा लोकांनी मिरवणुकीने त्याला विमानतळावर नेले. लंडनच्या कॉवले स्ट्रीटवरच्या घरात बसून रेमंड आणि जॉईसने टीव्हीवर रॉय हॅटर्सलेना लोकांना अभिवादन करत बकिंगहॅम पॅलेस मधून बाहेर पडताना पाहिले, तेव्हा रेमंडला आपला आठ वर्षांचा वनवास संपला ह्याची खात्री पटली.

रॉय हॅटर्सलेनी कॅबिनेटमधली पहिली नेमणूक रेमंड गोल्डची केली होती– फायनान्स मिनिस्टर म्हणून. रेमंडला देण्यात आलेला बंगला पंतप्रधानांच्या बंगल्याला लागूनच होता. कॉवले स्ट्रीटवरचे घर सहा–सहा महिन्यांच्या लीज्वर भाड्याने देण्याची इस्टेट एजंटला सूचना देऊन रेमंड आणि जॉईसने नव्या घरात आपले बस्तान हलवले. रेमंड शॅडो फायनान्स मिनिस्टर असताना त्याच्या फायनान्स टीममध्ये जे सहकारी होते त्यांनाच त्याने फायनान्स मिनिस्टर झाल्यावर मदतीसाठी बोलावून घेतले. नेमणूक झाल्याच्या दुसऱ्याच दिवसापासून रेमंड लेबर पार्टीच्या पहिल्या अंदाज पत्रकाच्या तयारीलाही लागला.

रेमंडला आलेल्या अभिनंदनाच्या तारा एकत्र ठेवत असताना जॉईसला मिसेस केट विल्बरहॉफची तार दिसली. केट आता सुरळीत संसाराला लागली होती. रेमंडला ह्या बातमीने समाधान वाटले.

या खेपेस अँड्रयू सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या तिकिटावर एडिंबरो कार्लटनमधून ३,००० मतांच्या आघाडीने निवडून आला होता. सतत तीन निवडणुकांत पराभव झाल्याने फ्रँक बॉईल आता निराश झाला होता. ह्यापुढे आपल्याला निवडणूक लढवायची इच्छा नसल्याचे त्याने पक्षाच्या निवडसमितीला कळवले होते.

मतदारांचे आभार मानून अँड्रयू सोमवारी लंडनला परत आला तेव्हा सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे नेते डेव्हीड ओवेन ह्यांनी त्याला त्यांच्या कार्यालयात बोलावले. त्यांनी अँड्रयूला सांगितले की सतत सात वर्षे नव्या पक्षाचे नेतृत्व केल्यानंतर त्यांना आता नव्या रक्ताला वाव देण्याची इच्छा होती. पुढच्या निवडणुका जाहीर होण्याआधी तीन–चार वर्षेतरी नव्या नेत्याला पक्ष सांभाळण्याची संधी मिळावी म्हणून महिनाभरातच आपल्या पदाचा राजिनामा जाहीर करण्याचे त्यांनी ठरवले होते. अँड्रयूच्या उमेदवारीला पक्षात कुणाचाही विरोध होण्याचा संभव नव्हता. त्यामुळे त्याने नेतेपद स्वीकारावे असा त्यांचा आग्रह होता.

ऑक्टोबरमध्ये राणीने कॉमन्सच्या नव्या अधिवेशनाचे उद्घाटन केल्यानंतर पहिल्याच आठवड्यात सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेतेपदासाठी निवडणूक घेण्यात आली. अँड्रयूने निवडणूक जिंकली म्हणण्यापेक्षा त्याची नेतेपदी नेमणूक झाली असे म्हणायला हवे. कारण त्याच्याविरुद्ध कोणीही उमेदवार उभा राहिला नाही

पक्षाचा नेता झाल्याने अँड्रयूला प्रसिद्धी मात्र खूप मिळाली. 'सन' ह्या वृत्तपत्राने तर ॲलिसन बरोबर त्याचे मोडलेले लग्न, त्याच्या एकुलत्या एक मुलाचा मृत्यू, लुईसचे आजारपण, त्याची दत्तक मुलगी वलेअर, नाणेफेकीने खासदार म्हणून झालेली त्याची निवड– ह्या अँड्रयूच्या आयुष्यातल्या साऱ्या टळक घटनांची नोंद घेतली होती.

सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने नेतेपदासाठी तरुण रक्ताला वाव दिल्याने आता मार्गारेट थॅचरही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीतील नव्या नेतृत्वाला पुढे आणतील अशी कॉमन्सच्या लॉबीत, लायब्ररीत आणि स्मोकिंग रुममध्ये चर्चा सुरू झाली.

होम सेक्रेटरी म्हणून नुकताच कोठे चार्ल्सचा खात्याच्या कामावर प्रभाव पडू लागला होता तोच थॅचरनी निवडणुका जाहीर केल्या आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा पराभव होऊन लेबर पार्टी सत्तेवर आली. दिवसाचे अठरा तास काम करणाऱ्या माणसाला अचानक मोकळा वेळ मिळाला की जी रितेपणाची भावना होते तशी चार्ल्सची स्थिती झाली.

पक्षाचे सरकार असताना मंत्रिमंडळात जितके काम असते तितके शॅडो मिनिस्टर असताना नसते. आता कॅबिनेट मिनिस्टर म्हणून मिळणारा पगारही थांबला होता. चार्ल्सने चार वर्षांच्या गॅपनंतर पुन्हा सेमूर बँकेत परतायचे ठरवले.

पण क्लाईव्ह रेनॉल्ड त्याला वाटला तेवढा साधा मनुष्य होता.

सायमनला राजकारणातून उठवण्याच्या खटाटोपात चार्ल्सने नेदरकोट अँड कंपनीच्या प्रकरणात सेमूर बँकेला पाच लाख पौंडांच्या खड्ड्यात टाकले, होते हे क्लाईव्ह विसरला नव्हता.

क्लाईव्हच्या सल्ल्याबरूनच मॉर्गन अँड कंपनीने नेदरकोट अँड कंपनी अगदी कमी किमतीत ताब्यात घेतली होती. त्यात त्यांना प्रचंड नफा झाला होता. चार्ल्सने ज्या कावेबाजपणे पूर्वीचा चेअरमन स्पेन्सरला हाकलले होते त्याचीही माहिती क्लाईव्हला होती.

ह्या चार वर्षांच्या काळात स्वतःच्या करंटाने क्लाईव्हने चेअरमन म्हणून बँकेला भरभराटीला आणले होते. गेल्या चार वर्षांत बँकेच्या ॲन्युअल जनरल मिटींगलाही चार्ल्स फिरकला नव्हता. आता इतक्या वर्षांनंतर चार्ल्स परतल्यानंतर वार्षिक ५०,००० पौंडाचे चेअरमनपद त्याच्या हाती सोपवून वार्षिक ४०,००० पौंडाच्या चीफ एक्झेक्युटिव्ह पदावर परतायची क्लाईव्हची तयारी नव्हती. ह्या चार वर्षांच्या काळात बँकेच्या संचालक मंडळात त्याने महत्त्वाचे बदल घडवून आणले होते. नवे संचालक मंडळ क्लाईव्हला अनुकूल होते.

क्लाईव्हने जेव्हा चार्ल्सला आपण संचालक पद सोडणार नसल्याचे सांगितले तेव्हा चार्ल्सला धक्काच बसला. क्लाईव्ह सरळ बधत नाही हे पाहिल्यावर चार्ल्सने धमकावण्या द्यायला सुरुवात केली. क्लाईव्हने शांतपणे त्याला तोंडावरच सांगितले की पूर्वीच्या चेअरमनला हाकलले तशा प्रकारे त्याला कैचीत पकडून राजिनामा द्यायला भाग पाडणे शक्य नव्हते. बँकेच्या बाबतीतला क्लाईव्हचा व्यवहार चोख होता. त्याच्या खाजगी आयुष्यातही लपवण्यासारखे काहीच नव्हते. चार्ल्सला हात चोळीत बसण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता.

चार्ल्सप्रमाणे सायमनने मात्र कोणतेही बाहेरचे काम शोधायचा प्रयत्न केला नाही. कॉमन्समध्ये आणि मंत्रिमंडळात इतकी वर्षे काढल्यावर आता पक्ष कार्यासाठीच उरलेला वेळ द्यायचा त्याने निश्चय केला.

तसे पाहता रॉनी नेदरकोटने नव्याने सुरू केलेल्या कंपनीत सायमनला लठ्ठ पगारावर संचालक म्हणून बोलावले पण सायमनने त्याला स्पष्ट नकार दिला होता.

(क्रमशः)

उलट शोध घेणारे ललित लेख

डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या आठ लेखांचा संग्रह 'शब्दायन.' डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या नेहमीच्या व्यासंगी लेखनापेक्षा या पुस्तकातील लेखन वेगळे आहे. ते अधिक वैयक्तिक आहे. यातील तीन लेख मूलत: वैचारिक प्रकृतीचे आहेत. तर इतर लेख काहीसे कथात्मक आहेत; परंतु ओघवते निवेदन, सहज चिंतन आणि उस्फूर्त आत्माविष्कार यामुळे सर्वच लेखातील अनुभवविश्वाने ललित निबंधांचे रूप घेतले आहे.

'अनुबंध: एका थोर ग्रंथाचा' 'साहित्याचे माझ्या जीवनातील स्थान' आणि 'वाटेच्या वाटसरा' या लेखात एका थोर ग्रंथाचा–गीतारहस्याचा, सर्वसाधारण साहित्याचा आणि भा. रा. तांबे यांच्या 'वाटेच्या वाटसरा' या कवितेचा एका मर्यादेत वेध घेतला आहे. मात्र या वेध घेण्यात काटेकोर चिकित्सा नाही किंवा विचारमंथन करण्याचाही उद्देश नाही. एका संवेदनाक्षम मनाचा आणि साहित्याचा ऋणानुबंध या ललित निबंधातून व्यक्त झाला आहे. अगदी लहानपणीच ओळख झालेल्या गीतारहस्याचा उत्तरोत्तर गाढ सबंध कसा जुळत गेला हे ऐकताना लेखिकेच्या मनाने केलेला एक प्रवास दिसतो. 'एकदा गीतारहस्याच्या मुखातून आत शिरलेली माझी मनोनौका, अपार पसरलेल्या एका सागराच्या प्रवासाला फार सहजतेनं जी निघाली ती निघालीच... आपल्याला आपला 'अंतरिचा दिवा' अखेरपर्यंत घासून–पुसून स्वच्छ ठेवता यायला हवा गीतारहस्य त्यावर वरचेवर येत जाणारी काजळी झटकीत, 'माणसाचे' जीवन जगण्याचा ध्यास माझ्या ठिकाणी वाढवीत राहाते–' असा हा सुंदर प्रवास आहे. लहानपणी ऐकलेल्या गावी गेल्यावर काही आठवणी जाग्या होतात आणि साहित्याचे नाते कोणत्या स्वभावाशी, वृत्तीशी ते जाणवू लागते. साहित्याचे स्वत:च्या जीवनातील स्थान लेखिका आपोआप शोधू लागते–'कधी ते जगण्याला आधार देते, कधी ते दिशा देते आणि कधी मनात डळमळीत होत जाणारा आयुष्याचा अर्थ पुन्हा निर्माण करण्याचे अवघड कार्य करते असेही वाटते आयुष्यातील साहित्याचे हे स्थान हातातील पुस्तके मिटल्यानंतर संस्काररूपाने, फार विविध प्रकारे चालते.' या शब्दातून साहित्याची सुसंस्कृत जीवनातील भूमिकाच आपोआप स्पष्ट होते. 'वाटेच्या वाटसरा' या तांब्यांच्या कवितेत संयमाने बद्ध असलेले स्त्रीमनातील उत्कट प्रीतीतरंग लेखिकेला जाणवतात. या तरंगांमधील कातरता, अगतिकता, सामाजिक भय उलगडता उलगडता लेखिका आपल्याला एक जुने रूढीग्रस्त जीवन चित्रच दाखवून जाते.

'नाट्यछटाकार दिवाकरांच्या शोधात', 'ऑल दी बेस्ट' 'महिलाश्रम', 'प्रवास' आणि 'जाग' या कथात्मक ललित निबंधात विलक्षण चित्रमयता आहे. दिवाकरांच्या मित्रमंडळीत दिवाकरांबद्दल माहिती शोधणे चालू असताना, दिवाकरांची मित्रमंडळी दिसतात, दिवाकरांच्या आठवणी सांगता सांगता एकदम कुठे तरी भरकटलेल्या माई दिसतात. कारखानिसांचा वाडा अंधुक जाणवतो. 'ऑल द बेस्ट'मध्ये मुलींच्या हॉस्टेलचे जगच डोळ्यापुढे येते. मुंबई–पुणे प्रवास करताना भेटलेल्या अडाणी अशिक्षित दरिद्री मुसलमान स्त्रिया, तिकिट नसल्यामुळे मुलांना बाकाखाली दडवणारी हसनबी–तळमळणारी तरुण गर्भवती मुलगी त्यांच्या किती तरी प्रश्नांसकट चलत्चित्रासारखा डोळ्यासमोरून सरकतात. अनेक स्त्रियांना वात्सल्य देऊ इच्छिणारा आणि तरी त्या बाबतीत नेहमी कमी पडणारा 'महिलाश्रम' वाट चुकलेल्या, अनाथ, वृद्ध स्त्रियांचे विश्व जागे करतो. मधूनमधून स्मृती गमावणारी काकी आजी, तिच्या अंतकाळाची चाहूल लागून अस्वस्थ झालेला लहान मुलगा याचे कौटुंबिक पार्श्वभूमीसकट एक चित्र आपल्याला दिसते. मात्र केवळ चित्रमयता हेच या ललितनिबंधाचे वैशिष्ट्य नाही. येथे एक शोध आहे. प्रत्येक अनुभवातून जाताना अतिशय सहानुभूतीने, उत्कटतेने सहृदयतेने मानवी जीवनाचा शोध घेतला आहे. त्यातून आपोआप आत्मशोधही होतो आहे.

अलंकृत, प्रवाही शैलीतून येणारी चित्रमयता आणि सहज विचार, सहज शोध यामुळे सुंदर झालेले 'शब्दायन' हे पुस्तक आहे.

–विनया खडपेकर

शब्दायन
सरोजिनी वैद्य
सुपर्ण प्रकाशन
पृष्ठे : ८६, मूल्य : रु. १०/–

वाचनीय संग्रह

पक्षी जाय दिगंतरा ! असे काव्यमय शीर्षक असलेला कथासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. याचे लेखक मारुती चितमपल्ली हे महाराष्ट्रातील वनाधिकारी व प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ. नवेगाव येथील डॉ. सलीम अली वन्यप्राणी संरक्षण संस्थेचे ते सध्या सचिव आहेत.

चितमपल्ली यांच्या संग्रहातील बहुतेक भाग हा त्यांच्या अरण्यातील अनुभवांवरच आधारित आहे. अरण्यातच जवळजवळ सगळे आयुष्य जगलेल्या या माणसाचे त्या वनांवर, तेथील झाडामुडपांवर, पक्ष्यांवर विलक्षण प्रेम आहे. त्याचे ठायीठायी दर्शन आल्याला या संग्रहात होते. स्वत:च्या स्वतंत्र कथांबरोबरच काही परदेशी कथांचा थोडेसे फेरफार करून त्यांनी केलेला अनुवादही या संग्रहात समाविष्ट आहे.

चितमपल्लींनी जे स्वत:चे स्वतंत्र लिखाण या पुस्तकात समाविष्ट केले आहे त्यात 'रिकामी जागा', 'निळावंती', 'अडई व तिची पिले' 'माक, परडी व पोत', 'हिरवे हात', 'हायी पागडी' इ. कथा प्रमुख आहेत. या सर्वच कथातून त्यांचे निसर्गाविषयीचे चिंतन प्रकट होते. विशेषत: 'हायी पागडी' व 'अडई व तिची पिले' या कथातून प्राणी-पक्ष्यांच्या सवयी, त्यांची जीवनपद्धती त्यांची वैशिष्ट्ये यांचे केलेले

वर्णन फारच बहारदार आहे. लेखकाचे सूक्ष्म निरीक्षण त्यातून जाणवते. 'निळावंती' ही त्यांची कथाही आपल्या भावरम्यतेमुळे खूप उठून दिसते. 'माळ, परडी व पोत' ही कथाही त्यातल्या वास्तव चित्रणामुळे प्रभावी उतरली आहे.

वन्य जीवशास्त्राचा अभ्यास करताना चितमपल्लींनी इतर भाषातील लेखकांचे शास्त्रीय तसेच ललित लेखनही खूप वाचले. या लेखनाचा त्यांच्यावर खूप प्रभाव आहे. या गोष्टींचा मूळ धागा तसाच ठेवून त्या मराठीतून आपल्या मित्रांना सांगतासांगता त्यांचा अनुवादही काही फेरफार करून त्यांनी केला. त्यातल्या या संग्रहात समाविष्ट असलेल्या कथांपैकी 'पाठलाग' (द वुल्फ) 'पक्षी जाय दिगंतरा' (हिज फर्स्ट फ्लाइट) 'स्नो' (हिमवंती), 'कॅमल कुओ गार्डनर' (कुबडा माळी) या कथा प्रमुख. यातही 'पाठलाग' ही कथा त्यातल्या चित्तथरारकतेमुळे आणि हिमवंती ही कथा त्यातल्या सुंदर वातावरणनिर्मितीमुळे वेगळी वाटते. 'कुबडा माळी' या कथेत झाडे लावताना व नंतर वाढवताना कोणती काळजी घ्यावी याचे सुरेख चित्रण झाले आहे. या कथांचे मूळ परदेशी असले तरी अनुवाद करताना त्या जास्तीतजास्त भारतीय वाटतील अशी काळजी भारतीय नावे, परिसर वापरून लेखकाने घेतली आहे.

निसर्गपरिसराबद्दल कुतुहल व पक्षी निरीक्षणाबद्दल प्रेम असणाऱ्यांना या संग्रहात बरेच काही मोलाचे सापडेल. त्या दृष्टीने हा संग्रह जरूर वाचनीय आहे.

पक्षी जाय दिगंतरा
मारुती चितमपल्ली
साहित्य प्रसार केन्द्र

मुखवट्यामागचे चेहरे

चित्रपटव्यवसाय हा सगळ्या व्यवसायात झगमगता, एक वलय लाभलेला व्यवसाय. त्यात काम करणाऱ्यांबद्दल आपल्या सगळ्यांनाच साहजिक कुतुहल असते. 'रूपेरी' या नवीन पुस्तकाने हे कुतुहल थोडं फार शमवण्याचा प्रयत्न केला. 'माधुरी' आणि तत्सम मासिकातून चित्रपटविषयक लिखाणाने परिचित झालेल्या रेखा देशपांडे यांनी लिहिलेला हा लेखसंग्रह श्रीविद्या प्रकाशनतर्फे नुकताच प्रसिद्ध झाला. चित्रपट व्यावसायिकांच्या मुलाखतींवर तो आधारलेला आहे.

तसं म्हटलं तर यातल्या लेखांना मुलाखती म्हणावं की नाही असा प्रश्न पडतो. कारण प्रश्नोत्तरे असं या मुलाखतीचं स्वरूप नाहीये. सर्वसाधारणपणे त्या त्या व्यक्तीने केलेले आत्मकथन या संग्रहात दिसतं. अधूनमधून मुलाखतकर्तीने फक्त त्याला योग्य दिशा मात्र दिल्याचं जाणवतं. अर्थात कथनाचा ओघ कायम रहाण्यासाठी आपण हस्तक्षेप न केल्याचं स्पष्टीकरण लेखिकेनं दिलंय. ते पटतंही. त्यामुळे आत्मकथनात्मक मुलाखतीचा संग्रह असं 'रूपेरी'चं थोडक्यात वर्णन करता येईल.

'रूपेरी'त ज्या चित्रपट व्यावसायिकांच्या मुलाखतींचा समावेश आहे त्यांचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातील प्रत्येकाने आपला ठसा या व्यवसायावर उमटवलेला आहे. या संग्रहात नुकतेच दिवंगत झालेले चित्रमहर्षी सोहराब मोदी आपल्याला भेटतात. तसंच एक वादग्रस्त व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्धीला आलेले कमाल अमरोहीही. देविकाराणी, अशोककुमार नलिनी जयवंत, नौशाद सारख्या बुजुर्गांचाही यात समावेश आहे. आपल्या मखमली सुरांनी रसिकांना वेडं करणारा तलत मेहमूद, प्रसिद्ध दिग्दर्शक केदार शर्मा आणि छायाचित्रणकार के. वैकुंठ यांच्याशी बातचीतही या संग्रहात आहे. मा. भगवानही हजेरी लावून जातात.

या मुलाखती तशा नवीन, खास या पुस्तकासाठी म्हणून वगैरे घेतलेल्या नाहीत; पण पुस्तक प्रसिद्ध करायचे ठरल्यावर त्यापैकी बहुतेकांना लेखिका परत भेटलेली आहे. त्यामुळेच ताजे संदर्भ या मुलाखतीत दिसतात.

या लेखांमधील सर्वात जास्त ओघवता लेख उतरला आहे तो कमाल अमरोहींबद्दलचा. लेखिकेनं म्हटल्याप्रमाणं बोलण्याच्या त्यांच्या शैलीमुळे असेल कदाचित पण हा लेख वाचताना वाचक अगदी त्याच्यात समरस होऊन जातो. त्यामानाने देविकाराणी काहीसं हातचं राखून बोलल्याचं जाणवतं. माणूस प्रतिभावान असला तर पडद्याआड राहूनही तो किती महत्त्व मिळवू शकतो हे दाखवून देतात के. वैकुंठ. कलावंतांबरोबरची त्यांची भांडणे, आणि शेवटी स्वतःचे सिद्ध केलेले महत्त्व याचे किस्से खरोखरीच मनोरंजक आहेत. लाजाळू स्वभावामुळे अभिनय करतांना आणि चहात्यांना सामोरे जाताना होणारी अशोककुमारांची धांदलही बरीच करमणूक करून जाते.

हे पुस्तक लिहिताना त्या त्या व्यक्तिमत्वांना शक्यतो त्यांच्याच शब्दात साकार करायचा प्रयत्न लेखिकेने केलाय. त्यामुळे मुलाखत वाचली की, त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व, जसंच्या तसं डोळ्यासमोर उभं रहातं. तलत मेहमूदचा संकोची स्वभाव, सोहराब मोदींचा शाही रूबाब, नलिनी जयवंतचा घरेलू दिलखुलासपणा हे सगळं पुस्तकातून उमटलेलं आहे. ही व्यक्तिमत्वं जशीच्या तशी प्रकट होणं हे या पुस्तकाचे सर्वांत मोठं यश मानावे लागेल.

प्रत्येकाचं व्यक्तिमत्व, चित्रपटव्यवसायातील प्रत्येकाच्या वाटयाला आलेली भूमिका वेगवेगळी असली तरी या सगळ्यांच्यात एक साम्य जाणवतं. ते म्हणजे आपलं स्थान मिळवण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष. प्रयत्नांशिवाय गोड फळे चाखायला मिळत नाहीत म्हणतात त्याचं प्रत्यंतर इथं येतं. अगदी देविकाराणींपासून मा. भगवानपर्यंत सर्वांनीच या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी निरनिराळे कष्ट, घरच्यांचा विरोध बरंच काही सोसलंय.

या मुलाखतीत आणखी एक साम्य आढळते ते म्हणजे हे व्यावसायिक साधारणतः एकाच वयाचे, सर्वसाधारणपणे एकाच काळाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. देविकाराणी जास्त बुजुर्ग, त्यामानाने नलिनी जयवंत नवीन असा थोडा फार फरक असला तरी साधारण हे सर्वजण एकाच पिढीतील मानावे लागतील. त्यातल्यात्यात के. वैकुंठ मात्र बरेचसे अलिकडचे. हे पुस्तकातील साम्य मात्र त्याची उणीव म्हणून मानावे लागेल. कारण नवीन पिढीतील एकाही कलावंताच्या, गायकाच्या मुलाखतीचा समावेश येथे नाही. व्यक्ती निवडताना लेखिकेने कलावंत, दिग्दर्शक, संगीतकार अशी विविधता दाखवली असली तरी तिला ते एकाच काळातील आहेत या गोष्टीने मर्यादा पडल्या आहेत. हे टाळता आले असते तर कदाचित हे पुस्तक

जास्त उठावदार आणि अधिक परिपूर्ण झाले असते; पण ही एक त्रुटी सोडली तर रूपेरी पडद्यावरील महत्त्वाच्या व्यक्तींचे व्यक्तिमत्वदर्शन घडवणारे हे पुस्तक चित्रपट रसिकांनी एकदा तरी वाचावे असे नक्कीच आहे.

—सीमा कुलकर्णी

रूपेरी
रेखा देशपांडे
श्रीविद्या प्रकाशन

अस्सल जीवनानुभूती

मराठी मनात पंढरीचा राणा विठ्ठल, त्याच्या ध्यासाने घरदार विसरून भजन-कीर्तनातल्या भक्तिरसात तनमनाने न्हाऊन चिंब होणारे वारकरी, दुथडी भरून उमाळ्याने वहाणारी भीमा, तिच्याकाठचे वाळवंट, त्या वाळवंटी आपल्या सात्विक समृद्धीची सोन्याची पाउले उमटविणारे ज्ञानदेवादी संत, या सगळ्यासाठी शांतसे चिमुकले देवघर कायमचे वसवलेले असते; पण अनंत-आकाशाला कवेत घेण्याचं तुकारामाचं सामर्थ्य बाहूत असणारे, मोक्षाची तेजःपुंज वाट सापडेपर्यंत पायाखालच्या निखाऱ्यांना फुलं मानणारे, मानवी देहधर्माची मृत्तिका करून राउळीच्या कळसावर दृष्टी खिळवणारे फार थोडे! वादळवाऱ्याच्या तडाख्याने भेलकंडणारी पक्षीण असहाय्य होऊन कुठल्या तरी फांदीवर शिणला जीव विसावते तसं संसारातल्या व्यथावेदनांनी भोवळलेलं मन अध्यात्माच्या कुशीत शिरतं, तापल्या अश्रूंना वाट करून देतं, थोडंसं बळ मिळालं की, पाउले चालती प्रपंचाची वाट! सर्वसामान्यांच्या बाबतीत हेच घडतं, हेच घडणार! मृदंगाच्या बोलात हरवलेल्या गोरखमास्तरांची डुचमळती कावड आपल्यापर्यंत पोचवणारे बिरादरबाबू या जीवनसत्याचा वेध घेऊ पहाताहेत.

'गळ्यात विष्णू तुळशीची माळ, कपाळावर गोपीचंद, मधोमध बुक्का, गालांच्या किंचित बाजूला मुद्रिका, कानांच्या पाळीला सोन्याची भिकबाळी, डोक्याला घोसला, खांद्यावरून आलेले कमरेपर्यंत जरीकाठी उपरणे काखेत पिशवी. त्यात गीता, तुकारामाची भजनमालिका आणि टाळ, पायात कोल्हापुरी वहाणा, काळासावळा वर्ण... वेळूच्या बनासारखी देहकाठी!' असे हे गोरखमास्तर 'अरूपाचे रूप' डोळ्यांनी पहाण्याचा ध्यास घेऊन संसाराचा कापूर जाळीत, रुक्मिणीच्या-पत्नीच्या देहामानाची काडवात पेटवीत झपाटल्यागत धावताहेत, उरी फुटताहेत... वाटेत येणारे वासनांचे सर्प दंश करून करून विव्हळ करताहेत; पण मास्तरांना निरंजन व्हायचे आहे. भोवतालच्या जगाला मृदंगाचे बोल ऐकवीत, भक्तिरसात निथळत ठेवत गावोगावी दिवे पेटवत, स्वप्नं लुटत भ्रमंती करायची आहे आणि रुक्मिणी? तिला हवं आहे आपल्या ओटीत चिमुकलं बाळ... तिला पान्हा फुटायला लावणारं...कुशीत शिरून ऊब देणारं... पण मास्तरांना घरात थांबायला वेळ नाही. रुक्मिणीकडे वखवखल्या नजरांनी पहाणाऱ्यांना जरब बसवण्याच्या जबाबदारीची जाणीव नाही... बापाच्या मृत्यूनंतर स्वतःच्या आईने केलेला व्यभिचार पाहून जणू त्यांनी वासनेला चूड लावला आहे; पण तरीही कोंब फुटतातच आहेत. कीर्तनाला जमलेल्या बायकात एखादा लावण्याचा चंद्र दिसतो...पंढरपुरी कमळी भेटते...दान मागत रहाते...मास्तर लटपटतात आणि हीव भरल्यागत चालू लागतात. गुंता सुटत नाही, विठ्ठल भेटत नाही. तीर्थक्षेत्री जमलेले महारोगी, प्रेतासारखे जगणारे भणंग भिकारी, व्यभिचाराच्या कर्दमात रूतलेलं पाऊल घेऊन आलेल्या स्त्रिया, सारं पहातात, चक्रावतात. भीमेच्या उचंबळणाऱ्या लाटांमध्ये माणसांच्या भोगतृष्णा, आशा, वासना वाहून नेण्याचं सामर्थ्य का नाही? विठ्ठलनेत्रांच्या तेजाने हे सारे वळवळणारे सर्प जळून खाक का होत नाहीत? ही प्रपंचाची ओढ, जगण्याची असीम लालसा विठ्ठलाच्या, साधुसंतांच्या चरणांवर स्वतःला विसर्जित का करीत नाही? हे प्रश्न मास्तरांना चाबकाच्या फटकाऱ्यासारखे छळत असावेत. धरलेली वाट सोडायची नव्हती; पण मुक्कामाला तर पोचता येत नव्हतं.

मास्तरांच्या या प्रवासाची कहाणी सांगणारी 'कावड' ही एक दर्जेदार कादंबरी आहे. ही कावड लेखकाने आपल्या लेखणीवर फार सुरेख तोललीय्. आशयातून आपसुख उमलणारी शैली आणि अज्ञाताच्या प्रदेशाकडे झेपावणाऱ्या मास्तरांचे व्यक्तिरेखाटन चि. त्र्यं. खानोलकर, जी. ए. कुलकर्णी यांच्या सुरांशी काहीशी जवळीक साधू पहाते. घोडे. टिटवी, सर्प, प्रेते, दुर्गंधी, घुबडं, ही सारी प्रतीकं मास्तरांच्या जीव घुस्मटून टाकणाऱ्या डोळ्यापुढे निळ्या-हिरव्या रेषा चमकवणाऱ्या मनःस्थितीची लय अचूक पकडतात. संतवाङ्मयातले विविध संदर्भ कादंबरीतल्या वातावरणाला उदात्ततेची ऊब देतात तर देहाच्या भुकांची वादळं वास्तवाला स्पर्श करीत उत्तरं न देताच पाताळात गडप होतात. रुक्मिणीची तडफड, राममहाराजांचं प्रामाणिक आत्मपरीक्षण पृथ्वीवर पाय टेकणारं, मास्तरांची जिवाची कुरवंडी वेगळ्या वाटेतले काटे दाखवणारी, स्वतःला जिंकण्याची तळमळ अगतिकतेची किनार असलेली!

अखेरीस भीमेच्या पात्रात हा प्रवास संपतो पण प्रकाश प्राशन करून, जिंकल्याच्या आनंदात, तृप्तीने नव्हे. तर बुद्धिभ्रंश होऊन, उरातल्या जखमेचं भोवतालच्या जगाला भेसूर दर्शन घडवीत, विकृत, असंबद्ध, बडबड ऐकवीत! 'मी आलो आहे रुक्मिणी, दार उघड, अशी दशदिशांना भेदून जाणारी हाक मारत मास्तर धराशी पोचतात; पण तिने निका लावल्याचे कळल्यावर संज्ञा हरपून जाते. भीमेच्या लाटा भंगल्या जीवाला शांती देतात. कादंबरी संपते.

कादंबरीत वारंवार येणारी स्वप्नदृश्ये कधी मास्तरांच्या मेंदूचे हरवलेपण, थिजलेपण दाखवतात तर कधी त्यांना लागलेली विठ्ठलप्राप्तीची आस, प्रकाशाचा ध्यास सूचित करतात. दुबोटी गंधासारखं दोन मानसिक प्रवाहाचं समांतर दर्शन घडवीत ही कथा आकार घेत असल्यामुळे या स्वप्नदृष्यांना कादंबरीत वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. पुनरुक्ती आणि काहीसा भडकपणा मात्र यात जाणवतो.

या कादंबरीचा आणखी एक विशेष मला आवडला तो म्हणजे गोरखमास्तर ही व्यक्ती आणि तिच्याद्वारे प्रगट होणारी जीवनानुभूती ही अस्सल मानवी आहे. नियती, दैवी, अदृष्टाचा शाप किंवा वर अशासारखा कोणताही घटक यात आणण्याचा मोह लेखकाला

झालेला नाही. देवभवती हा या कादंबरीचा, एका परीने मूलाधार असूनही, पुनर्जन्म, साक्षात्कार, गुरुकृपा अशा गोष्टींना यात स्थान दिलेले नाही. 'माणसासारखं वागा' असं सद्गदित अंतःकरणाने जगाला सांगत फिरणारे मास्तर माणूस आहेत म्हणूनच दाहक सत्याच्या दर्शनाने ढेपाळतात आणि भीमेच्या लाटांवरून पैलतीराला जातात यात त्यांचा पराभव आहे नि थोरवीही आहे. वास्तवाचं हे भान कादंबरीला देखणेपण देते.

बिरादार बाबू यांच्याकडून उत्तमोत्तम लेखनाच्या अपेक्षा कराव्या अशी ही 'कावड!'

—मेधा सिधये

कावड
बिरादार बाबू
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठसंख्या : ८८
मूल्य : रु. १५/-

एक नवं वळण

—अच्युत पालव

मोडी ही एकेकाळची राजलिपी. साहजिकच इतिहासकालीन राजपत्रे, हस्तलिखिते, तक्ते वगैरे गोष्टी मोडी भाषेत सजलेली आढळून येतात. पण ही राजलिपी कालौघाच्या सतत बदलत्या परिस्थितीत कुचकामी ठरली आणि परिणामी या एके काळच्या राजलिपीचं पूर्णतः उच्चाटन झालं. त्यामुळं मोडी भाषेचा उल्लेख आज तरी फक्त इतिहासाशी निगडीत आहे; पण अशा या मोडी लिपीचं पुनरुज्जीवन करावं आणि जुनी मोडी नव्या स्वरूपात मांडावी या दृष्टीनं अच्युत पालव नावाच्या एका तरुणानं मोडी लिपीवर संशोधन केलं. त्याच्या याच संशोधनप्रकल्पावर आधारीत एक प्रदर्शन मराठी अभ्यास परिषदेतर्फे बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात एक आणि दोन फेब्रुवारीला भरत आहे. मोडीचा इतिहास, मोडी कुठल्या शतकात अस्तित्वात आली, उत्पत्ती कुठून झाली, समकालीन अक्षररचनांशी मोडीचा केलेला तुलनात्मक अभ्यास, मोडीची वैशिष्ट्यं, मोडीच्या ऱ्हासाची कारणं, जुनी मोडी नव्या घाटात बसवून या डौलदार लिपीचा अक्षरलेखनासाठी डिझायनिंगसाठी केलेल्या उपयोगाचे नमने असं सर्वसाधारण या प्रदर्शनाचं स्वरूप आहे.

अच्युत पालवचं हे अक्षरप्रेम पहिल्यापासूनच. १९८२ मध्ये मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून उपयोजित कलेतील (Commercial art) पदविका घेतल्यानंतर त्यानं या अक्षरप्रेमापायी एक अभिनव प्रयोग केला. तोही अक्षररचनेच्या विविधांगी छंदातून. सर्वसाधारणपणे शब्दमाध्यमाला अधिक बळकट करायचं असेल तर त्याला चित्राची जोड देण्याची आपली पद्धत; पण अच्युतनं यालाच नवीन वळण दिलं आणि शब्दांना चित्राची जोड देण्यापेक्षा अक्षरंच अशी तयार केली की, त्या शब्दातून व्यक्त होणाऱ्या अर्थाचा अनुभव प्रेक्षकाला सहजी जाणून घेता यावा. उदा. 'स्वर' किंवा 'हत्याकांड' यासारखे शब्द. आता 'स्वर' या शब्दाचं लयदार, नाजूक व्यक्तिमत्व आणि 'हत्याकांड' या शब्दाचं रौद्र, भीतीदायक व्यक्तिमत्व अशी परस्परविरोधी व्यक्तिमत्व अक्षरातून साकार करण्यासाठी त्यांनी मूळ अक्षरांनाच वाकवलं, वळवलं आणि हा चित्राक्षराचा अभिनव प्रयोग सादर केला. त्यातूनच ही अक्षररचनेची आवड अधिकाधिक जोपासली गेली. या आवडीला खतपाणी मिळालं ते उल्का ॲडव्हर्टायझिंग एजन्सीकडून मिळालेल्या रु. १०,००० च्या शिष्यवृत्तीमुळं. उल्का ॲडव्हर्टायझिंगचा हा नव्या टॅलेन्टस्ना संशोधनाच्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळवून देणारा एक नवा उपक्रम आणि अच्युत या नव्या उपक्रमाचा पहिला मानकरी. या शिष्यवृत्तीसाठी इंडियन डिझायनिंग, कॉपी रायटिंग, टाईप फेस डिझायनिंग.. वगैरे सहा विषय होते; पण त्याहीपेक्षा वेगळा असा हा विषय अच्युतनं सुचवला, त्याला मान्यता मिळाली आणि एकूण बारा उमेदवारातून त्याची निवड करण्यात आली.



खाचखळगे

'मोडी लिपीतील संशोधन' हा विषय वरवर साधा वाटत असला तरी आतून मात्र डोकं खाणारा अच्युत आधी विषय सांगून मोकळा झाला. म्हणजे संशोधनाच्या दृष्टीनं कशी वाटचाल करायला लागेल, हे सविस्तर संगतवार सांगून त्यानं कळस तर बांधला होता; पण पायाच तयार नव्हता. कारण मोडी कुठं येत होती? आणि मोडी लिपी सुलभपणे यायची म्हणजे कमीत कमी सहा महिने तरी पाहिजेत. शिष्यवृत्तीचा कालावधी एक वर्षाचा. त्यातले सहा महिने मोडी शिकण्यात गेले तर पुढच्या सहा महिन्यात संशोधन कसं करणार? पण मोडी लिहिता येण्याची फारशी गरज नाही, नुसती या लिपीची अक्षरं, वळणं लक्षात आली तरी पुरे अशी उल्काच्या डायरेक्टरनं परवानगी दिल्यामुळं प्रश्नच मिटला; पण मोडी शिकायची तर अंकलिपी कुठे आहे? खूप प्रयत्नानंतर कशी बशी एक अंकलिपी मिळाली. शिक्षण पूर्ण झालं म्हणून जरा हुश्श करत असलेल्या अच्युतनं मग एकचित्तानं अ, आ, इ, ई पुन्हा गिरवायला सुरुवात केली. आता या स्टेजला मनानं पुन्हा पुन्हा मॉंटेसरीच्या वर्गात जाऊन बसणं अवघडच होतं; पण जमवलं-जमलं. त्याचं ते नेटानं अंकलिपी गिरवणं पाहून त्याच्याऐवजी घरचे-दारचेच वैतागले. मोठीशी ओळख झाल्यानंतर खऱ्या अर्थानं संशोधनाला सुरुवात झाली. जुनीजुनी ऐतिहासिक कागदपत्र शोधणं, मिळवणं, वाचून नोंदी काढणं... अशी कामं खूप होती. मनात कल्पनाही भरपूर होत्या; पण त्या प्रत्यक्षात येण्याच्या दृष्टीनं पोषक अशी परिस्थिती मात्र नव्हती.

कारण जिथं जिथं भारत इतिहास संशोधन मंडळ, ब. मो. पुरंदरे, डेक्कन कॉलेज– तो जात होता. त्यापैकी बहुतांशी ठिकाणी त्याच्या प्रोजेक्टविषयी शंका घेतली जात होती. ठोस मदतीची आश्वासनं दिली जात होती; पण प्रत्यक्ष हाती येत होती ती फक्त टाळाटाळ, टंगळमंगळ, त्यांची लहान खुरं व्यक्तिमत्त्व पाहून, 'हा काय संशोधन करणार? किंवा याला काय हे संशोधन पुरं करणं जमणार?' म्हणून अनास्था दाखवली जात होती; पण याचं सारं उठ्ठं भाषातज्ज्ञ डॉ. अशोक केळकर यांनी भरून काढलं. नव्या पिढीतला कुणी तरी यावर संशोधन करतोय, त्यात रस घेऊ पाहतोय. एवढी गोष्टही डॉक्टर केळकरांसारख्या भाषातज्ज्ञाला दिलासा देणारी वाटली असावी. त्यांनी अच्युतला सर्वतोपही सहाय्य केलं. या प्रोजेक्टचा संपूर्ण आराखडा आखन दिला. याच आधारावर अच्युतनं आपल्या प्रबंधाचा पहिला हिस्सा सादर केला डॉ. केळकरांबरोबरच ग. ह. खरे, वि. का. राजवाडे, कृ. रा. परांजपे अशा अनेक तज्ज्ञांनीही मनापासून मदत केली. ग. ह. खरे यांनी अच्युतची घेतलेली परीक्षाही पूर्वीच्या गुरु-शिष्याच्या नात्याची ओळख करून देणारी. अच्युत त्यांच्याकडे गेला तेव्हा खऱ्यांनी सुरुवातीच्या भेटींमध्ये त्याला फारशी दाद लागू दिली नाही; पण तरीही अच्युत चिकाटीनं त्यांना पुन्हा पुन्हा भेटत रहायला, तेव्हा मात्र त्याच्या प्रोजेक्टविषयीच्या सचोटीची त्यांना खात्री पटली आणि त्यांनी सढळ हातानं मदत केली. भारत इतिहास संशोधन मंडळ, डेक्कन कॉलेज, शिक्षण प्रसारक मंडळी यांसारख्या निरनिराळ्या ठिकाणाहून हस्तलिखितं, पत्रं, तक्ते अशी विविध सामुग्री गोळा करणं हे वेळ आणि पैसा (संशोधनकाळात दुसरं कुठलंही काम करता नये असं बंधन त्याच्यावर होतं) दोन्ही दृष्टीनं जिकीरीचं होतं; पण या प्रकारच्या शिष्यवृत्तीचा तो पहिलाच विद्यार्थी असल्यानं जर त्याच्या हातून संशोधनाबाबतची कामगिरी समाधानकारकरित्या पार पडली नाही तर त्याचा परिणाम पुढील विद्यार्थ्यांवर होऊ शकतो या विचारानं त्यानं नेटानं काम केलं.

मोडीच्या उत्पत्तीविषयी जाणकारांमध्ये अनेक मतं आढळतात आणि ही विविध मतंही त्यानं या प्रदर्शनात ठेवली आहेत. त्यात एस. एस. वाकणकरांच्या मते मोडी म्हणजे देवनागरीचे अनुकरण आहे तर चांदोरकरांच्या मते मौर्यचा अपभ्रंश मोरी मोरी आणि त्यावरून पुढं मोडी आली. ग. ह. खरे आणि बापूराव नाईक यांची मतं तशी एकमेकांच्या जवळपास जाणारी. त्यांच्या मते मोडीचा उगम अशोककालीन लिपीत सापडतो आणि मोडीची मुळाक्षरं बाळबोधीपेक्षाही ब्राह्मी लिपीशी जवळीक साधणारी आहेत. मोडीविषयी केलेल्या संशोधनाद्वारा अच्युतनं एक मत मांडलं आहे की, मोडी शब्द फारसी शिकस्तामधून आला आणि मोडी ही बाळबोधीतूनच अस्तित्वात आली.

मोडीच्या उत्पत्तीविषयीचं संशोधन केल्यानंतर त्यानं पुढचा मुद्दा लक्षात घेतला आहे, तो मोडीची वैशिष्ट्य आणि मोडीच्या ऱ्हासाची कारणं. मोडीची प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ती प्रवाही (रनिंग) लिपी आहे, त्यामुळं लिखाणाचा वेग जास्त असतो, कुठेही हात न उचलता सलगपणे लिहिता येणारी ही लिपी, त्यामुळं तिला गतिमानता आहे तशी लयही आहे. यातली सगळी अक्षरं ही गोलाकार असल्यानं सरळ रेषेचा करकरीतपणा त्यात नाही, म्हणून या लिपीला डौलदार सौंदर्य लाभलं आहे. देवनागरी आणि मोडी यातला प्रमुख फरक म्हणजे मोडीत अक्षरांचे स्ट्रोक्स खालून वर जातात तर देवनागरीत वरून खाली स्ट्रोक्स देत लिहिण्याची पद्धत आहे. पण मोडीच्या या खऱ्या वैशिष्ट्यांमध्येच या लिपीच्या ऱ्हासाची कारणंही लपलेली आहेत. या लिपीच्या प्रवाही पद्धतीमुळं वाक्य जसे तोडले जाईल, त्यानुसार वाक्याचा अर्थ बदलत असे, ही गोष्ट उपद्रवकारक होऊ लागली तर मोडीतील ऱ्हस्व-दीर्घाचे नियम पक्के नसल्यानं भाषासौंदर्याला बाधा निर्माण होऊ लागली. त्यातच इंग्रजीचा अंमल वाढू लागला परिणामी मोडीकडं दुर्लक्ष होत होत ही लिपी इतिहासजमा झाली.

आता हीच लिपी तिच्याकडे दोष वगळून आणि या लिपीच्या वैशिष्ट्यांचा अचूक उपयोग करून ती लिपी आजच्या काळाशी कशी सुसंगत करता येईल. हा त्याच्या संशोधनातला पुढचा टप्पा त्याप्रमाणं त्यानं देवनागरीला मोडीच्या स्वरूपात बसवलं. त्यामुळं नवीन मुळाक्षरं तयार झाली. या नवीन लिपीत मोडी आणि देवनागरीनील वैशिष्ट्यांचा अचूक उपयोग करून घेतला आहे.

संशोधनाच्या इथपर्यंतच्या प्रवासात त्यांच्यातल्या संशोधकानं काम केलं तर या पुढच्या प्रवासात मात्र त्याच्यातल्या डिझायनरनं काम केलं. कारण ही नवी लिपी तयार झाली पण तिचा प्रत्यक्ष व्यवहारात काय उपयोग? (application) विचार होणं आवश्यक होतं. या दृष्टीनं त्यानं काही नमुने या प्रदर्शनात ठेवले आहेत. मराठीतील ऱ्हस्व-दीर्घ, काना, मात्रा वगैरे भानगडींमुळं मराठी टायपोग्राफीतील विविधता कमीच आहे. पण ही उणीव अशा नव्या नव्या प्रयोगातून कमी करता येईल. या दृष्टीकोनातून अच्युतनं भारत इतिहास संशोधन मंडळांसाठी केलेली लेटरहेडस्, कॅलेन्डर्स, पुण्यानजिकच्या 'पेशवा' हॉटेलच्या मेन्यूकार्डसाठी केलेल्या डिझाईन्सचे नमुने ठेवलेत. अर्थात या बाबतीत एक गोष्ट खरी की, या संशोधनाच्या उपयोगाची कक्षा तशी मर्यादित आहे. सर्वसामान्यपणे या लिपीचा उपयोग करणं अवघडच जाईल. कारण या लिपीला मिळालेला राजेशाही स्पर्श आणि ऐतिहासिक संदर्भ त्यामुळं 'बन्सीलाल क्लॉथ सेंटर'च्या जाहिरातीत ही लिपी अगदीच उपरी ठरेल तर 'पेशवा'च्या जाहिरातीत या लिपीसारखी योग्य लिपी दुसरी कुठली नसेल. या शिवाय या लिपीचा उपयोग करून मराठी लघुलिपीही नव्या स्वरूपात करता येईल. यापूर्वी कै. अ. र. वालावलकर यांनी मराठी-मोडी-गुजराती अशा तीन लिप्यांचे टंकलेखन करता येईल, असा एक टाईपरायटरही तयार केला होता; पण ही कल्पना तेव्हा प्रत्यक्षात येऊ शकली नाही तरी मोडी लिपीच्या संशोधनानं या कल्पनेनं पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. याशिवाय या लिपीचा प्रसार व्हावा या दृष्टीनं वर्ग चालवणं, छोटंसं पुस्तक प्रकाशित करणं अगत्याचं होईल; पण एकीकडे जे. जे. मधली लेक्चररची नोकरी, दुसरीकडे अधिक खोल संशोधनासाठी चाललेले प्रयत्न, या लिपीमुळं भारून गेलेल्यांकडून येणारी भारंभार डिझायनिंगची कामं अशा अनेक पातळ्यांवर एकाच वेळेस लढणाऱ्या अच्युतला या लिपीच्या प्रसाराचं काम सांभाळणं एक हाती अवघड आहे; पण प्रयत्न मात्र थांबले नाहीत.

—शुभदा रानडे

रंगभूमी

एक चांगले जीवन–विचार नाटच

वादळ माणसाळतंय

वि. भा देशपांडे

साथ सोबत हवीय कोणाला ?
माझंच आभाळ, माझी धरती
असाच एकटा चालत राहीन
वादळ घेऊन खांद्यावरती.....

खांद्यावर वादळ घेऊन जाणारा सामान्यातला एक असामान्य माणूस जिद्दीने आयुष्यात काय करू शकतो, विशेषत: कुष्ठरोगी–महारोगी यांच्यासाठी काय करू शकतो याचे दर्शन हे नाटक घडवत राहते. महारोग्यांना माणसात आणण्यासाठी आपले जीवन सार्थकी लावणारी व्यक्ती किंवा हा विषय म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यांसमोर साहजिकच बाबा आमटे यांचे नाव येणार. त्याच पद्धतीने हे नाटक आपण जोखणार; पण हे नाटक म्हणजे बाबा आमटे यांचे चरित्रनाटच नाही किंवा त्यांच्या लोकप्रिय व्यक्तित्त्वाचा, जीवनकार्याचा उठाव नाटकासाठी करून घेऊन काही साधण्याचा यत्न आहे असेही नाही. मात्र हे नाटक बाबांच्या जीवनकार्याचा संदर्भ घेऊन आलेले आहे हे कोणीच नाकारू शकत नाही. बाबा आमटे आणि साधनाताई ह्यांच्या जीवनकार्याचा किंवा समाजकार्याचा परिचय अनेकांना आहे. त्यातले काही तपशील कानेटकरांनी उचलले आहेत आणि त्यातून भाई–जानकी ह्या व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. उदाहरणार्थ भाईंची वकिली, रस्त्यावर गटारापाशी पडलेला कुष्ठरोगी, त्यातून जीवनाचे घडलेले भेदक दर्शन आणि समाजकार्याची सापडलेली दिशा, आनंदवनाच्या धर्तीवरचा श्रमानंद, मित्रमेळावा, एका कार्यातून दुसऱ्या कार्याचा आरंभ इत्यादी अनेक संदर्भ सांगता येतील. असे असूनही हे बाबा आमटे यांचे चरित्रनाटच नाही कारण चरित्राचा सलग क्रम किंवा आलेख सर्वांसमोर मांडावा असा कानेटकरांचा हेतू नाही. नाटकाच्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर तात्यासाहेब शिरवाडकरांनी म्हटल्याप्रमाणे फुलाचा आणि अत्तराचा जितका संबंध असतो तसा बाबांचा आणि ह्या नाटकाचा आहे.

वसंतराव कानेटकरांनी हे जाणतेपणाने केले आहे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अशा अर्थाने की, बाबा–साधनाताई यांच्यासारख्या जनमान्य व्यक्तींवर चरित्र–तपशीलांच्या आधारे एक भावडे नाटच निश्चितच उभे राहू शकले असते. त्यात कानेटकर वाकबगार आहेत; पण तो मोह टाकून त्यांनी एक गुणवत्ता असलेले विचार नाटच उभे केले आहे. बाबा आमटे यांच्यासारखी माणसे खरे तर ती व्यक्ती म्हणून नसतातच, तर ती एक विचार असतात, एक संस्था असतात. तसे ते आणखी खूप काही असतात. अशा प्रकारच्या व्यक्तींच्या जीवनातील काही संदर्भ घेऊन एक जाणता विचार नाटचमाध्यमातून प्रेक्षकांपुढे मांडणे हे अवघड कार्य असते. हे कार्य यापूर्वी वसंतराव कानेटकरांनी 'हिमालयाची सावली' सारखे नाटक लिहून केलेले आहे. या पठडीतले नाटक लिहिणे ही नाटककार म्हणून आणि प्रेक्षकांच्या हिशोबातही उत्तम अभिरूचीचा एक भाग असतो !

या नाटकात भाई ही अपरिहार्यपणे मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. त्या जोडीला आणखी काही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखांची निर्मिती आहे. उदा. भाईची आई, पत्नी जानकी, जानकीचे वडील दामलेमास्तर, पुढारी शिवरामदादा आणि राघूशेट इत्यादी. भाईची आई आणि जानकी ही दोन्ही भिन्न नाहीत. भाईच्या समाजकार्याला मानसिक बळ देणारी, नव्या आव्हानाच्यावेळी अलिप्तपणे विचार करून साथसंगत करणारी अशी आहेत. त्यामुळे व्यक्तिमत्वाचा नैतिक किंवा कौटुंबिक तोल आपोआप साधला गेला. तसेच विरोधात असणारे शिवरामदादा, राघूशेट यांच्यामुळे या समाजकार्याला घराबाहेर होणाऱ्या विरोधाचे चित्र उभे राहिले; पण या नाटकातल्या संघर्षाचे स्वरूप घटनात्मक–कृतीरूप कमी, विचारात्मक आणि विधायात्मक अधिक आहे. त्यासाठी ह्या पूरक व्यक्तिरेखांचा उपयोग चांगला झालेला आहे. नाटच उभारणीसाठी बाबा आमटे यांच्या जीवनातील काही प्रसंग संदर्भ जसे घेतले गेले तसेच त्यांच्या काही उक्ती कवितारूपाने किंवा गद्यरूपाने वापरल्या आहेत. तसेच वि. वा. शिरवाडकर यांच्याही कवनाचा यथोचित वापर आहे. बाबांच्या काही वाक्यांचा वापर सोडला तर संपूर्ण नाटकातील संवादांचे सहजपण किंवा स्वाभाविकपण हा एक नाटचपरिणामाच्या दृष्टीने गुण ठरणारा आहे. अन्यथा अशी नाटके अलंकारिक नाटचसंवादभाषेत गुंतून पडण्याचा धोका खूपच असतो.

वर्तमानातील व्यक्तीसंदर्भ घेऊन जेव्हा एखादे नाटक उभे राहते, तेव्हा एक तुलनात्मक चित्र प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर तरळत असते. आज आपल्याला बाबा आमटे म्हणून जे व्यक्तित्व ज्ञात आहे त्याच्याशी आपण ती व्यक्तिरेखा उभी करणाऱ्या कलाकाराची तुलना करीत राहतो. ती आपली सोयही असते आणि सवयही असते. त्याचा त्रास त्या कलाकाराला होत असतो. यशवंत दत्त या गुणी कलाकाराने एक चांगली प्रतिमा 'भाई' या व्यक्तिरेखेच्या निमित्ताने उभी केली. भाई या व्यक्तिरेखेचे हे जीवनकार्यातले तरुणपणाचे 'घडणे' आहे, हा संदर्भ समोर ठेवून पहायला हवे. ते 'घडणे' यथायोग्यपणाने

व्यक्त झाले आहे. फक्त होते काय की, ज्या वेळी कोणताही नट जेव्हा विशिष्ट 'चेहरा' नसलेल्या व्यक्तिरेखेला रंगमंचावर समूर्त करीत असतो तेव्हा त्याचे मूळचे व्यक्तिमत्व आणि भूमिका यांच्या सीमारेषा परस्परांत सहजतेने मिसळून जातात. हातवारे करण्याची पद्धत त्याच्या बोलण्याची लकब इत्यादी गोष्टी कशा आणि किती वापराच्या हा प्रश्न निर्माण होतो इथे तो निर्माण झाला. बोलण्यातली स्वाभाविकता ही काही वेळेला रंगमंचीय परिणाम हरवून बसत नाही ना अशी काळजी घ्यावी लागते. यशवंत दत्त काही प्रयोगात ते जमवून घेईल इतक्या ताकदीचा जरूर आहे. त्याच्या अभिनय कारकिर्दीतील आणखी एक वेगळी आणि चांगली भूमिका त्याच्याकडे आली. हे नवे आव्हान त्याने सहजतेने पेललेले आहे. त्याला पूरक असणाऱ्या व्यक्तिरेखांसाठी जे कलाकार होते त्यातल्या प्रत्येकाने आपली भूमिका चोख बजावली. रेखा कामत, शमा देशपांडे, जगन्नाथ कांदळगावकर, उपेन्द्र दाते, निरंजन परळकर, भाऊ बिवलकर, वसंत विचारे, संजय भालेकर, सुरेश सावंत इत्यादी.

अरविंद देशपांडे नाटकाचे दिग्दर्शक आहेत म्हटल्यावर ज्या अपेक्षा किमान अर्थाने पूर्ण व्हाव्यात अशी खात्री असते तसे या प्रयोगात घडले. अरविंदने नाटकाची 'प्रकृती' ओळखून नाटक सतत सहजपणाने व्यक्त होईल याची काळजी घेतली. पात्रांच्या हालचाली, विरचना आणि नाटकाची एकूणच गती नाट्यविषय पोहोचण्याच्या हिशोबात समतोल राखली होती. दिग्दर्शकाने संहिता आणि प्रयोगतंत्राचा तपशीलवार काळजीपूर्वक विचार केल्याचे प्रत्ययाला येत होते. चंद्रलेखा संस्थेचा प्रयोग असल्यावर जे गुणविशेष नेपथ्य, प्रकाश, संगीत यांच्या संदर्भात नेहमीच असतात ते याही प्रयोगात होते. भाईच्या घराची अंतर्गत रचना आणि लाकडी भिंतींचा जाणवणारा रंगस्पर्श अर्थपूर्ण होता. फक्त खटकले ते म्हणजे त्या घरामागचे निसर्गदृश्य वर्षानुवर्षे तसेच राहिले. त्यातले बदल दाखवायला हवेत. तसेच पाराच्या प्रवेशाच्या वेळी मागची भिंत, झाड, वेली यांचे रंग डोळ्यात भरण्याइतके गडद किंवा चकचकीत नकोत. हे बदल करण्यातले आहेत. चंद्रलेखाने एक चांगले जीवन–विचार नाट्य दिले ते आवर्जून पाहण्यासारखे आहे. □

ह्या ना त्या निमित्ताने : पृष्ठ ४ वरून

कोणती? हा. ते माहीत करून घेणे आवश्यक होते. सर्वत्र व सगळ्यांकडे चौकशी झाली. कोणी खरी वेळ ९ वाजता आहे म्हणाले, कोणी ती ९॥ वाजता आहे म्हणून सांगितले. काहीजणांची खरी वेळ ही १० आहे, अशी खात्री होती तर काहीजण ती १०.३० आहे ह्यावर १०० रुपये हरायला तयार झाले होते.

आता वेळेवर यायचे म्हणजे प्रथम 'खरी' वेळ कोणती हे पक्के व्हायला पाहिजे. बरं ह्या कामी लोकशाही पद्धतीने मतेपण घेता येणार नव्हती. नाही तर सगळ्या लबाड लोकांनी एकत्र येऊन कचेरीची वेळ ११ किंवा ११॥ ठरवली असती!

कचेरीत शेकडो सरकारी पत्रके व परिपत्रके होती; पण कचेरीची खरी वेळ सांगणारे पत्रक आपण कधी पाहिल्याचे कोणाही नोकराला वा साहेबाला स्मरत नव्हते.

'काय सरकारी यंत्रणा आहे पहा. वेळेवर या म्हणून सगळे सांगतात; पण वेळेवर म्हणजे केव्हा हे मात्र सांगायला कोणी नाही.' श्याम कावून म्हणाला. श्यामचे साहेब श्यामवर ही जबाबदारी टाकून कचेरीतून लवकर घरी गेले होते. त्यांचा मेव्हणा आज परदेशाला जाणार होता.

सरकारी कचेऱ्यात जर सगळ्यात कोणी ज्ञानमय व विश्वासू माणूस असेल तर तो अकौन्टट म्हणजे पैशा-अडक्याचा हिशोब ठेवणारा होय. हे श्यामच्या लक्षात आले. त्याला सगळ्या दुनियेची माहिती असते व मुख्य म्हणजे त्याचे मत सरकारी दरबारी ग्राह्य मानले जाते.

'पण तुम्हाला कोणती वेळ पाहिजे.' अकौंटंट अगदी शांतपणे विचारता व पुढे माहिती देता झाला. मुंबईची वेगळी, कलकत्त्याची वेगळी. दिल्लीला दोन वेगवेगळ्या– एक मंत्रालयाची, एक इतर खात्यातल्या लोकांची. परत सेना–अधिकाऱ्यांची व त्यांच्या कचेऱ्यांच्या वेळा वेगवेगळ्या असतात.'

'ज्याला आपलं डोकं फिरवून घ्यायचे असेल त्याने अकौन्टटचा सल्ला घ्यावा असे म्हणतात ते खरेच. श्याम चिडून पण मनातल्या मनात पण वरकरणी, हसत म्हणाला, 'अहो, आपल्याला काय एकाच वेळी मुंबईला, कलकत्त्याला वा दिल्लीला थोडेच जायचे आहे. येथली वेळ सांगा. म्हणजे मुंबईची.! आता गलथानपणा घालवावयाचा आहे ना! अगदी राजीव गांधींपासून आपल्या मोठ्या साहेबांनी हेच सांगितले आहे की, बर तुम्ही त्याबाबत काय करणार आहात?'

'आम्ही काय करायचे आहे? आम्ही अकौटंटस् लोक कधीच गलथान नव्हतो. पुढेही नसणार. हे सगळे फतवे–फर्माने आमच्याकरता नाहीच आहेत मुळी.' एवढे बोलून तो पठ्ठा शांतपणे म्हणजे गलथानपणे उठला व तेव्हढ्याच गलथानपणे निघून गेला. श्याम त्याच्याकडे कौतुकाने पहातच राहिला.

श्यामची आंघोळ झाली होती व तो घाईघाईने कपडे करत होता. राधा अजूनी कॉटवर पहुडलीच होती; पण आता ती खिदीखिदी पद्धतीने हसत होती.

'हसायला काय झाले त्यात?' श्यामने चिरडीने विचारले. आधीच तो आजकाल वेळेवर म्हणजे खूप लवकर जायला लागते म्हणून कावला होता. त्यात राधा सहानुभूती न दाखवता हसत होती. त्यामुळे त्याच्या चिरडीत भर पडली होती.

'काय झाले म्हणजे?' राधा तेव्हढ्याच आनंदी स्वरात म्हणाली, 'तुम्हा सगळ्या सरकारी नोकरांना आमच्या राजीवजींनी शिस्त लावलीच की नाही?' नवीन वर्ष सुरू झाल्यापासून राजीव गांधी नुसतेच राजीवजी झाले नव्हते तर 'आमचे' पण झाले होते.

'अंऽऽ, ते काय शिस्त लावताहेत आम्हा सरकारी नोकरांना?'–श्यामने रागारागाने पायात मोजा घालत विचारले.

'का, पूर्वी emergency ची वेळ सोडून दिली तर गेल्या २०–२२ वर्षात मला तुम्ही कधी कचेरीला वेळेवर गेल्याचे आठवत नाही आहे. पूर्वी कसे ९–९। वाजेपर्यंत म. टा. मधला वाचकांचा पत्रव्यवहार वाचत पडले असत. आता कसे सकाळी ७–७॥ वाजेपासून कचेरीला जाण्याचे वेध लागतात?' वर परत खिदीखिदी पद्धतीचे हसणे.

'मग आता तो पत्र–व्यवहार कचेरीत

वाचतो. घरी तुझी तरी भूणभूण असायची तेथे तेही नाही ! चपराशाला सांगून ठेवले आहे की १०॥–११ पर्यंत खोलीत कोणाला पाठवू जाऊ नकोस म्हणून !' श्याम बाजी मारल्याच्या स्वरात म्हणाला.

'म्हणजे तुम्ही आजकाल म. टा. कचेरीत घेऊन जाता ?' आता ती कॉटवरच उठून बसली होती. 'तरीच मी म्हणते आहे की, म. टा. जातो कोठे म्हणून ? दुपारी काही वाचीन म्हटलं तर म टा. आपला गहाळ !'

'नुसता घेऊन जात नाही. तर आम्ही सगळे एकत्र बसून तो वाचतो व चर्चा करतो.' श्यामचे आता बूट घालून झाले होते. 'चल, खायला दे.' श्याम व राधा आता जेवण्याच्या टेबलावर आले होते.

'मग लवकर जाण्याचा काय फायदा ?' राधाने मोठ्या आश्चर्याने विचारले, 'वेळेवर जाऊन जर म. टा. च वाचायचा तर ?'

'अग, ही सरकारी खातीच अशी आहेत. लवकर या म्हटलं, लवकर यायला लागले ! राज्ययंत्रात सुधारणा करू म्हणणारे तुझे राजीवजी काही पहिले नाहीत. झाले बहू, होतील बहू पण सरकारी यंत्रणा आहे तशी रहाणे आहे.'

'काय बोलता आहात ?'

'अग, वेळेवर येणे ही सगळ्यात कमी किमतीची सुधारणा आहे. नुसती वरवरची? आम्हा सरकारी नोकरांची वृत्ती सुधारली तरच खरी काही सुधारणा होईल. ह्या मंत्र्यांना व संत्र्यांना काय कल्पना सरकार कसे चालते ते.' श्याम टोस्टला जॅम लावत म्हणाला.

'का, न कळायला काय झाले ? आमचे राजीवजी एक नंबरचे पायलट होते. त्यांना चांगला अनुभव आहे.'

'अग राज्य चालवणं म्हणजे साधं विमान चालवणे नव्हे. ते high–jack म्हणजे पळव, लेल्या विमानाचा पायलट होण्यासारखे आहे- एवढे म्हणता येईल फार फार तर. आता पर्यंत किती तरी I. C. S. अधिकारी मंत्री होऊन गेले. त्यातले दोन फार प्रसिद्ध, आपले मराठीच होते. राज्य यंत्र चालवण्याचा त्यांना दांडगा अनुभव पण त्यांचे काय झाले पुढे ? I. C. S. साहेबांची ही कथा तर तुमचे पायलट साहेब काय सुधारणा करणार आम्हा लोकांत ?' आता श्याम मधला सरकारी नोकर जागा झाला होता.

खरं म्हणजे क्लास टु अधिकारी पण बोलत होता सगळ्या सरकारी नोकरांच्या वतीने व अभिमानाने. सरकारी नोकरांची हीच तर गंमत आहे. अगदी I. C. S. वा I. D. S. उच्च अधिकाऱ्यापासून तर चपराश्यापर्यंत एकच अभिमान 'आमच्यात सुधारणा होणे नाही !'

'म्हणजे हे सगळे असेच चालायचे ?' राधा.

'थोडे दिवस फरक पडेल. अग, हे बघ. आता स्वातंत्र्य मिळून ३५ वर्ष झाली व चांगले वाईट मिळून ७–८ पंतप्रधान होऊन गेले; पण सरकारी यंत्रणा आहे तशी आहे. प्रत्येकजण पंतप्रधान झाला की फतवा काढतो गलथानपणा चालणार नाही, सगळ्यांनी वेळेवर आले पाहिजे ! लोकांना वाटते काय मस्त पंतप्रधान आहे, शिस्त आणतो आहे. मग ३५ वर्ष होऊन गेली तरी अजूनी लोक वेळेवर का येत नाहीत ? हा प्रश्न कुणी कुणालाच विचारतच नाहीत.'

'पण आमच्या राजीवजींनी सुरुवात तर चांगली केली आहे हे तर मान्य कराल ?' राधा कौतुकाचे स्वरात म्हणाली.

'पंडीत नेहरूंनी काय वाईट सुरुवात केली होती ? काळ्याबाजार करणाऱ्याला ते पहिल्या विजेच्या खांबावर फाशी देणार होते. आत त्यांना कोणी काळाबाजारवाला सापडला नाही की विजेचा खांब सापडला नाही.

आता राधा चूप झाली. काय बोलावे ते तिला सुचेना. शेवटी हुकुमाचा पत्ता टाकल्याच्या आनंदात म्हणाली, 'ते काही असो सध्या तुमची तारांबळ होते आहे ना ? मला त्यातच आनंद आहे.'

'अग, तुमच्या सारख्या लोकांना आनंद व्हावा हीच तर कल्पना आहे. त्या आनंदाला आमचा विरोध नाही.' एवढे म्हणून श्याम तातडीने बाहेर पडला !

□

५००+५ = ४००+५००

निवडक आणि दर्जेदार राजहंस प्रकाशने
आपल्या संग्रही ठेवण्यासाठी

राजहंस ऑगस्ट '८४ योजना

आपण ५०० रुपयांची ठेव ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेवल्यास व्याजाच्या मोबदल्यात ४०० रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपणास मिळतील व ५ वर्षांनंतर ५०० रु. ची ठेवही परत मिळेल.

शिवाय

पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत सभासदांस मिळू शकतील. (पोस्ट खर्च सभासदांचा).

अपेक्षित सभासद नोंदणी झाल्यावर योजना बंद होईल.

सविस्तर योजना पत्रक मागवा.

राजहंस प्रकाशन
१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.
वेळः सकाळी ११ ते ५

वा. र. गोडे, जोशीवाडी, चितळे पथ कॉर्नर,
४१, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.
वेळः दुपारी २ ते ७

PAN ADS.

विज्ञान

जागृत देश

इंग्लंड हा अतिशय औद्योगीकरण झालेला प्रगत देश आहे. सर्वत्र प्रचंड कारखाने असलेल्या या देशात औद्योगीकरणाला आवश्यक असा दगडी कोळसा भरपूर प्रमाणात मिळतो. कोळशाच्या खाणी, डोंगराळ प्रदेश यांनीच बहुतेक जमीन व्यापलेली असल्याने इंग्लंडमध्ये अन्नधान्याचे उत्पादन फार कमी होते. असे म्हणतात की, इंग्लंडमध्ये पिकणारे अन्न तेथील लोकांना वर्षांतील दोन महिनेसुद्धा पुरत नाही. त्यामुळे इंग्लंडला अन्नधान्ये, फळे, भाज्या या सर्वांची प्रचंड आयात करावी लागते.

इटली, फ्रान्स आणि इतर युरोपीय देशांतून दररोज टनावारी भाजीपाला व फळफळावळ इंग्लंडमध्ये येत असते; पण तेथील कस्टमचे अधिकारी व त्याहीपेक्षा आरोग्याधिकारी अत्यंत जागरूक असतात. आयात होणारा भाजीपाला स्वच्छ, ताजा व खाण्यास योग्य आहे हे अगदी डोळ्यात तेल घालून पाहिले जाते. एकदा इंग्लंडच्या आरोग्याधिकाऱ्यांना इटलीतून आलेल्या पालेभाजीत काही विशिष्ट जातीचे पेंगूळ (Colorado Beetles) आढळले. त्यांनी ताबडतोब आधीच्या आठवडाभरात इटलीतून आलेली भाजी इंग्लंडमधील ज्या ज्या ठिकाणी गेली होती त्या त्या ठिकाणी कसून तपासणी केली. तीत असे दिसून आले की त्या एका आठवड्यात आयात झालेल्या कित्येक टन भाजीत ८० पेंगूळ (फक्त ?) आले होते; पण ते सर्व मारले गेले आहेत हे तर आरोग्य खात्याने पाहिलेच; पण इटलीतून आयात होणाऱ्या भाजीवर ताबडतोब बंदी घातली. याचे कारण असे की हे विशिष्ट जातीचे पेंगूळ इंग्लंडमध्ये भयंकर नुकसान करू शकतात. इंग्लंडमध्ये शतीचे उत्पन्न अगदीच कमी आहे हे सुरुवातीला सांगितलेच आहे. जे उत्पन्न आहे त्यात बटाट्याचे पीक सर्वात महत्त्वाचे आहे. कोलोरॅडो पेंगूळ बटाट्याला फार हानीकारक असतात. हे किडे बटाट्याच्या पानांचा फडशा पाडतात. हे पेंगूळ फार खादाड असतात आणि कित्येक चौ. किलोमीटर्सचा प्रदेश काही दिवसातच पर्णहीन करून टाकतात. तसे झाले तर बटाट्याचे उत्पादन निम्म्याने कमी होते. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क व इंग्लंड हे देश सोडले तर युरोपातील सर्व देशात कोलोरॅडो पेंगूळ भरपूर प्रमाणात आढळतात. त्यामुळे इंग्लंडचे सरकार आणि लोकही ही कीड आपल्या देशात येऊ नये याची खबरदारी घेत असतात. तसे पाहिले तर कीटकनाशके वापरून ही कीड, नष्ट करता येईल; पण कीटकनाशकांचा फार वापर केल्यास त्यांना दाद न देणाऱ्या कीटकांची जात निर्माण होते असा इतर देशांचा, विशेषतः फ्रान्सचा अनुभव आहे.



इंग्लंडमध्ये १९७६–७७ मध्ये पेंगूळ-धाड आली होती. ती आटोक्यात आणण्यासाठी आरोग्य खात्याला १०,४००० पौंड (सुमारे १८७२००० रु.) खर्च आला होता. अजूनही एखाद्या शेतकऱ्याने या पेंगुळांचा नाश करण्यासाठी वैयक्तिक जबाबदारीवर काही खर्च केला तर तो ब्रिटिश सरकार त्याला अनुदानाच्या रूपाने परत देते. ७६–७७ सारखी धाड आली तर सरकारला त्यापेक्षा किती तरी जास्त खर्च होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे पण फक्त ८०–९० पेक्षा संख्येने कमी असलेल्या क्षुद्र पेगुळांना एखाद्या प्रगत राष्ट्राने एवढे घाबरून जाणे योग्य आहे का ? ते कसेही असो. इंग्लंडच्या आरोग्य खात्यातले शास्त्रज्ञ असा धोका घ्यायला तयार नाहीत. श्री. पॉल ॲटकेनहेड यांनी या बाहेरून येणाऱ्या कोलोरॅडो पेंगुळांचा सर्व प्रकारचा अभ्यास केलेला आहे. भाजीतून येणाऱ्या पेंगुळांत निम्मे नर व निम्म्या माद्या असतात. त्यापैकी ५०% माद्या अंडी घालण्याच्या अवस्थेत असतात. एक मादी एका वेळी शेकडो, कित्येकदा हजारपेक्षा जास्त अंडी घालते (प्रयोगशाळेतील जास्तीत जास्त आकडा २९०० चा आहे.) त्यामुळे १० पेंगूळ थोडयाच काळात दहा हजार होऊ शकतात. तेव्हा खबरदारी घेतलीच पाहिजे.

या पेगुळांच्या हकीगतीवरून आणखीही एक गोष्ट दिसून येते ती म्हणजे इंग्लिश लोकांची जागृतता. एका आठवड्याच्या कालावधीत आयात होणाऱ्या कित्येक टन भाजीतून फक्त ८० पेंगूळ आले तरी ते आरोग्याधिकाऱ्यांच्या नजरेतून सुटले नाहीत. प्रत्येक गोष्ट डोळ्यात तेल घालून तपासून, परीक्षूनच घेतली जाते. त्या उलट आपल्या भारताची स्थिती आहे. गेल्याच वर्षी 'वनस्पती तूप' (?) या नावाखाली काही व्यापाऱ्यांनी व कारखानदारांनी कोट्यवधी रुपयांची गाईची चरबी आयात करून ती त्याच नावाखाली विकली होती. काही वर्षांपूर्वी 'लोकरीच्या चिंध्यां'चे प्रकरण लोकसभेत निघाले होते. त्यावेळी 'चिंध्या' (Rags) म्हणून लोकरीचे नवे तयार स्वेटर्स लाखांच्या संख्येने आयात केले गेले. कोट्यवधी रुपयांची जकात तर बुडलीच; पण देशातील लोकरधंद्याला जबरदस्त नुकसान सोसावे लागले. आजसुद्धा कॉम्प्यूटर्स आयात करण्यावर बंदी आहे; पण ऑफिस-साहित्य मायक्रो प्रोसेसर्स किंवा तत्सम नावाखाली कॉम्प्यूटर्स सर्रास आयात केले जात आहेत. हे साहित्य येऊ द्यायचे की नाही हे कोणालाच माहीत नाही; पण या सर्वावर कळस म्हणजे वस्तू नाही, प्राणी नाही तर एकट्या मुंबईत एक लाखाच्या वर पाकिस्तानी नागरिक (हेर ?) रहात आहेत असे जाहीर झाले आहे !

'सततची जागरूकता हीच स्वातंत्र्याची किंमत' असे म्हणतात. ब्रिटन ती चुकवीत आहे पण भारत ?

— भा. रा. बापट

मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

लोकशाहीचे लक्षावधि आधारस्तंभ



चार आठवड्यापूर्वी
डिसेंबरच्या अखेरच्या
आठवड्यात, शहरांतील
आणि खेडेगांवातील
लक्षावधि तरुण तसेंच वृद्ध
स्त्री पुरुषांनी मतदान करुन
आपले सरकार निवडले.
आणि त्यांनी पुन्हा एकदां
स्वतंत्र मतदानाचे महत्व आणि
लोकशाहीचे सामर्थ्य याचे
दर्शन घडविले.
लोकशाही आणि स्वातंत्र्य
आमुची अमुल्य दौलत
एक मौल्यवान वारसा
आपल्या गणराज्याच्या
३५ व्या वर्धापन दिनीं
ऐक्य आणि सामर्थ्याने
या ठेव्याचे
रक्षण करण्याची
प्रतिज्ञा करू या

आपण ही ज्योत प्रज्वलित ठेवू या

davp 84/275

नाट्यपंढरी

☐ हेचि दान देगा देवा !

बुवांनी 'हेचि दान देगा देवा' सुरू केले, की श्रोत्यांना कीर्तन संपल्याचे समजते 'ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण' म्हणून सांगावे लागत नाही. मी पण माझ्या 'नाट्यपंढरीच्या' वारीची गेलं वर्ष दीड वर्ष खांद्यावर घेतलेली पताका, 'स्वप्न नटसम्राटाचे' ही बालगंधर्वाची अखेरची आठवण सांगून खाली ठेवीत आहे.

मी सुरवातीलाच सांगितले होते की, हा रंगभूमीचा इतिहास नाही. या आहेत केवळ आठवणी. त्या जशा भावल्या तशा तुम्हाला सांगितल्या. फुलं जमविली नि तुमच्या ओंजळीत टाकली. आपल्याला नाट्यसुगंध लाभावा, क्षणिक का होईना, आपला आनंद उजळवा एवढाच हेतू ! प्रत्येक फुलाचा रंग वेगळा. गंध वेगळा. या आपल्या मराठी नाट्यसृष्टीत इतक्या वेगवेगळ्या मकदूराचे समर्थ कलावंत होऊन गेले आहेत नि आजही आहेत की त्यांनी या रंगभमीवर एक आगळीच किमया घडविली आहे. मराठी रंगभूमीची वाटचाल मंदावण्याच्या, तो प्रवाह खंडित होण्याच्या अनेक अशुभ वेळा आल्या. पण हाडाच्या कलावंतानी कष्टांची तमा बाळगली नाही नि रसिकांनी पाठ फिरवली नाही. 'आलिंगिजे चंदु प्रकटता' हे चंद्र–कुमुदिनीचे नाते जिवंत राहिले. अतूट राहिले. म्हणूनच ही नाट्यगंगा आज दुथडी भरून वहात राहिली आहे.

रसिकहो, या आठवणी म्हणजे मधुकरी आहे. 'फोडिले धन्याचे भांडार, मी तव हमाल भार वाहे.' अशी माझी हमालाची भूमिका आहे. लहानपणी अडुळशाच्या फुलांत मध असतो म्हणून अनेक फुलं खुडली. मोठेपणी नाटकाच्या नादाने, नाट्यसुगंध दरवळत रहावा म्हणून अनेक थोर कलाकारांच्या अंगणातली ही आठवणींची फुलं वेचली. माझा भोळा भाव सांगतो, की या आठवणी म्हणजे जुन्या भव्य वाड्यांचे पडके अवशेष आहेत. विटलेले का होईना, पण रंगभूमीचे शालू शेले आहेत; पण त्यातूनही आजच्या पिढीला एके काळच्या त्या संपन्न वास्तूचे, वैभवशाली मराठी रंगभूमीचे दर्शन घडविण्याइतका त्याचा पोत सुरेख आहे. श्रीमंत आहे ते मोठेपण त्या वस्त्रांचे. माझ्या शब्दांचे खचित नव्हे.

सुजनहो, आपणही या आठवणींना दाद देत आलात. कौतुक करीत आलात. म्हणून तर मी वेड्यासारखं लिहित राहिलो. मी आपला अत्यंत ऋणी आहे; पण खरे कौतुक करायला हवे, ते ज्यानी आपली भेट घडवून आणली, त्या दिलीप नि श्रीभाऊ (श्री.ग.मा.) या माजगावकर बंधूचे. त्यांनी मला हात धरून त्याहायला बसविले. लिहून घेतले. नाही तर 'चौकटी'चे नियमित लिखाण करण्याइतका चौकटीत बसणारा माणूस नाही मी. मी आहे आपला अघळपघळ. पण 'माणूस'च्या सर्वच मंडळींनी सुरेख साथ दिली नि सांभाळून घेतले. त्यांच्या उपकारांचं ओझं मला न पेलण्याइतके मोठे आहे. तर रसिकहो, पुन्हा एकदा आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून– 'हेचि दान देगा देवा...

वि. स. खांडेकर

. .

पंतप्रधान कोण ?

निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. अँड्रयूच्या सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीवर आता रेमंड आणि सायमन या दोघांचं भवितव्य अवलंबून होतं. अँड्रयूच्या पार्टीचा पाठिंबा ज्याला मिळेल त्याचंच सरकार येणार हे उघड होतं.

अँड्रयूने राणीच्या प्रमुख सचिवांची भेट घेऊन आपला निर्णय कळविला.

सचिवांशी बोलणं झाल्यावर राणीने आपला निर्णय निश्चित केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता राणीच्या खाजगी सचिवांनी सायमन आणि रेमंड दोघांनाही बकिंगहॅम पॅलेसवर पाचारण केलं.

सायमन आणि रेमंड–दोघांच्याही गाड्या पॅलेसकडे धावू लागल्या. दोघांचेही मार्ग स्कॉटलंड यार्डनं आधीच आखून दिले होते. उत्कंठा शिगेला पोचली होती.

अँड्रयूनं कोणाला पाठिंबा दिला होता ?

कोणाचं सरकार येणार होतं ?

सायमनचं की रेमंडचं ?

शर्यत : उत्कंठेचं टोक गाठणाऱ्या कादंबरीचा शेवटचा भाग.

श्रीग्रामायन

बलसागर

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

निर्माणपर्व

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.
एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागा चीपार्श्वभूमी लाभलेले – शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे. '

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?

॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

लेखक : श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन

मूल्य चाळीस रुपये

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.